नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत

अनुक्रमणिका

विदर्भ साहित्य संघाचें मुखपत्र

युगवाणी

शरद–अंक

७

आचार्य विनोबा भावे
डॉ. वि भि. कोलते
श्री. बाळकृष्ण मुंडी
श्री. शरच्चंद्र मुक्तिबोध
श्री. भा. ह. मुंजे
श्री. व्यं. व. पुराणिक
श्रीमती इंदिरा संत
श्री. गो. रा. दोडके
श्री. य. द. भावे
श्री. विंदा करंदीकर
श्री. क्रांतदर्शी बुधे
श्री. सुरेश भट
श्री. उ. रा. गिरी
शिवाय ग्रंथ समीक्षा, टिपणें इ० इ०

श्री
विदर्भ साहित्य संघ
विदर्भ विषय सारस्वतीजन्मभू

वर्ष सहावें
अंक सातवा

दि वा ळी अं क

किंमत
आठ आ

अनुक्रमणिका

★

पत्रव्यवहाराचा पत्ता :
"युगवाणी" कार्यालय
विदर्भ साहित्य संघ
उत्तर अंबाझरी रोड
धंतोली, नागपूर १.

युगवाणी
वर्ष सहावें : अंक सातवा

सन्त नामदेवांची हिन्दी कविता

★

प्रा. बाळकृष्ण मुंडी

मराठी संतांपैकी ज्यांनी हिंदी भाषेंतहि रचना केली आहे त्यांत तुकाराम रामदासाप्रमाणेच नामदेवांचाहि बराच वरचा क्रम लागतो. कारण अन्य संतांना जो मान मिळूं शकला नाहीं तो नामदेवांना मिळाला आहे. शिखांच्या पवित्र गुरु ग्रंथसाहेबांत भारतांतील विविध संतांच्या "वाणी"चा समावेश केलेला आहे. या संतवाणीला शीख लोक अत्यंत पवित्र व पूज्य मानतात. हाच त्यांचा देव. अशा या ग्रंथात सुदूरवर्ती अशा दक्षिणेतील या संताचीं ६१ पदें संग्रहित केलेलीं आहेत ही लक्षणीय बाब आहे. एकंदर सोळा संतांपैकी कबीराची व नानकाची पदसंख्या अधिक आहे. अन्यथा नामदेवाचींच अधिक पदें संग्रहित केलेलीं आहेत. हा असा मान त्यांना कां मिळाला याचें सविस्तर विवेचन न करता एवढीच सूचना पुरेशी होऊं शकेल की हें सर्व त्यांच्या दीर्घ कालपर्यंत केलेल्या परिश्रमाचें फल होय. आपल्या उत्तर आयुष्याचीं मूल्यवान अशीं वीस वर्षे त्यांनी पंजाब सारख्या सुदूरवर्ती प्रदेशांत एकाकी व्यतीत केलीं व तेवढ्या दीर्घ काळांत आपल[illegible] सतत व निष्कामी परिश्रमाच्या द्वारे जें बीं पेरलें त्याचींच फळें पुढे आपल[illegible] [illegible]सतात. या त्यांच्या महत्त्वाच्या व महाराष्ट्रीय आणि मराठी भाषा यांच्या दृष्टी[illegible] अत्यंत अभिमानाच्या विषयासंबंधी अद्याप पुष्कळच काय जवळ जवळ अ[illegible]च संशोधन व्हावयाचें आहे. नामदेवांचें कार्यक्षेत्र केवळ पंजाब नव्हे[illegible] [illegible]कार्याचे धागेदोरे राजपुताना, माळवा, उत्तर प्रदेश अशा दूरवरच्या भा[illegible] पसरल्याचें विद्यमान प्रमाणांवरून स्पष्ट होतें.* मराठ्यांचा जरीपटका पुढे तीन[illegible]वर्षांनी अटकेवर रोवला गेला. पण मराठ्यांचा भगवा झेंडा मात्र त्याच्या तीन शतकें अगोदरच नामदेवांनी नेऊन तेथे रोविला होता. एवढेंच नव्हे तर सतत वीस वर्षे परिश्रम करून आपल्या विचार सरणीचा प्रचार-प्रसार करून असा दीर्घ कालीन प्रभाव पसरविला कीं पुढे दोन शतकांनी झालेल्या दोन महान् विभूतींच्या कर्तृत्वाचीं पुष्कळशी पाळें मुळें नामदेवाच्या कार्यांत दिसतात. संत कबीर व गुरूनानक यांच्या विचारांवर नामदेवाची किती छाप होती हा महत्वाचा अभ्यास-विषय आहे.

याच दृष्टीने अध्ययन करीत असतां नामदेवांच्या मराठी अभंगांबरोबरच त्याची हिंदी कविताहि अभ्यासिणें अपरिहार्य होतें. त्यांच्या हिन्दी पदांना दोन

---

* माळव्यांत व राजस्थानमध्ये "रामदेवा"चीं पुष्कळ पदें उपलब्ध होतात. या रामदेवाचें नामदेवाशी कितपत ऐक्य आहे हा संशोधनाचा विषय असून त्या दिशेने प्रयत्न चालू आहेत.

विभागांत वाटतां येतें. गुरुग्रंथसाहेबांत संग्रह केलीं गेलेलीं ६१ पदें व यांच्या शिवाय गाथ्यांत घेतलेलीं अन्य पदें. या दोहोंची मिळून संख्या १२५ च्या वर नाही. या शिवाय अलिकडेच पंजाब विश्वविद्यालयाचे डॉ. मोहनसिंह यांनी "भक्त नामदेव नई जीवनी, नई-पदावली' या आपल्या नवीन पुस्तकांत संत नामदेवाचीं म्हणून सुमारे ३२ पदें दिलीं आहेत.

त्यांच्या हजार आठशे मराठी अभंगांच्या तुलनेने खिसगणतीच्या या हिंदी पदांबद्दल विशेष तें काय विवेचन करावयाचें असें वाटण्याचा संभव आहे. परंतु वस्तुतः असें वाटण्याचें कारण नसावें. उलट त्यांच्या या हिंदी साहित्याचें अनेक दृष्टीने बरेंच महत्व आहे.

या सर्व पदांचा विचार करण्यापूर्वी त्यांच्या प्रामाण्यासंबंधी चर्चा येथेच करणें योग्य होईल. मराठी गाथ्याच्या अभावीं ज्याप्रमाणे प्रमाणभूत वस्तुतः मूळचे असे अभंग ठरविणें कठीण आहे तीच गत हिंदी पदांची आहे. मराठी प्रमाणेच किती तरी प्राक्षिप्त पदें यांत वेळोवेळी घातलीं गेलीं असावींत. मराठी अभंगांतून तर असले प्रक्षिप्त अभंग किती तरी काढता येतात. हिंदी पदांबद्दल तसा प्रयत्न अद्याप कोणाच केलेला नाही. पण तरीहि निश्चितपणे असें म्हणायला प्रत्यवाय नाही की त्यांतहि प्रक्षिप्त भाग आहेच. हा प्रकार विशेषतः गाथ्यांतील पदांबद्दल अधिक झाला असावा. कारण ग्रंथसाहेबांतील पदांबद्दल असें होण्याला फारसा वाव नाही असें नानक व कबीराच्या हिंदी अभ्यासकांचें मत आहे. गुरुग्रंथसाहेब हा धर्मग्रंथ आहे म्हणूनच त्याला अत्यंत पूज्य व पवित्र मानतात. त्यांतील अक्षरन् अक्षर — नव्हे वर्णमात्रा देखील इतक्या पूज्य आहेत की त्यांत अत्यल्पहि बद्दल तर खपत नाहीच उलट असल्या कृत्याची गणना पापात केली जाते. पापभीरु धार्मिक प्रवृत्तीचे लोक कधी कधी अशुद्ध पाठाची किंवा चुकीची निश्चित कल्पना असताहि त्या पाठाला दुरुस्त करून घेण्याच्या किंवा चूक सुधारून घेण्याच्या भानगडीत पडत नाहीत. यामुळे गुरु[illegible]हेबांतील पदांचें स्वरूप अपरिवर्तित म्हणजेच मूळच्याच स्वरूपांत विद्यम[illegible]हिजे. याचाच अर्थ असा कीं ग्रंथसाहेबांतील पदांचा पाठच अ[illegible]माणभूत ठरतो. कबीराच्या पदाप्रमाणेच नामदेवांचीं पदेंहि प्रामाण्याच्या [illegible]ष्टीने अधिक विश्वसनीय आहेत असें प्रसिद्ध हिंदी साहित्यिक डॉ. रामकुमार वर्मा यांचें स्पष्ट मत असून आपल्या "संत कबीर" या ग्रंथांत त्यांनी याच मताचें प्रतिपादन केलेलें आहे. गाथ्यांतील पदांच्या प्रामाण्याबद्दल असली निश्चित कोणतीच कसोटी लावता येण्यासारखी नाही. नामदेवाच्या प्रमाणभूत अशा गाथ्याच्या अभावी सध्या आपल्यालाहि आपल्या साहित्यसंसाराची उभारणी या उपलब्ध पदावरच करावी लागेल. अन्यथा तुलनात्मक अभ्यासाचा प्रामाण्यनिश्चितीसाठी उपयोग होऊं शकला असता. "नई पदावली" चे अद्याप सर्वच संस्कार व्हावयाचे आहेत.

याच जागी एक गोष्ट स्पष्ट करावया हवी. डॉ. वर्मा यांनी जरी उपर्युक्त विवेचनाने प्रामाण्याचा निकाल लावण्याचा प्रयत्न केलेला असला तरी हा निकाल कबीराच्या पदाला जितक्या प्रमाणांत लागू पडतो तितका नामदेवाच्या पदांना लागू पडत नाही. कारण ग्रंथसाहेबाचें संकलन इ. स. १५८१-१६०६ ही कारकीर्द मानल्या जाणाऱ्या शिखांच्या पांचव्या गुरू अर्जुनसिंह याने केलें. कबीराचा आविर्भाव

काल सर्वस्वी निश्चित ठरलेला नसला तरी सामान्यतः इ. स. १३९० ते १५०० हा मानण्यांत येतो. अर्थात या दोहोंतील अंतर सरासरी फक्त शंभर वर्षांचें आहे. नामदेवांचा आविर्भाव काळ शके ११९२ ते १२७२ अर्थात इ. स. १२७०–१३५० हा मानतात. अर्थात संकलन काळापूर्वी ते दोनशे वर्षे होऊन गेले. इतक्या दीर्घ काळानंतर संकलन झाल्यामुळे नामदेवाच्या भाषेचें मूळ स्वरूप त्यांच्या हिंदी पदांत विद्यमान नाही. ती भाषा बरीच अलीकडची आहे. यामुळेच महाराष्ट्रीय विद्वानांनी नामदेवाची ज्ञानेश्वराशी असलेली जोडी फोडून त्यांना त्यांच्या एक शतक नंतर ओढण्याचा प्रयत्न केल्याचें सर्वप्रसिद्धच आहे. भाषाशास्त्रांच्या आधारावर बसविलेल्या या अनुमानपरंपरेत कांहीच चूक नव्हती हें खरें पण डॉ. भांडारकराही आपल्या विचार परंपरेत कांही तथ्यांना विसरले. भाषेचे आधुनिकीकरण होण्याच्या कारणांतील प्रमुख म्हणजे अभंगांचें अलिखित स्वरूप व शिवाय शेकडो लोकांच्या मौखिक नित्यपाठांत राहणें हें होय. ज्ञानेश्वराची लिखित ज्ञानेश्वरी व मौखिक स्वरूपांतील अभंग यांतील भाषेच्या भेदावरून हें स्पष्ट होण्यासारखें आहे. सारांश, नामदेवाच्या भाषेच्या आधुनिकतेमुळे त्यांना अलीकडे ओढण्याचेंहि कारण नाही किंवा त्यांच्या पदांना प्रक्षिप्त समजण्याचेंहि कारण नाही. ग्रंथसाहेबांतील पद-पाठ प्रमाणभूत मानायला प्रत्यवाय नाही. गाथ्यांतील पदांबद्दल कांहीच ठरविता येणें तितकेंसें सहज नाही. शिवाय गाथ्यांत तीं मुद्रित करीत असतां इतका निष्काळजीपणा दाखविला आहे की साधा अर्थ लावण्याच्या दृष्टीने शब्द देखील बरोबर छापलेले नाहीत. * याचें कारण अर्थातच हिंदी बद्दलच अज्ञान व मराठी पदांच्या समोर हिंदी पदाबद्दल न वाटणारें विशेष. असो. तर प्रस्तुत सामग्रीच्या जोरावर आपल्याला नामदेवांच्या पदांचें विविध [illegible]रे विश्लेषण करून विवेचन करावयाचें आहे.

भाषा :—

येथपर्यंत सर्वसामान्य विवेचन झालें. यानंतर त्यांच्या हिंदी पदांचें अंतर्बाह्य निरीक्षण–परीक्षण करणें इष्ट होईल. भाषाविषयक [illegible]नाचा प्रमुख भाग म्हणजे व्याकरण होय. शब्दांच्या विविध रूपावरून [illegible]य, काल इत्यादि वरून अनेक गोष्टींचें स्पष्टीकरण होणारें आहे.

ग्रंथ साहेब व गाथा व "पदावली" यांतील पदांची [illegible]षा निश्चित एकाच प्रकारची आहे असें सरसकट म्हणणें तितकेंसें बरोबर होणार नाही. तिला जर एकच

---

* पुढील उदाहरणावरून हें स्पष्ट होऊं शकेल.

पद. २३४२

माझा प्राणोत विठ्ठला । पैडी अटकी हो बांधला ॥१॥
कलीं पोटी कुसमल कली काल । मेरे बंधमो चहूं श्री गोपाल ॥२॥
काही नारायण भवके बंध । समृध दृढकरी बोडो कंद ॥३॥
नामदेव का नराईन किन्ही सार । चले प्रोहण उतरो पार ॥४॥

याप्रमाणेच पदें २३८३ व २३८६ पाहण्यासारखीं आहेत. हीच स्थिती प्रक्षिप्त अभंगांची आहे. पद २३८१ चा एक चरण "चंद्रभागा बालवंटपर कबिरा धुम मचाई" असा आहे. नामदेवाने आपल्यानंतर दीड दोन शतकांनी झालेल्या कबीराचा केलेला उल्लेख लक्षणीय आहे !

एक कांही अभिधान द्यावयाचें झालें तर "सधुक्कडी" असेंच म्हणणें समर्पक होऊं शकेल. हिंदीचे प्रकांडपंडित आचार्य रामचंद्र शुक्लजींचें मत यासंबंधी पुढील प्रमाणे आहे. ते लिहितात "नामदेवजी की रचनाओं में यह बात साफ दिखाई पड़ती है कि सगुण भक्ति के पदों की भाषा तो व्रज या परंपरागत काव्य भाषा है, पर "निर्गुण बानी" की भाषा नाथ पंथियों द्वारा ग्रहित खडी बोली या सधुक्कडी भाषा." डॉ. रामकुमार वर्मा म्हणतात "नामदेवजी की भाषा मराठी है और गुरु-ग्रंथ साहब में उनकी वाणी मराठी रूपमें ही सुरक्षित है" अर्थात त्यांच्या हिंदीवर मराठीचा अधिक प्रभाव असून तो तसाच या पदांत विद्यमान आहे. प्रा. रानडे यांच्या मते नामदेवांच्या पदांची भाषा अनेक भाषांच्या मिश्रणाने तयार झालेली आहे. यासंबंधीची कारणमीमांसा करीत असतां "लोकांच्या नित्य बोलण्यांत राहिल्याने तिच्यात बराच आधुनिकपणा आल्याचें व त्यामुळेच तिच्यात अनेक भाषा स्वरूपांचा समन्वय" झाल्याचें ते म्हणतात. या सर्वांचा सारांश एवढाच की खरोखरीच नामदेवांच्या हिंदी पदांची भाषा म्हणचे अनेक भाषांची "खिचडी" आहे. तींत व्रज, अवधी, राजस्थानी, मराठी, गुजराती, मारवाडी व पंजाबी इत्यादि विभिन्न भाषांचीं रूपें मिळतात. याची संगति लावणें फारसें कठीण नाही. नामदेव हे पंजाबांत प्रचार-प्रसाराचें कार्य स्वीकृत करूनच गेले होते व त्याच प्रचार-प्रसारासाठी त्यांना आसमंतातच्या भागांत नेहमी वावरावें लागलें असेल. अशा वेळी त्यांच्या या "त्रुटित" रचनेवर स्थळ, काळ व परिस्थितीचा प्रभाव पडला नसता तरच आश्चर्य. शिवाय त्यांच्या पदांचें स्वरूप लिखित नसून मौखिक असल्याने ग्रहण करणाऱ्या व्यक्तीच्या उच्चारणावर, धारणाशक्तीवर, त्यांचें शुद्धत्व राहणें बरेंचसें अवलंबून होतें. शिवा[illegible] कधीं [illegible]ळी लेखन स्वरूपांत अवतीर्ण होताना त्यांत व्यक्ति-नुसार बदल झाला अ[illegible]णें अ[illegible] नाही. तसेंच त्यांच्या पंथांतील मानाचें स्थान प्राप्त झालेल्या व अधिकार[illegible]ढ अ[illegible]ाऱ्या अशिक्षित मठाधिपतींनी किंवा इतर शिष्यांनीहि प्रसंगी अज्ञानाला ज्ञा[illegible]न [illegible]वून आपला मोठेपणा, गुरूपणा टिकविण्यासाठीहि आवश्यक ते फेरबदल के[illegible]सतील असें कसें समजावयाचें ?

सारांश, नामदेव[illegible]ंना आजचें स्वरूप प्राप्त होण्याला "लिपिकारों-का अज्ञान, समय क[illegible]ाचार, हस्तलेखन की कठिनाइयाँ, तथा मौखिक पाठ का भिन्न भिन्न प्रांती[illegible] व्यक्तियोंके उच्चारण के अनुसार उनमें परिवर्तन हो जाना तथा नामदेवजी के अनुयायीयोंमें, परंपरामें कुछ बडापन, अधिकार एवं गुरुपद प्राप्त व्यक्तिओंका भी हाथ"* कारणीभूत झाला असावा असें दिसतें.

या विभिन्न भाषांच्या समन्वयांत अर्थातच तात्कालीन प्रचलित प्रमुख भाषा जी अवधि व तिच्या खालोखाल व्रज यांचाच प्रभाव या पदांत अधिक आहे. पंजाबीचा प्रभाव हवा तसा पडलेला नाही. मराठीचा प्रभाव मात्र कमी विद्यमान नाही हें पुढील उदाहरणांवरून स्पष्ट होण्यासारखें आहे.

भाषेतील 'क्रियापदां'च्या महत्त्वाची पुनरावृत्ति करण्याचें कारण नाही. नामदेवांच्या पदांत कितीतरी मराठी क्रियापदांना हिंदी बनविण्याचा प्रयत्न केलेला आहे जसें:—

* डॉ. रामकुमार वर्मा 'संत कबीर'

चालती [गाडी चालती / ग्रंथसा. ५२]; हांकती [पीछे तिनका लैकर हांकती, जैसे धनकत धुटिटि हांकती / ५२]; कोपिला (मुझ उपरि सभ कोपिला / ५७), बांधिला (नामा मुलताने बांधिला / ४७) घाले [घाले भंवा / ४५]; तूटसि (कबहू न तूटसि / ४४); राचिले [संसारू राचीले / ५६]; करि [भगतबर करि दइआ / ५२]; आनीले (आनीले कुंभ भराइले उदक/३०; ३); पऊढीअले (बालकु पालन पऊढिअले/३०); दैला (छीपेके घरि जनमु दैला / ६); भेटुला (नामा हरि भेटुला /६); भेटिले (सतिगुर भेटिले देवा/९); होती (सोइनकी लंका होती/१२); घूटला, चोखता, मांडिअले (जैसे कनक कला चितु मांडिअले /३०); होती, होता (माइ न होती, बापु न होता / ३२); हंसत खेलत (हंसत खेलत तेरे देहुरे आइआ / ४३); होते (बइआलिस लख जी जलमहि होते/३); आला (हो.जी आला ते निवारणा / १५)—

अशींच अनेक उदाहरणें सूक्ष्म अध्ययनाने निघण्यासारखीं आहेत. या क्रिया-पदांच्या 'काळां' तहि मराठीचा प्रभाव दग्गोचर होतो. भूतकाळाच्या 'ला, ली, ले' या प्रत्ययांचा सरसहा उपयोग केलेला आहे. कांहींच्या मते हा प्रत्यय असणें मराठीच्या प्रभावाचें निदर्शक नाही. कारण मूळ संस्कृतचाच प्रत्यय तात्कालीन प्राकृत भाषांत वापरला जात असे. हें खरें असलें तरी इतर भाषांतून प्रस्तुत प्रत्यय काळांतराने नाहीसा झाला व मराठींतच प्रकर्षाने प्रचलित राहिल्याने त्याला मराठी म्हणणें अयोग्य होणार नाही. अधिक चर्चा न करता असें म्हणावें लागेल की या पदांतून या प्रत्ययाचा बराच उपयोग केलेला आहे, जसें:—

तारिअले अथवा तारिले (तारिले गनि... अजामिलु तारियले; पाहन तारियले १ ग्रंथ साहेब)

आंनीले

(आनीले फूल परोहले माला—३—हिंदी क्रियापद "लाना" असून मराठी "आणणें" आहे. हिंदी भूतकाळवाचक रूप ...च्या" व्हायला हवें. यावरून मराठपिण स्पष्ट आहे.)

भेटिले :—(भेटिलेदेवा—९); बांधिला (नामा मुलतानें बांधिला—४७) दैला (जैनमु दैला—६) इत्यादि, परंतु याबरोबर हेंहि स्पष्ट करायला हवें की या भूतकालवाचक प्रत्ययाचा उपयोग इतरांचे तर असोच, पण स्वतः नामदेवांनी आपल्या पदांतून शुद्ध "हिंदी" शब्दांबरोबर केलेला आहे. जसें :—

भराइले, परोइले, रिधाइले (३); चेतीअले, (६); पूछिले (१०) भरमीअले, काटीले, राखीअले, वेधिअले (३०); उबारिअले, आइअले (३५); माखीअले, पूरीअले (५६) इत्यादि.

मराठी नाम विभक्तींचा उपयोग हि केलेला आहे जसें :—

प्रथमा कारक :—एकवचन ज्ञानेश्वर काळाप्रमाणे उकारान्त, जसे रामु, पुरुषोत्तमु, हुकुमु, नराइनु, बीठलु, मुखु, दूधु, भतारु, सिंगारु, लोगु, जोगु, दरसनु, 'एकु' नीसानु इत्यादि. कबीराच्या पदांतहि असलीं उकारान्त रूपें सापडतात जसें एकु, ब्रह्मु, सबदु, संखु; पण त्याबरोबरच उकारान्त रहित प्रथमेच्या एकवचनाची रूपें कांही कमी नाहीत, जसें—ब्रह्म, चंद्र, सूरज, आदि.

द्वितिया कारक :—मराठी प्रत्यय "ला" चा प्रयोग :—

करहला (वेलि बालहा करहला–१४)

भंवरला (कुसुम वासु जैसे भंवरला–१४)

हंसुला (बालहा मानसरोवर हंसुला–१४)

तृतिया :—"ने" प्रत्ययाचा उपयोग :—

नामा सुलताने बांधिला–४७

षष्ठी :—"चा, ची, चें" चा प्रयोग :—

नामेचे सुआमी–८; ताचे–१५; ५९; तुमचे–१०,६०; हमचे–६०; जाचै–५६; ताची–५५,५३;—आदि

सप्तमी :—"मधें" चा प्रयोग :—

देवल मधें, गोकल मधें, जंगल मधें, नामें मधें, संतामधें (देवलमधे लिंगु आछै; गोकल मधें सिआम गो; जंगल मधें बेल गो; नामे मधे रामु आछै; संतामधे गोविंदु आछै–१९)

या "मधें" ला शब्दयोगी हि म्हणता येऊ शकेल. "संता मधें" हा शब्द सोडला तर इतरांत "सामान्यरूप" झालेलें नाही ही गोष्ट लक्षणीय आहे.

"ई" प्रत्ययाचा उपयोग :

घरि :—(छीपेके घरि जनमु दैला–६) (जाचै घरि–५६)

मारवाडि :—(मारवाडि जैसे नीरू बालहा–१४

मनी :—(तिउ मेरे मानि रा[illegible]आ; नामे मनि वीठला–१४)

या शिवाय पुढील [illegible]ाठी [illegible] व्यक्त करणारे शब्द पहा :—

तत सारखा ५६; [illegible] तरु–[illegible]; बावला–५६; ३२–४७ (ओटी) तूं कुरुरे-१५; सगले–१५; आणि (शपथ) [illegible] न[illegible]र–७ पैज–५८ तुज-गाथा २३२५ उदरीं–२३२५; जीव दमता है–२३२५ फिर[illegible]रतां–२३२५; मंडळमों-२३२६; दीवा-२३२७ देवलके पीछे-२३२८ टाळ–[illegible]ग्ज़ न करी–२३३२; वैकुंठनाथा–२३३३; म्हणत–२३३५; तो–२३३५ [illegible]कला–२३४१; तूं–२३४१ माझा–२३४२ ज्याचे–२३४७ दिसे–२३[illegible]टकीं ना बोलो–२३६४ मै माझें डोळें देखिला–२३६४ बालवंटपर–२३[illegible]—इत्यादि

या उदाहरणांवरून नामदेवाच्या हिंदी पदांवर मराठीचा कितपत प्रभाव आहे याचें स्पष्टीकरण होऊं शकेल. यापेक्षा अधिक सूक्ष्म अभ्यासाने पुष्कळच प्रकाश टाकला जाऊं शकतो.

मराठी नंतर पंजाबीचा प्रभाव पाहूं गेले तर फारसा नाही. ही गोष्ट आश्चर्यकारक खरी, पण याची संगति एकाच प्रकारे लावता येते. ग्रंथसाहेबाचें पूज्यत्व व पावित्र्य आणि जनतेतील धार्मिक पापभीरू मनोवृत्ति त्यामुळेच पंजाबी लोकांनी त्यांत परिवर्तन केलें नाही. अर्थात हें तितकें समाधानकारक निराकरण नाही. ग्रंथ साहेबांत समाविष्ट केलीं जाण्यापूर्वीच्या दोन शतकाच्या काळांत यांत बदल होणें स्वाभाविक होतें. पण तितकासा तो झाला नाही एवढें मात्र खरें. जे एक दोन पंजाबी विशेष दिसतात ते उच्चारामुळे आहेत. जसें वर्णात अभेद, क-ग; ष-ख; र-ड; ण-न; ग-ज; श-स; द-ड; ड-र; ज-य; व-म; इत्यादि कितीतरी वर्णांच्या

उच्चारांत अभेद आहे. प्रकास (प्रकाश); पुरख (पुरुष); अंतरजामी (अंतर्यामी); जादमराइया (यादवराय); बारिक (बालक); मुकति (मुगति); भभीखण (बिभीषण); खाणा (खाना); हिवाले (हिमालय) इत्यादि.

पंजाबी लोकांच्या उच्चारण-विशेषा मुळेंच वर्णसंकोच किंवा वर्णविस्ताराचीं हि भरपूर उदाहरणें सापडतात:—

सुआमी (स्वामी); बिआध (व्याध); कुबिजा (कुब्जा); रिदै (हृदय); ब्रहम अथवा भरमु (ब्रम्ह); पदारथ (पदार्थ); इसनान (स्नान); परपंच (प्रपंच); गह (ग्रह); गिआनी (ज्ञानी); उसतुति (स्तुति); माइआ (माया) इत्यादि.

कांही शब्दांचीं मोठीं चमत्कारिक विचित्र रूपें (अपभ्रष्ट) झालेलीं दिसतात, जसें:—मृत (मूए अथवा मुइ) ऋणी (रिखी); कमला (कउला); जमुना (जऊं); प्रतिज्ञा (पतिआ); मूरखू (मूलहू), स्वभाव (सुभाइ); हृदय (हिअर) अनन्य (आनंन); अंधा (अंना); सुषुम्ना (सुखमना); प्रवेश (पेसऊ) इत्यादि. कांही पंजाबी शब्दांचाहि उपयोग केलला आहे:—

पिंधा, पुंगडा, सेलमसेल, खुंदकारा, हऊ, दूहां; खाणा पाका; अढसाठि, सिहजा, पयाणा, रजबल, चेरा, जाणा, इत्यादि

मराठी आणि पंजाबी शिवाय गाथ्यांतील कांही पदांची भाषा मारवाडी अथवा गुजराती आहे. परंतु यासंबंधी अद्याप निश्चित कांहीच सांगणें योग्य होणार नाही. तत्पूर्वी त्यांच्या प्रामाण्याबद्दल तपासणी होणें आवश्यक आहे. ग्रंथ साहेब पद २०, २१ व ४९ मध्यें बरेच उर्दू-फारशी शब्द वापरले आहेत, जसें:—खुंदकारा, मसकीन, करीमा, गनी, दरिआऊ, निहंद, हाजरहजूरी, रवेस, गिगर, बसखंद, हले यारां, आले, कुजा आमद, कुजा रफती, कुजा मेरवी, [illegible] खूब, मगोल, आलम, कलंदर, कुलह, पेहनु, इजार, बीबो, इत्यादि. [illegible] पलीकडे फारशीचा फारसा उपयोग नाही. हे शब्दहि विशेष प्रकारच्या [illegible] अनुकूल म्हणूनच वापरले आहेत.

या व्यतिरिक्त पदांची भाषा ब्रज [illegible] किंवा प्रसंगी सधुक्कडी अर्थात खडी बोलीचेंच रूप घेतलेली आहे. जसें—विभक्ति[illegible]

प्रथमा—अजामलु, रामु
द्वितिया—कऊ (उग्रसेन कऊ राज दिये; ठाकुर कऊ असवान करऊ)
तृतिया—भंवरह (भंवरह पहिले बासु लई है)
बछरै (बछरै पहिले दूधु बिटारिऊ)
दुरवासा सिऊ
पंचमी—जलते भिन्न न कोई; जबते सुधु नाही; रावणसे अधिभाई
षष्टी—नामेके सुआमी; जमकी फांसी; ठाकुरकी पूजा.
सप्तमी—जल महि होते; उदक माहि, जल माझै; आकासै;

क्रियापदाची विविध रूपें पुढील प्रमाणे आढळतात:—भराइले, परोइले, आनीले, लाहिले, पूंछिले, भेटिले, करउ, काटउ, सीवउ, नीवउ; गावउ; धिआवउ; थापिउ, आपिउ; जानै, बखानै, मांडै, छाडै; आवै, छवाणै, बाजै गाजै, गावा, पावा,
 भरिआ, जरिआ, लागा; घटि जाई; भुलाई, बुझाई, जाई, आई, होई, कहि, भावसी,

चीनसी—धरिए, करिए, समानिआ, जानिआ, मानिआ, पछानिआ, परोइआ, रमईआ; लीना, कीना, दीना, जाना, समाना.

इतर—हऊ=मी; तेऊ=ते; किऊ अथवा केऊ=कोण; जिन–तिन; इहु–एहू; इभै–ऊभै; जत–तत; इहू–उहू; मोकड–तोकड; कापहि–तोपहि; काहू सिऊ इत्यादि.

या उदाहरणांवरून म्हणायला प्रत्यवाय राहत नाही की पदांत आधिक्य अवधीच्या रूपांचें, तिच्या खालोखाल व्रज व सधुक्कडीचें आहे. भाषाविषयक सूक्ष्म अध्ययनाने यापेक्षा किती तरी अधिक निश्चित निर्णय केले जाऊं शकतात.

काव्य–दृष्टि :—

नामदेव काय पण वस्तुतः कोणत्याच संताने शुद्ध काव्यदृष्टि ठेवून साहित्य–सृजन केलेलच नाही. परंतु सहेतुक काव्य निर्मिती केलेली नसली तरी संत साहित्यांत काव्यगुणांचा किंवा काव्य लक्षणांचा सर्वस्वी अभावच आहे असेंहि विधान करणें योग्य होणार नाही. ज्ञानेश्वरांसारख्या "शब्द सृष्टीचा ईश्वराच्या" सहवासांत इतका दीर्घ काळ व्यतीत केल्यानंतर व त्यांच्या ज्ञानेश्वरीचें श्रवण केल्यानंतर नामदेवांच्या पदांतहि काव्यगुणांचा संपूर्ण अभाव कसा राहूं शकेल? मराठी अभंगांची चर्चा येथे करावयाची नाही. परंतु केवळ हिंदी पदांतहि जागोजागी कल्पनासमृद्धि, अलंकारांची समर्पक योजना, भाषेचें सौंदर्य, तिच्यातील प्रासादिकपणा, भक्तिरसाचा प्रकर्ष, आर्त भक्ताच्या वाणीतील जिव्हाळा व तळमळ इत्यादि गोष्टी सांपडतात. आणि हे सर्व अगदीं स्वाभाविक, अकृत्रिम स्वरूपांत आहे.

अलंकारांत विशेषतः उपमा, [illegible]ष्टान्त व रूपक यांचाच उपयोग केलेला आहे. पद संख्या ५३, ४४, ५०, २६, [illegible]१४, ३०, ८, ५, इत्यादींत उपमा दृष्टान्त आढळतात. यापैकीं कांही [illegible]ष्टान्तां[illegible] दिग्दर्शन रा. शं. पु. जोशी यांनी आपल्या पुस्तकांत केलेंच होतेंच. पाणी [illegible] बुडबुडा; सुतात ओवलेली मण्यांची माळा; कपडे मापण्याचा गज, कात्री [illegible] कापड; सर्प आणि कात टाकण्याचा त्याचा स्वभाव; बगळ्याची तपःप्रवृति [illegible]; मृगजल; अनाहत नाद; लोह-परिस, भ्रमर, मधुमक्षिका, पुष्प; पर्जन्य आ[illegible]काचें जोडपें; अंधळा आणि त्याची काठी; पतंग आणि तो [illegible]; राजकुमारी आणि तिची दासी परटीण; चंदनाचा सुवास; मुलांना [illegible]णारी माता, मानस सरोवर आणि हंस इत्यादि अनेक दृष्टान्त या पदांत दिलेले आहेत. रूपकांचीहि योजना कमी नाही. जसें पद ५२, ४ मध्ये एकेक रूपक आहे. या सगळ्या अलंकारांची व भाषाविशेषांची विशेष चर्चा प्रस्तुत लहानशा लेखांत करता येण्या सारखी नाही. म्हणून काव्याच्या दृष्टीनेहि या पदांचा अभ्यास होऊं शकतो येवढेंच सूचित करतों. प्रासादिकपणा, भक्ति, ममता, प्रेमळपणा आदि बद्दलहि पुष्कळच सप्रमाण विवेचन होण्या सारखें आहे.

तत्त्वज्ञान :—

पण या पेक्षां प्रस्तुत पदांतून व्यक्त होणारें तत्वज्ञान किंवा विचारसरणी अधिक महत्वाची व अभ्यसनीय आहे. तसें पाहिलें तर मराठी अभंगांतील तत्वज्ञानाची ओळख असणाऱ्या मराठी वाचकांना वस्तुतः हिंदी पदांतील तत्वज्ञान विशेष आकर्षित करू शकत नाही. कारण वस्तुतः खरें व निःपक्षपणे पाहिलें तर अधिकांश मराठी तत्वज्ञानच हिंदी शब्दांत मांडलेलें आढळेल. परंतु एवढ्यानेच भागणारें

अनुक्रमणिका

नाही ही गोष्ट ही लक्षणीय आहे. दोन्ही भाषांतील साहित्याचे जनक एकच नामदेव असल्याने सर्व प्रकारे विचारांची एकरूपता असणें स्वाभाविकच आहे. त्या दृष्टीने हिंदी पदाचें स्वतंत्र विवेचन करण्याचें कारणच राहिलें नसतें. पण वास्तविक वस्तु-स्थिति यापेक्षां थोडी भिन्न आहे. महाराष्ट्रांतील नामदेवाच्या मराठी पदानंतर किती तरी वर्षांनी हीं हिंदी पदें झालेलीं आहेत. आपल्या सगळ्या सहकाऱ्यांचें देहावसान झाल्यावर नामदेव उत्तरेकडे निघाले व वाटेत अनेक तीर्थस्थानीं वास करून मग अखेरीस पंजाबांत गेले. तेथेहि आपलें बस्तान बसविण्यास त्यांना कांही तरी काळ लागला असलाच पाहिजे. यानंतर किंवा याच सुमारास त्यांच्या हिंदी रचनेला प्रारंभ झालेला मानावा लागेल. उत्तरेत दक्षिणेसारखीच जरी परिस्थिति असली तरी ती थोडी निराळ्या स्वरूपाची होती. महाराष्ट्राने परकीय राजकीय सत्ता व धार्मिक आक्रमण याला सतत तोंड देऊन आपलें स्वतंत्र अस्तित्व राखण्याचा प्रयत्न केला होता, त्या साठी प्रचंड चळवळ करून उठाव केला होता. परंतु हिंदुस्थानांतील चित्र निराळ्या प्रकारचें होते. असल्या उठावाची भाषा तर दूरच पण उत्तर भारतीय हळू हळू परकीय सत्तेच्या प्रभावी व तीव्र आक्रमणाने पिचून जाऊन दिङ्मूढ झाले होते. काय करावें हा त्यांच्या समोर मोठा प्रश्न होता. त्यांचें नेतृत्व करणाराहि कोणीच नव्हता. त्यामुळे अखेरीस असाहाय्यतेने त्यांनी परकीयांशी एकरूप होण्याचाच मार्ग स्वीकारला. मुस्लिम संस्कृतीचें, धर्माचें, आचार विचाराचें जूं त्यांच्या मानेवर बसलें. राजकीय सत्तेच्या तंत्राने वागण्याने मान सन्मानहि प्राप्त होऊं लागला. याच वेळी नाथपंथी प्रचारक योग्यांनी धार्मिक विषमता, जातिभेद, स्पृश्यास्पृश्य भेद, देवोपासना, सगुणोपासना, मूर्तिपूजा इत्यादींच्या विर[illegible] प्रचार सगळ्या उत्तर भारतांत सुरू केला होताच. हें धर्माचें स्वरूप नवीन रा[illegible]य स[illegible]या धार्मिक प्रवृत्तींना जुळण्यासारखेंच असल्याने लोकांना आयतेंच फावलें.

सारांश, नामदेवांनी पंजाबांत जाण्याचें खरें क[illegible]रण या असल्या परिस्थितींत आहे. महाराष्ट्रांत प्रतिकाराची यशस्वी चळवळ करू[illegible]या[illegible]तांनी जी राष्ट्रीय कामगिरी केली होती तीच नामदेवांना उत्तरेत करावयाच[illegible] व त्याच दृष्टीने आपल्या विचारांना अभिव्यक्त करावयाचें होतें. अर्थात् [illegible]रिस्थितीच्या पार्श्वभूमीवर निर्माण झालेल्या या हिंदी पदांकडे पहावयास हवें. [illegible] 'निःशस्त्राचें प्रभावी राजकारण' दक्षिणेंत करून जनजागृतीची प्रचंड लाट [illegible]वली व आलेल्या मुस्लिम आघाताला निष्फळ केलें. उत्तरेंत नामदेवांना निराळा मार्ग काढावा लागला. आजवरच्या प्रथेप्रमाणे व अनुभवाप्रमाणे हिंदुधर्म इतर धर्मांप्रमाणे मुस्लिम धर्माला आत्मसात करूं शकला नव्हता. बौद्ध, जैन, आदि पंथोपपंथ कधीच हिंदु धर्मात विलीन करून घेता येऊं शकले, परंतु इस्लामने मात्र आपलें स्वतंत्र अस्तित्व येथे राखण्याचा प्रयत्न केला. म्हणून नामदेवादींनी दोघांनाहि मान्य होणारा असा एक 'सामान्य मार्ग' काढला. निराश, असहाय हिंदु जनता ज्या विशेष गोष्टींच्यामुळे इस्लामकडे आकर्षिली जात होती त्यांनाच नामदेवांनी आपल्या 'निर्गुण पंथात' पुरस्कारून स्थान दिलें. दक्षिणेतील सगुणवादी नामदेव निर्गुणवादी झाले होते; नाथपंथीयांच्या गुरूपदेशामुळे व सतत सहवासामुळे तेहि 'ज्ञानोत्तर भक्ती' मार्गी झाले होते; परमेश्वराचें 'नामसंकीर्तन' हाच खरा मोक्षमार्ग, इतर मूर्तिपूजा, देवतार्चन, तिर्थयात्रा, तप, दानधर्म इत्यादि सत्कर्म मार्ग व्यर्थ आहेत याची त्यांना पूर्ण प्रचीति आलेली होतीच. स्पृश्यास्पृश्य भेद, उचनीच भाव, जातिपातींचें बंधन, थोडक्यांत

सामाजिक विषमता नाहीशी करण्याचे सतत परिश्रम त्यांनी स्वतः केलेले होतेच. याच सर्व गोष्टी त्यांनी उत्तरेत प्रसृत केल्या. नाथपंथीय योगी प्रचारक याच गोष्टींचा प्रचार यापूर्वीपासूनच करीत आले होते. त्यांच्या योगमार्गी चमत्कारांचा जनतेवर फारच मोठा प्रभाव होता. परंतु त्यांचा हा मार्ग सर्व सामान्यलोकांच्या शक्ती-पलीकडचा होता. त्यांत हृदयाचा ओलावा नव्हता. देहकष्ट, संसाराविषयी अनासक्ति, इत्यादि त्यांतील रुक्षपणामुळे व कांहीशा अनुकरणाच्या असंभाव्यतेमुळे जनता त्यांचें सर्वस्वाने स्वागत करून स्वीकार करू शकत नव्हती. अशा वेळी तिच्यासमोर नामदेवांनी आपल्या समन्वयवादी सहिष्णुतेवर आधारलेल्या प्रेममय, सामान्य भक्ति मार्गाचा प्रचार प्रसार केला. इस्लामीयांनाहि हा मान्य होणारा मार्ग असल्यामुळे पुढे तर कितीतरी मुसलमान या 'भक्ति मार्गाचे' अनुयायी झाले. संत कबीर हे या प्रकारचें फार मोठें उदाहरण आहे.

सारांश, नामदेवांचा "ज्ञानोत्तर भक्तिमार्ग" "नामस्मरण", इत्यादि सर्व प्रकारची विचारसरणी प्रस्तुत हिंदी पदांत प्रतिबिंबित आहे.

नामस्मरणा बद्दल नामदेव म्हणतात "प्रणवै नामा ऐसो हरी । जासु जपत भै अपदा टरी ॥; हरि हरि करत मिटे सभि भरमा । हरिके नामु ले ऊतमु धरमा ॥ ग्रं. २७.

राजाराम जपत को को न तरिउ
गुर उपदेसि साध की संगति
भगतु भगतु ताको नामु परिउ ॥ ग्रं. ३७

देवाबद्दलची तळमळ — दे

पानीआ बिनु [illegible] तलु । ऐसे रामनामा बिनु बापुरो नामा ॥
जैसे ताप ते निर[illegible] घ[illegible]ना । तैसे रामनामा बिनु बापुरो नामा ॥ ग्रं. २६

या प्रकारे ग्रंथ सा[illegible] अन्य किती तरी पदांत "नामस्मरणाचें" महात्म्य वर्णिलेलें आहे. (पहा, प[illegible] ३३ वगैरे). गाथा अभंग ६६८ मध्ये भक्ति मार्गाचें स्पष्ट दिग्दर्श[illegible] आहे, परंतु भक्तीच्या दोन्ही प्रकारांचें दिग्दर्शन नामदेवांच्या पदांत [illegible]ळतें. ते सगुणवादी तर होतेच, त्यामुळे व्यक्तोपासना, सगुणोपासना, या अर्थी तर पदें आहेतच, पण पुढे "ज्ञानोतर भक्ती" ची ओळख पटल्यामुळे ते "निर्गुणोपासक" हि होते. अर्थात अव्यक्त, निराकार स्वरूपाचेंहि दिग्दर्शन त्यांच्या पदांत सांपडतें. अशा प्रकारे सगुण-निर्गुणाचा समन्वय आढळतो. ग्रंथ साहेबांतील कांही पदें सगुणोपासनेचें महात्म्य वर्णन करितात तर कांहीत निर्गुणोपासनेचें गुणगान केलेलें आहे. पद संख्या २७, ३७, ३५, ३६, २१ व इतर सगुणोपासना व्यक्त करितात तर २९, ३२, ५४ मध्ये अव्यक्तोपासनेचें महत्व वर्णिलें आहे. ते म्हणतात:—

देवा पाहन तारियले । रामकहत जन कस न तरे ॥
तारिले गनिका, बिनुरूप कुबिजा बिआधी अजामुल तारिअले ।
दासीसुत जन बिदरू सुदामा उग्रसैन कऊ राज दिए ॥
चरन बधिक जनतेऊ मुकतिभए हउ बलि बलि जिन राम कहे ।
जपहीन, तपहीन, कुलहीन, क्रमहीन नामेके सुआमी तेऊ तरे ॥

तसेंच दुसरें पद असें आहे—

हिंदू अंना तुरकू काणा इहां ते गिआनी सिआणा।
हिंदू पुजै देहुरा मुसलमाणु मसीत।
नामें सोई सेविआ जह देहुरा न मसीत॥

माई न होती, बापु न होता करमु न होती काइआ।
हम नही होते तुम नहि होते कवनु कहाते आइआ।

राम कोई न किसहि केरा।
जैसे तरुवर पंखि बसेरा॥

चंदु न होता सूरू न होता पानी पवनु मिलाइआ
सासत न होता वेदु न होता करमु कहाते आइआ
खेचर भूचर तुलसी माला गुरपरसादी पाइआ
राम नामा प्रणवै परमततु है सतिगुर होइ लखानिआ॥

सगुणोपासनेमुळे कांही पदांत परमेश्वराच्या सुंदर ध्यानांचें मोठ्या प्रेमळपणाने आर्तभावाने वर्णन केलेलें आढळतें तर निर्गुणोपासनेमुळे नामदेवांच्या मनांत जें परिवर्तन झालें होतें त्याचें प्रतिबिंब पडलेलें आहे. ज्ञानोत्तर नामदेवांच्या मनांत मूर्तिपूजा, बहुदेवोपासना जप, तप, तीर्थ, दान, यात्रा इत्यादि बद्दल कशी तिरस्काराची वृत्ति बळावली तें या हिंदी पदांत प्रकर्षाने दिसतें.

पद २८ व २९ या परिवर्तित वृत्तीचें सम[illegible] दिग्दर्शन करतात.
पद २८ मध्यें ते म्हणता[illegible]

भैरव भूत सीतला धावै। खर बाहन [illegible]हु, छ[illegible] उडावै॥
हऊतऊ एक रमईआ लैहऊ। आन दे[illegible] बद[illegible]वनि देहऊ॥
सिव सिव करते जो नरू धिआवै। [illegible] डऊरू उमकावै॥
महा माईकी पूजा करै। नरसै नारि [illegible] डतैर॥
तू कहिअत ही आदि भवानी। [illegible]आ कहा छपानी॥
गुरमति रामनाम गहुमीता। प्रणवै नामा [illegible] गीता॥

तर पद संख्या २९ मध्ये परमेश्वराच्या विविध रूपाबद्दल[illegible] कसें उपहासात्मक लिहिलें आहे तें दिसेल. ते लिहितातः—

अजु नामें विठलु देखिआ। मुरखु को समझाऊ रे॥
पांडे तुमरी गायत्री लोधेका खेतु खाती थी
लैकरी ठेंगा टंगरी तोरी लांगत लांगत जाती थी॥
पांडे तुमरा महादेऊ धऊले बलद चढिआ आवत देखिआ था॥
मोदी के घर खाणा पाका वाका लडिका मारिआ था॥
पांडे तुमरा रामचंद्र सो भी आवतु देखिआ था
रावन सेती सरवर होई घरकी जोइ गवाई थी॥

हिंदू अंना तुरकु काणा दुहांते गिआनी सिआणा
हिंदू पूजै देहुरा मुसलमानु मसीत
नामे सोई सेविआ जह देहुरा न मसीत॥

मराठी अभंगातील 'पाषाणाचा देव बोलत भक्तांते। सांगते ऐकते मूर्ख दोघे' हा चरण किंवा "दगडाचा देव इच्छा पुरवीत। तरी का भंगत आघाताने" इत्यादि अभंग १५५ (गाथा) मधील चरण नामदेवाच्या प्रवृत्तीचे उत्कृष्ट निदर्शन करतात. याप्रमाणेच हिंदी पदांत कर्मकांडावर जप, तप, तीर्थस्नान व्रत वैकल्य इत्यादि विधिविधानावर नामदेवांनी अतिशय हडसून खडसून लिहिलें असून त्या संबंधीच्या आपल्या मनांतील विरोधाला तिरस्काराला वाचा फोडली आहे.

वेदशास्त्रसंपन्न पंडितांबद्दल ते म्हणतात—

पंडितु होइके वेदुबखानै। मुरखु नामदेऊ रामहि जानै ॥१७॥

एकादशी व्रत तसेंच इतर व्रतें व तीर्थस्नान यज्ञयागांबद्दल ते म्हणतात.

एकादशी व्रतु रहै काहे कऊ तीरथ जाईं
गुरमति रामु कहि, को को न बैकुंठी गए ॥१८॥
असुमेध जगने ॥ तुला पुरख दाने ॥ प्राग इस्नाने ॥
तऊ न पूजहि हरी कीरती नामा......
अपुने रामहि भजुरे मन आलसिआ ॥ गइआ पिंड भरता ॥
बनारासि असि बसता ॥ मुखि वेद चतुर पढता ॥
सगल धरम आछिता ॥ गुरू गिआन इंद्री द्रिढता ॥
खटु करम सहता रहता ॥
मन छोडी छोडि सगल भेंद। सिमरि सिमरि गोविंद।
भजु नामा सरि तरि भवसिंध ॥ २३ ॥
तीरथ [illegible] न [illegible]लमहि पैसऊ जीअ जंत न सतावऊगो
अठसठि तीरथ गुरू दिखाए घटहि भीतरि नाऊगो ॥ ३१ ॥

अशा प्रकारच्या [illegible] रूढ परंपरा व धार्मिक कर्मकांडी प्रवृतीवर ज्या परमेश्वरप्राप्तीच्या दृष्टीनें [illegible] व व्यर्थ होत, नामदेवांनी मोकळे पणाने तीव्र प्रहार केले आहे [illegible] उत्कृष्ट उदाहरण पदक्रम ३३ आहे. तें संपूर्णच येथे देण्याची [illegible] दावणें शक्य नाही. नामदेव लिहितात.

बानारसि तपु करै उलटि, तीरथ मरै, अगनि देहे, काइआ कलपु कीजै ॥
असुमेध जगु कीजै, सोना गरभदानु दीजै, रामनाम सरि तऊ न पूजै ॥
छोडि छोडि रे पाखंडि मन कपटु न कीजै ॥ हरिका नामु नित नितहि लीजै ॥
गंगा जऊ गोदावरि जाइऐ कुंभि जऊ केदार नाईए, गोमति सहसगऊ दानु कीये ॥
कोटि जऊ तीरथ करै तनु जऊ हिवाले गारै रामनाम सरि तऊ न पूजै ॥
असुदान गजदान सिहजा नारी भूमिदान ऐसो दान नितानितहि कीजै ॥
आतम जऊ निरमाइलु कीजै, आप बराबरि कंचनु दीजै, राम नाम सरि तऊ न पूजै ॥

मनहि न कीजै रोसु जमहि न दीजै दोसु ॥
निरमल निरबाणु पदु चीनि लीजै ॥
जसरथ राइ नंदु राजा मेरा रामचंदु प्रणवै नामा ततु रसु अंमृतु पीजै ॥

मराठी अभंगातून अशा प्रवृत्तीवर नामदेवांनी हल्ला चढविलेला आहेच. या सर्वांतून सोडवणूक करून घेऊन आमोद्धार करून देण्याचें एकमात्र प्रभावी साधन म्हणून विठ्ठल—नामस्मरणाचा पुरस्कारहि तितक्याच प्रभावीपणे केलेला आहे. हिंदी पदांतहि रामनामाचें महात्म्य वर्णन केलेलें आहे. त्याच्या सामर्थ्याबद्दल ते लिहितात,

अण मडिआ मंदलु बाजै । बिनु सावन घन हरू माजै
बादल बिनु बरखा होई । जड ततु विचारै कोई ॥११॥

विश्वव्यापक रूपाचें वर्णन ते पुढील प्रमाणे करतात—

आड कलंदर केसवा । करि अबदाली भेसवा
जिनि आकास कुलह सिरिकीनी कडसै सपत पयाला
परम पोसका मंदरू तेरा—
छपन कोटिका पेहनु तेरा सोला सहज इजारा
भार अढारह मुद्‌गरू तेरा सहनक सभ संसारा
देही महाजिदि मनु मडलान सहज निवाज गुजारै
बीवी कऊला सऊ काइनु तेरा निरंकार आकारै
इह बिधि बने गुपाला ॥४९॥

त्याची सर्व व्यापकता

अकुल पुरख इकु चलितु उपाइआ
घटि घटि अंतरि ब्रह्मु लुकाइआ ॥
जीअकी ज्योति न जाने कोई
तै मै किआ सु मालूमु होई ॥५ ्व ३६

आदि जुगादि जुगादि जुगो जुगु ताका त न जानिआ
सरब निरंतरि रामु रहिआ रवि [illegible] वखाविआ ॥६०॥

ईभै बीठलु, उभैबीठलु, बीठल [illegible] ।सार नही
थान थनंतरि नामा प्र[illegible] तू सरन मही ॥३॥

अशाच प्रकारे इतर पदांत (५६, ५८, ५[illegible] आदि) परमेश्वराच्या विश्वव्यापकतेचें दिग्दर्शन व त्याच्या विविध रूपांचें वर्णन क[illegible]; तसेंच त्याच्या सामर्थ्याची कल्पनाहि या पदांवरून होते.

आत्मा परमात्मा, भक्त व परमेश्वर यांच्या एकरूपते बद्दल त्यांनी परक्रम ३६ मध्येः—को ठाकुरू को दासारे । असें लिहिलें आहे. तसेंच—

ठाकुरू ते जनु जनते ठाकुरू खेलु परिड है तोसऊ ।
आपन देऊ देहुरा आपन आप लगावै पूजा ।
जल ते तरंग तरंग ते है जलु कहन सुनन कऊ दूजा ।
आपहि गावै आपहि नाचै आप बजावै तूरा ॥
कहत नामदेऊ तू मेरो ठाकुरू जनु ऊरा तू पूरा ॥५४॥

आत्माभिव्यक्ति, मनाची व्यथा पुढीलप्रमाणे व्यक्त केली आहेः—

मनकी बिरथा मनुही जानै कै बूझल आगै कहिए ॥
अंतरजाणी रामु रवाई मै डरू कैसे चहीए ॥५९॥

मोकउ तू न विसारि तू न विसारि तू न विसारि रामइआ ॥
तू जू दइआलु क्रिपालु कहिअतु है अतिभुज भइउ अपारला ॥५७॥
मै वऊरी मेरा रामु भतारू रचि रचि ताकउ करऊ सिंगारू ॥
भले निंदक भले निंदक भले निंदक लोगू तनु मन राम पिआरे जोगू ॥४१॥

राम, रहिम, हिंदू मुसलमान, अल्लाह आणि परमेश्वर हें सर्व एकच आहे असा उपेदश अगदी प्रत्यक्ष शब्दांत केलेला नसला तरी पद. ७, २१, २०, ४७ यांत तो अप्रत्यक्षतः आढळतो. पद ४७ मध्ये सुलतानाचा विरोध चमत्काराच्या (अर्थात भक्तीच्या सामर्थ्याची प्रचीती आणून) द्वारे घालवून त्याला नम्र केलें आहे तर पद ७ मध्ये " एकै पत्थर कीजै थाऊ । दूजै पत्थर धरिए पाऊ ॥ जै उहु देऊ त उहू थी देवा ॥ असा युक्तिवाद केला आहे. पद २१ मध्ये द्वारकाधीशाचें ध्यान मोगलाच्या स्वरूपांतच पाहिलें तर पद २० मध्ये परमेश्वर हाच अल्लाह, अली आहे असें म्हटलें आहे. हा प्रयत्न समन्वयासाठी असावा !

यांप्रकारे नामदेवांच्या हिंदी पदांतील विचारसरणीचे स्वरूप आहे. शेवटीं **गुरु महात्म्य, भक्तीचा महिमा, जाति पाति उच्च नीच** आदि भेद भाव यासंबंधी हि त्यांनी या पदांतून आपलें अंतर्मन मोकळें केलें आहे. "भक्ति" हीच मुक्ति असली तरी "भक्ती" चें यथार्थ ज्ञान होण्यासाठी गुरूपदेशाची आवश्यकता असते. म्हणून प्रस्तुत पदांतून **गुरूच्या सामर्थ्याबद्दल** अनके जागीं लिहिलें आहे. एक संबंध पद तर गुरुवर्णनाकरितांच निर्माण झालेलें आहे (पद ४८). ते लिहितात :—

बिन गुरुदेऊ अवर नही जाई [illegible] नामदेव गुरुकी सरणाई ॥४८॥
जाके मसतकि लिखिइ करमा [illegible] भजि परि है गुरकी सरना ॥४५॥
साई प्रीति जि आपे ल[illegible] । गुर[illegible]परसादी दुबिधा जाए ॥४४॥
इकु नामु निसतारै । जि[illegible] गुरू मिलै तिह पारि ऊतारै ॥४२॥
सफल जनमु मोकउ गुरि [illegible] दुख बिसारि सुख अंतरि लीना ॥२२॥

जाति-पाति, उच्चनीचतेबद्दल [illegible]लिहितातः—

" कहा करउ जा[illegible] कहा करउ पाती
रामको नामु [illegible]उ दिनराती ॥४॥

खऱ्या भक्तीनेच परमेश्वर प्रसन्न होत असतो. त्याच्या दृष्टीने जात पात, उच्चनीचता, विषमता इत्यादि कशाचेंच अस्तित्व नसते. तो तर भावाचा भुकेला असतो व म्हणूनच "भक्तासाठी धांवत" येऊन त्याच्या संकटाचा परिहार करतो. नामदेवांना याचा चांगलाच अनुभव होता. पंडितांनी त्याला नीच ठरविलें पण परमेश्वराने त्यांना फजीत केलें.

" ए पंडिआ मोकऊ ढेढ कहत तेरी पैज पिछऊडी होईला ॥५६॥

परंतु सामाजिक विषमतेची झळ त्यांना स्वतःला सहन करावी लागल्यामुळे शेवटी ते परमेश्वराला विनवितात—

" ऐसा अधमु अजाति नामदेऊ तऊ सरनागति आइअले ॥३५॥
हीनडी जात मोरी जादमराइआ । छीपेके जनमि काहे कऊ आइआ ॥४३॥
बंधन मुकता, जातु न दीसै ५८॥

असें जरी असलें तरी त्यांना भक्तीचें महात्म्य पूर्णपणे कळलेलें होतें. त्यांना या उपाधींची विशेष काळजी नव्हती व तीच गोष्ट त्यांनी लोकांवर बिंबविण्याचा प्रयत्न केला आहे.

" नामा कहे भगति बसि केसव अजहू बलि के दुआर खरो ॥३७॥
मेरी बांधी भगतु छडावै बांधै भगतु न छुटै मोहि ॥५५॥

एवढेंच नव्हेतर परमेश्वरांवरील अढळ निष्ठेमुळे कितीहि संकटें आलीं तरी भक्ति सोडणार नाही असें म्हटलें आहे:—

" तेरी भगति न छोडऊ भावै लोगु हसै–५०
" गंग जमुन जऊ उलटी बहै। तऊ नामा हरि करता रहै "–४७

शेवटी आत्मोद्धार करणें स्वतःच्या हातांतच आहे. कर्म बंधनें सांसारिक मायापाश इत्यादि पासून सुटका करून घेऊन स्वतःला त्या अनन्तांत विलीन करणें स्वतःच्याच हातीं आहे, हें सांगताना ते म्हणतात.

" जिऊ प्रगासिआ माटी कुंभेऊ। आपही करता बीठलु देऊ ॥
" जिमका बंधनु करमु बिआपै। जो किछु किआ सु आपै आपै ॥
प्रणवति नामदेऊ इहु जीऊ चितवै सुलहै। अमरू होइ सद आकुलु रहै –६१

वरील प्रमाणे नामदेवांच्या हिंदी पदांत (विशेषतः ग्रंथसाहेबांतील) व्यक्त होणारे विचार प्रवाह वानगी दाखल मराठी वाचकांसमोर ठेवण्याचा प्रयत्न केला आहे. अधिक चिकित्सक व सूक्ष्म अभ्यासाची आवश्यकता आहे. तसें झालें तर किती तरी नवीन तितकीच आजवर अंधारांत असलेली ही "खाण" उजेडांत आणली जाऊं शकेल.

शेवटी श्री नामदेवरायांच्या गाथ्यांतील [illegible] हिंदी पदें देऊन प्रस्तुत त्यांच्या हिंदी पदासंबंधीं प्रारंभिक व प्राथमि[illegible] परिच[illegible] करून देण्याच्या हेतूने लिहिलेला लेख संपवितों. पदें देण्यापूर्वी [illegible]साहे[illegible]तील पदांबद्दल एक गोष्ट सांगणें आवश्यक आहे. ती अशी की या सगळ्[illegible]च प[illegible]ची विभागणी रागावरून केलेली आहे. संगीतातील कांहीं राग घेऊन ही [illegible] यांत विभागलीं आहेत. शिख गुरुद्वाऱ्यातून अखंड पाठ किंवा इतर पूजा [illegible] या पदांच्या गायनाचा प्रघात आहे. ह्या दृष्टीनेच ही विभागणी केलेली आ[illegible]. परंतु रागलक्षण किंवा प्रकृति व पदांतील विषयांचा कितपत मेळ आहे हा स्वतंत्र अभ्यासाचा विषय होण्यासारखा आहे. माझ्या माहितीप्रमाणे आजकाल या रागानुसार भजन गायन फारसें होत नाही आणि होत असलें तर तें बहुधा ओढून ताणूनच असतें. यासंबंधीं सध्यातरी अधिक सांगण्या सारखें कांही नाहीं.

गाथा पद २३३१

हम तो भुले ठाकुर जाने। तुम क्यौं भाई झूट दिवाने ॥१॥
नाला अपआप सागर हुआ। काहेके कारण रोता है कुवा ॥२॥
चंदनके साती निंब हुआ चंदन। क्यौं कर रोवे देखो ए हिंगन ॥३॥
गुरु के मेहेरसे नामा भये साधु। देखत रोवे लगे जन हे भोंदु ॥४॥

गाथा पद २३२७

जहां तुम गिरीवर ताहां हम मोरा। जहां तुम चंदा तहां मै चकोरा।
जहां तुम तरुवर तहां मै पंछी। जहां तुम सरोवर तहां मै मच्छी।
जहां तुम दीवा तहां मै बत्ती। जहां तुम पंथी तहां मै साती ॥
बेलके पाती शंकर पूजा। नामदेव कहे भाव नही दूजा ॥

महाराष्ट्र

विनोबांचें एक भाषण

★

या खेपेस वेगवेगळ्या प्रांतांतील कार्यकर्त्यांना प्रत्यक्ष भेटण्याचा हा उपक्रम माझ्या इच्छेने करण्यांत आलेला आहे. आतांपर्यंत सर्वसामान्य कार्यकर्त्याशी परिचित राहूं शकलों नाही. तसा परिचय व्हावा अशी इच्छा होती परंतु ती आक्रमणकारी नव्हती. आतां असें वाटूं लागलें आहे कीं कार्यकर्त्यांशी बाह्यपरिचय करून घेतल्याने कांही नुकसान तर होणार नाहीच, उलट झाल्यास फायदाच होईल म्हणून हा उपक्रम सुरू करण्यांत आला आहे.

महाराष्ट्राचा माझ्यावर जास्त अधिकार

मी महाराष्ट्राकडे विशेष लक्ष दिलें नाही, देत नाही. महाराष्ट्रांत विशेष फिरत नाही, बाहेरच हिंडत असतों अशी पुष्कळ्याच लोकांची तक्रार आहे. इतर प्रांतापेक्षां महाराष्ट्राचा माझ्यावर जास्त अधिकार आहे हें मला मान्य आहे परंतु मी महाराष्ट्राकडे लक्ष देत नाही हें म्हणणें बरोबर नाही.

माझें हृदय मराठींतूनच व्यक्त होतें

मी जें कांही चिंतन-मननपूर्वक लिहिलें आहे व सध्याहि लिहीत असतों तें सर्व मराठींतच लिहिले व लिहीत असतों. येवढ्याने मी माझें कर्तव्य केलें असें मी मानतों. हा पक्षपात मी मुद्दाम करतो असें नव्हें. एक संस्कृत वगळल्यास मराठी भाषेइतका मी दुसऱ्या कोणत्याहि भाषेचा अभ्यास केलेला नाही. मला सुमारे दहा बारा भाषा मामुली येतात. त्याचें ज्ञान रुपयांत चार पैसे इतकेंच. परंतु माझ्या डोक्यांत मूळ विचार मराठींतच येतो. त्याच भाषेच्या आधारे चिंतनहि घडतें. माणसाचें सगळें हृदय त्याच्या चिंतनयुक्त लेखनांतून व्यक्त होतें अशा प्रकारे माझें हृदय मराठींतून व्यक्त होत असतें. येवढ्याने माझें कर्तव्य होतें किंवा नाही तें तुम्हीच ठरवा. शिवाय गेलीं तीस वर्षे माझें कार्यक्षेत्र मराठीच आहे हीहि गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे. अर्थात हें क्षेत्र मुद्दाम ठरविलेलें नसून सहजगत्या लाभलेलें आहे.

स्वदोषाची जाणीव आपल्याला हवी

महाराष्ट्रांतील लोकांनी एकमेकांविषयी प्रेम व अभिमान बाळगावयाचा तर परस्परांच्या दोषांची जबाबदारीहि पत्करली पाहिजे. आमच्याविषयी अन्य प्रान्तीयांच्या मनांत कांही गैरसमज आहेत. आणि कांही कांही दोषांचें आरोपण आमच्यावर करण्यांत येतें. त्यांपैकी कांही दोष चुकीनेहि लादले गेले असण्याची शक्यता आहे

परंतु आमच्या कांही कांही दोषांविषयींचें योग्य भान जें बाहेरच्या लोकांना आहे तें वस्तुतः आपल्यालाच जास्त असलें पाहिजे. एकूण हिन्दी लोक फारच क्षमाशील व दोषविसराळू आहेत. हा दोषविसराळूपणा जर आमच्यामध्ये नसता तर येशू खिस्ताच्या हत्येचें पाप जसें युरोपमध्ये दोन हजार वर्षांनंतरहि अजून सतत राहिलें आहे तसें गांधीहत्येचें पाप इतर प्रांतीयांच्या मनांत सतत राहिलें असतें. परंतु गांधी-हत्येविषयीचा क्रोध दिवसेंदिवस कमी होत चालल्याचें दिसून येतें. आणि कांही काळानंतर गांधींचा खून करणारा कोणीतरी वेडा होता असें समजून लोक त्याला पूर्णपणे विसरुन जातील.

भारत विवेक सहसा गमावणार नाही.

हीच स्थिति अिंग्रजांच्या बाबतींतहि दिसून येते. अिंग्रजांनी आमच्यावर अनन्वित जुलूम केला आणि आम्ही त्यांच्याबरोबर लढा देऊन स्वातंत्र्य मिळविलें. असें असूनहि त्यांच्या विषयी आज आमच्यामध्ये फारशी द्वेषबुद्धि नाहीं याचे अेक कारण गांधीजींची शिकवण हें असलें तरी मुख्यतः हा देश दोषविसराळू आहे हेंच त्याचें कारण होय. हा देश फार अनुभवी असल्यामुळेच त्याच्या स्वभावांत हा दोषविसराळूपणा आला आहे असें मला वाटतें. तो प्रत्येक पाऊल विवेकाने टाकतो. तो आपला विवेक सहजासहजी गमावणार नाही व कोणाच्याहि मागे सहसा अेकदम जाणार नाही किंवा नवीन सुधारणाहि लौकर ग्रहण करणार नाही. आमची जनता मोठमोठ्या राजांचे उपकार मानीत नाही. परंतु लहान मोठ्या साधूसंतांचें स्मरण मात्र कायम ठेवते.

वृत्तीप्रमाणे कृतिहि उदात्त पाहिजे[१]

पहिला शेतीचा शोध हिन्दुस्तानांत लागला असला पाहिजे असें माझ्या मनाने घेतलें आहे. या शेतीच्या शोधामुळेच भारतभूमि ही पुण्यभूमि मानली गेली. जुन्या काळीं, अितिहासपूर्वकाळीं या ठिकाणीं संघराज्यें होऊन गेलीं यामुळे हिन्दुस्थानचा देशाभिमान हा आंतरदेशाभिमानाच्या स्वरूपाचा म्हणजे खूपच व्यापक आहे. परंतु वृति उदात्त असूनहि आमची कृति मात्र उदात्त नव्हती यामुळे आपल्याला आपल्या पारतंत्र्याबद्दल अितकी तीव्र चीड आली नाही.

व्यापकता सक्रिय करा

आज राजकारण जीवनव्यापी झालें आहे. जगावयाचें असेल तर त्याला टाळतां येणार नाही. म्हणून सज्जनानी जरी त्यांत सक्रिय भाग घेतला नाही तरी त्या विषयीं सावधानता चिंतन आणि त्यावर परिणाम घडवून आणण्याइतकी दृढता बाळगली पाहिजे. आजच्या सरकारबद्दल लोकांच्या अनेक तक्रारी आहेत. परंतु त्याच्याबद्दल आदर नाही असें मात्र नाही. आजहि जवाहरलाल नेहरू जेथे जेथे जातात तेथे लाखो लोक जमतात आणि ते सांगतील तें करायला तयार होतात. तरीपण आमची जनता अनुभवी असल्यामुळे ती फार उत्साह दाखवू शकत नाही. त्याचप्रमाणे शाबुत डोक्याची माणसें आपल्या देशांत जितकीं आहेत तितकीं अितर देशांत नसावीत असें मला वाटतें. हें लक्षण फार चांगलें आहे. यामुळेंच आपल्या देशांत फार चळवळी होत नाहीत. आकाश हें व्यापक असतें तें चळवळ करीत नाही, परंतु अितरांच्या चळवळीला वाव देतें. याच्या उलट फुंकणींतील वारा हा संकुचित असल्यामुळे तो मोठमोठया चळवळींना जन्म देतो.

आमच्या जनतेचें मन अनुभवीपणामुळे व्यापक झालेलें आहे. खेड्यांतील जनतेसमोर देश आणि जग यावर व्याख्यान दिलें तर तिला जगभावनाच जास्त प्रिय वाटते. आतां या व्यापकतेला एका फुंकणींत घालून सक्रियता निर्माण केली पाहिजे.

सूक्ष्म विचार हा सम्यक् विचार

गेल्या तीन चारशे वर्षांत महाराष्ट्रांतील आम जनता वगळल्यास बहुतेक सर्वांना अत्यंत स्थूल विचार करण्याची संवय लागली आहे. जेव्हा स्थूलाचा विचार सूक्ष्माला सोडून होतो तेव्हा तें मूळ वगळून झाडाचा विचार केल्यासारखें होतें. त्यामुळे तो सम्यक् विचार होऊं शकत नाही. ज्ञानेश्वरीइतकी खोली आम्हाला पेलत नाही. तितक्या खोलींत गेल्यास आपण निष्क्रिय बनूं कीं काय अशी भीति आम्हाला वाटते. यामुळे पाश्चात्यांच्या उथळपणाचें अनुकरण करण्याची वृत्ति आमच्यांत वाढत आहे. तसें पाहिल्यास महाराष्ट्रांत गीतेचा जितका अभ्यास झाला आहे व होत आहे तितका इतर कोणत्याहि प्रान्तांत होत नसेल. (अलीकडे गांधीजीमुळे गुजरातेंत गीतेचा अभ्यास वाढला आहे ही गोष्ट वेगळी) परंतु अलीकडे आम्ही तिचा अर्थ फारच स्थूलपणे काढूं लागलों आहोंत. उदाहरणार्थ ' ये यथा मां प्रपद्यन्ते ' या श्लोकाचा अर्थ ' जशास तसें ' या न्यायाचा आहे असें आजपर्यंत कोणालाहि वाटलें नाही; तशी टीका कोणाला सुचली नाही. कारण ' जशास तसें ' म्हणजे आपलें ' इनीशिएटिव्ह ' दुसऱ्याच्या हाता देणें, तो जसा नाचेल तसें आपण नाचलें पाहिजे, तो वांकडा झाला कीं मींहि वांकडें झालें पाहिजे असें मानणें होय. परंतु आतां त्या श्लोकांतून ' जशास तसें ' हा अर्थ काढण्यांत आला आहे. पूर्वी पारतंत्र्यांतील चीड व्यक्त करण्यासाठी हा अर्थ करण्यांत आला असें गृहीत धरलें तरी आतां जहाल व मवाळ अशा दोन्ही प्रवृत्तीच्या लोकांना तोच अर्थ बरोबर वाटूं लागला आहे ही चिंताजनक गोष्ट आहे.

ज्ञानेश्वरांचा वारसा ओळखा

आपल्याकडे 'आमची संस्कृति' असें म्हटलें कीं मध्यम वर्गाला पेशवाईची जितकी आठवण येते तितकी ज्ञानेश्वर-एकनाथाची होत नाही. वस्तुतः ज्ञानेश्वरांचा त्या काळच्या लोकांनी अतोनात छळ केला, त्यांच्यावर बहिष्कारहि टाकला परंतु त्यांनी जनतेला दोष अथवा ठपका दिल्याचा, तिच्याबद्दल एकहि उद्गार काढल्याचा दाखला त्यांच्या साहित्यांत आढळत नाहीं. ज्ञानेश्वरींत एकहि कटु शब्द पहावयाला मिळत नाही. अहिंसेचे उत्तम आचार्य महात्मा गांधी आणि टॉलस्टाय यांच्या लिहिण्यांतहि अनेक कटु शब्द सांपडतात, येशूख्रिस्तानेहि आपल्याला छळणाऱ्या जनतेची तीव्र शब्दांत निंदा केली आहे. परंतु ज्ञानेश्वरांच्या लिखाणांत एकहि कटु शब्द आढळत नाही. म्हणून महाराष्ट्रीय जनतेला ख्रिस्त धर्मीयापेक्षांहि अधिक अहिंसेचें बाळकडू मिळालें आहे असें मी म्हणतों. तसेंच सत्याग्रहाचा उत्तम नमुना एकनाथानें आपल्या जीवनांत दाखवून दिला आहे. अशा प्रकारे सत्य आणि अहिंसा हीं दोन्ही तत्त्वें आपल्याला नवीन नाहीत. महाराष्ट्रीय संतांनी तीं पूर्वीच आम्हाला शिकविलीं आहेत.

शाश्वत नेतृत्वाची तयारी

आपण स्थूलवृत्ति सोडली तरच महाराष्ट्राच्या हातून कांही काम होऊं शकेल. अहिंसेसंबंधी विचार करतांना आपण ' गांधींची अहिंसा ' असें म्हणतों परंतु अहिंसा

ही कांही अेकट्या गांधींच्या मालकीची नव्हे. जो कोणी तिच्या संबंधीं विचार व आचार करील त्याची ती आहे. त्यासाठी आधी मताधिक्य झालें पाहिजे असें वाटण्याचें कारण नाही. आपण आपली साधना करीत राहावें. मताधिक्याची (मेजॉरिटीची) चिंता आपण करूं नये. मला जर लष्करी भरती मान्य नसेल तर मी तिचा प्रचार कां करावा ? मी अल्पमतात (मायनॉरिटींत) आहे म्हणून मनाला खंत कां वाटावी ? व बहुमतांत (मेजॉरिटींत) जाण्याची घाई मला कां व्हावी ? सारी दुनिया जेव्हा थकून जाईल तेव्हा ती एका विचाराकडे आल्याशिवाय राहणार नाही. त्या विचाराचें पोषण आपण केलें तर उशीरा कां होईना, पण जगाचें शाश्वत नेतृत्व आपल्याला मिळेल अशी श्रद्धा आपल्याठिकाणीं असली पाहिजे. ' तुरत दान महापुण्य ' पद्धतीचें तात्कालिक परंतु अशाश्वत नेतृत्व काय कामाचें ? आपलें म्हणणें पुष्कळ माणसांनी ऐकलें पाहिजे असें आम्हाला वाटतें पण आपल्याला 'पुष्कळ' हवींत कीं 'माणसें' हवींत ? 'पुष्कळ' हवीं असतील तर धीराने गेलें पाहिजे, घाईचें नेतृत्व मिळविण्याची धडपड करतां कामा नये. हिंसेने कधीहि कल्याण होणार नाही हें ओळखून आपण अहिंसेच्या मार्गानें चालू लागलें पाहिजे. सूर्योदय होतांच सर्व ताऱ्यांना जावयाचें असतें. म्हणून आपण सूर्योदयाची तयारी केली पाहिजे. आज निवडून येऊन पुढील वर्षी धक्का खाण्याऐवजी आपण अशी स्थिति निर्माण केली पाहिजे की मी निवडून आल्यानंतर पुन्हा निवडणुकांची जरूरच राहणार नाही. वस्तुतः सर्वोदय समाज म्हणजे कांही फार मोठी संस्था नव्हे, परंतु यूरोप-अमेरिकेंतील लोक त्याच्याकडून मार्गदर्शनाची अपेक्षा राखतात. याचा अर्थ साऱ्या जगाचा प्रवाह एकाच केंद्राकडे चालला आहे. आज त्या केंद्राजवळ आमचें डोळे नसलें तरी पाय आहेत ही कांही कमी समाधानाची गोष्ट नव्हे.

एका तोंडाबरोबर दोन हातहि मिळतात

पृथ्वीला संख्येचा भार होत नसतो, पापाचा भार होत असतो. म्हणून पाप कसें कमी होईल याचा आपण प्रथम विचार केला पाहिजे. पुण्याने उत्पन्न झालेले प्राणी पुण्यात्मे असतात. त्यांचा भार पृथ्वीला होत नाही. ईश्वराची योजना अशी सुंदर आहे कीं एक तोंड वाढलें की त्याबरोबर दोन हातहि निर्माण होत असतात. हिन्दुस्तानची लोकसंख्या ३६ कोटी झाली, ३६ कोटी तोंडें खाणारीं झालीं म्हणून रडत बसणार कीं ७२ कोटी हात काम करण्यास उत्पन्न झाले म्हणून आनंद मानणार ? याच्या उलट तोंडें दोन आणि हात एक अशी स्थिती असती तर काय अनर्थ ओढवला असता याची कल्पना करा म्हणजे सद्यःस्थितीबद्दल दुःख वाटणार नाही. म्हणून संख्यावाढीला भिऊं नका. त्याची चिंता करायला पृथ्वी समर्थ आहे. माझ्या घरांतील लोकांना पोटभर खायला घालण्याइतकी बुद्धि माझ्याजवळ असली पाहिजे. आजची लोकसंख्या पापामुळे अफाट वाढून राहिली आहे तें पाप नाहीसें करा म्हणजे लोकसंख्येचें भय तुम्हाला वाटणार नाही.

कवी आणि कविता

गडकरी—"प्रेम आणि मरण"

शरत्‌चंद्र मुक्तिबोध

★

कल्पनेचें धाडस व चमत्कृति हा जर काव्याचा एक मुख्य गुण मानला तर त्या बाबतींत गडकऱ्यांची बरोबरी करणारे कवि किती निघतील असा प्रश्न टाकण्यास मुळींच हरकत नाही, असे उद्‌गार नरसिंह चिंतामण केळकर यांनी गडकऱ्यांच्या काव्याविषयी काढले आहेत. आधुनिक मराठी काव्याच्या उत्थान-कालांतील पहिल्या टप्याचे गडकरी शेवटले कवि होते. गडकऱ्यांच्या वाङ्मयाला जी अफाट लोकप्रियता आली ती त्यांच्या अचाट कल्पना शक्तीमुळे आणि चमत्कृतिमुळेच होय या बाबतींत दुमत होण्याचें कारण नाही. त्यांचें वैशिष्ट्य त्यांच्या शैलीचें वैशिष्ट्य होतें, त्यांच्या कल्पनेचें वैशिष्ट्य होतें, त्यांच्या अगणित शब्दद्रव्यांचें वैशिष्ट्य होतें. केशवसुत, रेवरंड टिळक आणि बालकवि यांच्या कवितेंत जी प्रतीति, जी सखोलता, जो गंभीर काव्याशय प्रकट झालेला आहे त्या प्रकारची काव्यात्मता गडकऱ्यांच्या वाङ्मयाला आलेली नव्हती हें उघड आहे. केशवसुतांची समाजाभिमुख क्रांतिकारक अनुभूति, टिळकांचें निसर्ग व मानवसंबंधांचें उदात्त चिंतन, बालकवींची निसर्गाशी झालेली शिशुसुलभ तल्लीनता या पेक्षा गडकऱ्यांच्या कवितेची प्रकृतीच निराळी होती. आणि—

आधींच कवीचा वाग्विलास
तरी मग श्रवणीं तुंबळे रस
कवीचेनि मति प्रकाश
कवित्वास होय।

या रामदासांच्या उक्तीप्रमाणे गडकऱ्यांची कविता वाचून रस तुंबळतो कीं काय आणि परिणाम स्वरूप 'मति प्रकाशते' काय यावर विचार व्हावयचा आहे.

केशवसुत, टिळक आणि बालकवि यांच्या काव्यामुळे आधुनिक मराठी काव्य आशयाच्या दृष्टीने वरच्या पातळीचें झालें. गडकऱ्यांनीहि प्रेमाविषयक काव्य लिहिलें, गूढवादी काव्य लिहिलें, शाहीरी थाटाची कविताहि केली. परंतु त्यांचें प्रेमकाव्य हें कल्पनाचमत्कृतिप्रधान काव्य होतें, प्रतीतिपूर्ण काव्य नव्हतें; त्यांचा गूढवाद पारंपरिक तत्वज्ञानाची छायाच फक्त होता; त्यांच्या आंतरिक ओढीची ती विकासावस्था नव्हती. या दृष्टीने गडकऱ्यांचें काव्य मराठी कवितेच्या ऱ्हासाचा आरंभच सूचित करतें. पारंपारिक विचारापलीकडे ते कधींहि जाऊं शकले नाहीत असें दिसतें. म्हणूनच केळकरांनी कल्पनेचें धाडस आणि चमत्कृति हेंच गडकऱ्यांच्या कवितेचें

एकमेव–वैशिष्ट्य मानलें आहे आणि गडकऱ्यांची मराठीला देणगी म्हणजे त्यांची अस्सल मराठी बाण्याची शैली आणि कल्पनाचमत्कृति हीच होय.

गडकऱ्यांच्या बऱ्याच कविता आध्यात्मपर आणि गूढ गूंजनात्मक आहेत. 'कलगीचें गाणें,' 'फुटकी तपेली,' 'प्रेमप्रलय' इत्यादि कविता त्यांच्या अध्यात्मपर कल्पना दाखवितात. त्यांच्या 'मुरली' या कवितेंत प्रेमाची भक्तींत परिणति कशी होते हें सांगितलेलें आहे. अशी परिणति प्रेमयोगी सूरदास किंवा मीराबाई यांच्या आयुष्यांत झालेली होती. त्यांचें सारें आयुष्य या गाढ प्रेमांत निमग्न झालेलें होतें. व त्यांचें स्वरुप अधिकाधिक विस्तार पावून भक्तींत परिणत झालेलें होतें. म्हणून महाकवि सूरदास किंवा मीराबाई यांच्या तन्मय संगीताने अखिल भारत वेडा झालेला होता. आत्म्याची ही पारमार्थिक दृष्ट्या उत्क्रांति, जीवाने घेतलेलें हें वेड, गडकऱ्यांच्या आत्म्याच्या वाट्यास आलेलें नव्हतें! म्हणजेच 'प्रेमांतून भक्तींतली परिणति' ही एक नितांतसुंदर काव्यकल्पना म्हणूनच गडकऱ्यांना गवसली व त्यांचा कल्पक आत्मा मराठींतील कल्पनेच्या दृष्टीने भव्य अशी ही कविता गाऊन गेला. 'मुरली' ही कविता म्हणजे अनेक कल्पनांची माळ. ही कविता वाचताना प्रेमांतून भक्तीच्या उदात्त भावनेपर्यंतचा संस्कार वाचकांच्या मनावर घडत नाही तर एखाद्या लहान मुलाप्रमाणे कल्पनांच्या अनेक विश्वांत मन संचार करून तें विस्मयचकित होतें. मग गडकऱ्यांनी गूढगूंजनात्मक म्हणाविणारी कविता कां लिहिली? त्यांची गूढगूंजनात्मक कविता त्यांच्या व्यक्तित्वाच्या एका गरजेची पूर्ति करीत असली पाहिजे हें निःसंशय. त्याशिवाय ती लिहिली गेलीच नसती. त्यांच्या अनेक अध्यात्मपर कवितांतून अतृप्त असें एक विपन्न व्यक्तित्व प्रकट होतें. आपल्या निष्प्रेम अशा जीवनाची कबुली त्यांनी जागोजाग दिली आहे. 'फुलें वेंचली पण' या कवितेंत पुढील टीप आहे—"प्रेमस्थान नाही अशा माणसास चांगल्याने सुद्धा खेदच होतो." व पुढे स्पष्टच म्हटलें आहे कीं—

"निष्प्रेमाचें जविन माझें रुक्ष चिंतनी जावें
संकल्पाचि हा वरला ठरला कां हें दैवा ठावें"

"अवेळीं ओरडणाऱ्या कोकिळेस" या कवितेंत त्यांनी आपल्या हृदयाची ही स्थिति स्पष्ट सांगितलेली आहे—

हातीं संसाराची माती
मनिच्या आशा मनास खाती
भूतकाळचीं भूतें रडतीं
मिटल्या जाग्या डोळ्यापुढती शून्याचें मैदान

निष्प्रेमाची शेज सोबती
भयाण दुनिया सारी भोवती
विषण्ण येती विचार चित्तीं
बाह्यांतर विश्वांत खेळते उदासीनता एक.

असा हा आपल्या जीवनाचा रखरखीत उन्हाळा झालेला आहे; तेव्हा कुणी स्त्रीहृदय अशा जगावर एक सहानुभूतीचा अश्रु टाकील अशी त्यांनी अपेक्षा व्यक्त

केलेली आहे. गडकऱ्यांच्या या स्वतःच्या दुःखाचा जसाच्या तसा आविष्कार करणाऱ्या कवितांच्या उदास सौरभांतूनच त्यांच्या मनाचें अंतर्द्वंद्व प्रकट होतें यांत शंका नाही. गडकऱ्यांची गूढ गूंजनात्मक कविता कवीच्या या अतृप्तीस शांतविण्या-साठीच लिहिली गेली आहे. जीवनांतील अनंत अन्याय आणि विरोध, जीवनाच्या सहज इच्छा-आकांक्षावर येणारीं दडपणें या सर्वांचा वास्तविक जीवनांत निरास करता येणें शक्य नसल्यामुळे अध्यात्मिक प्रवृत्ति नसलेले गडकरी अध्यात्माकडे धांव घेतात आणि गूढगूंजनाच्या नांवाखालीं विपरीत परिस्थितीचा काल्पनिक निरास करून कल्पनेचें तरल तेजस्वी जाळें गुंफतात. कल्पनेच्या दृष्टीने हीं काव्यें सुंदर असलीं तरी त्यांत आध्यात्मिक व्यक्तित्वाची गहनता, विश्वस्तपणा आणि तटस्थ करुणा दिसून येत नाही.

"फुटकी तपेलीं" या कवितेंत पुढील टीप दिलेली आहेः—

"आत्मज्ञान मायेतून गळूं लागलें म्हणजे आत्मा अगतिक होतोच." अगतिकता आणणारी माया म्हणजे बाह्य सामाजिक वास्तवता. ती ग्रासूं लागली कीं अगतिकता येणारच. ही अगतिकता नको असेल तर ग्रासणाऱ्या, 'मायेस' जाणून घेतलें पाहिजे; तिच्याशी लढलें पाहिजे. पण तसें कांही करायचें कसें ?

अशी "तपेली"च नको—

'नको तपेली फुटकी असली
जीव बोलतो पाणी पाणी
चिरकालाची तहान लागुनि

ही तहान कोण शमवील ? त्याची जाणीवहि कवीला होत नाही. ही तहान कोठेतरी अनंतात विलीन झाल्याने शमते म्हणतात. गडकऱ्यांचा गूढवाद व प्रतीतिधर्मी गूढवाद यांत फरक हाच की त्या गूढवाद्यांची अनंताच्या प्रेमाशी झालेल्या तदात्मतेची किंवा त्यासाठी झुरणाऱ्या मनाची अभिव्यक्ति अत्यंत मार्मिक आहे तर गडकऱ्यांचें अध्यात्म म्हणजे वास्तविक जीवनाची क्षतिपूर्ति (compensation) आहे.

गोविंदाग्रजांच्या अध्यात्माचा विस्तृत विचार करण्याचें कारण त्यांच्या गूढ-वादांतलि पलायन प्रवृत्तीचें जें मूल कारण त्यांतूनच त्यांचें प्रेमकाव्यहि निपजलें आहे. व शृंगाररसप्रधान 'कृष्णाकाठीं कुंडल' सारख्या वर्णनात्मक काव्यांत मोठ्या नाट्यपूर्ण पद्धतीने स्वतःच्या अप्रतिम वर्णनशैलीचा परिचय जरी दिला असला तरी प्रतीतिपूर्ण प्रेमकाव्य त्यांनी लिहिलें नाही हेंहि खरें आहे. आपल्या अत्यंत भकास आयुष्याची ग्वाही त्यांनी अनेक कवितांतून दिली आहे. कवीसारख्या अत्यंत संवेदनशील व्यक्तीस अस्सल प्रणयाची, प्रेमाची प्राप्ति झालेली नसली तर बौद्धिक प्रेमकाव्य जन्मास येणें अपरिहार्यच ठरतें. गडकऱ्यांच्या 'गुलाबी कोडें' 'गोड निराशा'—या सुंदर कविता म्हणजे प्रेमावर गडकऱ्यांनी केलेलीं कल्पना-सुंदर भाष्येंच होत. मध्यमवर्गीय हिंदु भारतीय संस्कृतींत जन्मलेल्या गडकऱ्यांना मोकळ्या प्रणयाची उत्कट अनुभूति अनुभवावयास मिळणें केवळ अशक्य होतें. आणि रूढिप्रिय गडकऱ्यांच्या बाबतींत सर्व रूढ सामाजिक कल्पनांना लाथ मारून त्या बाबतींत स्वतःचें व्यक्तित्व श्रीमंत करून घेणें शक्य नव्हतें. या बाबतींत लाग-

णाऱ्या लढाऊपणाच्या अभावीं त्यांचें प्रेमकाव्य म्हणजे सुंदर कल्पनांची मांखळी व्हावी यांत नवल तें काय ? फ्रेंच राज्यक्रांतीने पुरस्कारलेलें व्यक्तिस्वातंत्र्य, समता आणि बंधुभाव या तत्वांचा जो प्रकाश केशवसुतांच्या कवितेंत फाकला त्या व्यक्ति-स्वातंत्र्याच्या वाण्याचा गडकऱ्यांच्या कवितेंत त्याग झालेला आढळेल. आणि म्हणून त्यांची प्रेमपिपासा कोंडीत तळमळत अतृप्त राहिली आहे. आणि म्हणूनच त्यांचें प्रेमकाव्य निराशामूलक (tragic) आहे. स्त्री ही जोंवर हिंदु कौटुंबिक सरंजामशाही बंधनात बद्ध आहे तोंवर प्रेमाची कहाणी दुःखांतच होणार आणि म्हणूनच अशाच रुढिबद्ध स्त्रीस परतंत्र राखणाऱ्या समाजाच्या नीतिशास्त्राशी एकमत असणाऱ्या गडकऱ्यांची 'प्रेम आणि मरण' ही कविता विशाल स्वप्नरंजन व सवंग तत्वज्ञान ठरणें अपरिहार्यच होतें.

'प्रेम आणि मरण' ही गडकऱ्यांची अत्यंत प्रसिद्ध कविता. या कवितेंत गड-कऱ्यांच्या प्रेमपिपासु मनाने एक भव्य स्वप्न पाहिलेलें आहे.

कुठल्यातरी मोकळ्या मैदानांत एक वृक्ष मोठ्या जोमाने वाढतो. कोठल्यातरी मुहूर्तावर दूरवर आकाशांतील वीज चमकते, व वृक्षाच्या मनांत प्रीतीच्या नवथर-लहरी उसळूं लागतात. प्रथमदर्शनीच तिच्यावर वृक्षाचें प्रेम बसलें. त्याला पुरतें वेड लागलें.

तो योग । खरा हठयोग
प्रीतिचा रोग लागला ज्याला
लागतें जगावें त्याला हें असें

त्याला कोणी निंदूं लागले. कोणी वन्दूं लागले. पण त्याला त्याचें काय ? इष्काचा जहरी प्याला त्याच्या नशिबाला आला होता. त्याची भयंकर तपस्या बघून इन्द्र घाबरलं, ध्रुव बाळाला मत्सर वाटला. साक्षात् तपोदेवता प्रकट होऊन 'वरं ब्रूही' म्हणाली. वृक्षाने ' जीवींच्या जिवाची बाला, भेटव ' म्हणून वर मागितला. लोकांनी सांगितलें–'अरे, स्पर्शासह मरणहि आणी ही तुझ्या जिवाची राणी, त्या क्षणी.' परंतु वृक्षाला तर तीच पाहिजे होती. तो म्हणाला—

निष्प्रेम चिरंजीवन तें
जगि दगडाला ही मिळतें । धिक् तया
क्षण एक पुरे प्रेमाचा
वर्षाव पडो मरणांचा । मग पुढे ॥

मला निष्प्रेम जीवन नको. एका प्रेमाच्या क्षणांत मृत्युहि आला तर पत्करला. तो ध्यानस्थ बसला. शेवटी नाइलाजाने स्पर्शाबरोबर मरण देणारी 'गगनांतील चंचल बाला। धाडली' व ती 'धांवली उतावीळ होत। प्रीतीची जळती ज्योत त्याकडे'. तिच्या ज्वलंत स्पर्शाने वृक्ष दुभंगून खाली पडला. पण पडतां पडतां एकदां तो हंसला. त्याचें शरीर पानाफुलांनी क्षणभर बहरुन आलें. एकच क्षण त्याच्या सर्व सहज वृत्तींची पिपासा शमली. मग गोविंदाग्रज सांगतात—

' तो योग । खरा हठ योग । प्रीतिचा रोग
लागला ज्याला । लागतें मरावें त्याला । हें असें ।

अशा रीतीने एका प्रेमस्पर्शासाठी मरणांचा वर्षाव सहन करून वृक्षाने स्वतःचें जीवन सफल केलें. वृक्षाने वेलीवर प्रेम करायचें. पण त्याला गगनांतील चंचल बालाच हवी होती. तिच्या क्षणदर्शनानेच त्याला वेड लागलें होतें. हा Love at the first sight चाच प्रकार होता. ती चंचल बाला शेवटी देवाच्या मध्यस्थीने वृक्षाला भेटायला आली. तिने प्रेमाचा स्वीकार केला कीं नाही हें कळायला मार्ग नाही. तिच्या स्पर्शाने वृक्षराजाच्या मनाचें समाधान झालें आणि तो मरण पावला एवढेंच् केवळ खरें. तो ' स्पर्श ' म्हणजेच चपलेने दिलेलें प्रेम असें गडकऱ्यांना म्हणायचें आहे. आणि तें स्पर्शसुख तिने देवाच्या आज्ञेने दिलेलें आहे.

हें स्वप्नरंजन मोठें भावुक आहे यांत शंका नाही. पण किंचित् काल स्तिमित झालेलें मन थोड्याच वेळांत विचार करूं लागल्याशिवाय राहत नाही. ' प्रेम आणि मरण ' ! किती परस्पर विरुद्ध कल्पना. प्रेम हें जीवन देणारें; जीवनाला फुलौरा आणणारें आणि मरण ? मरण हें नाश करणारें शून्याकडे नेणारें. गडकऱ्यांचें 'प्रेम',– ज्यांच्या अस्तित्वाशिवाय जीवन शून्यवत् वाटतें त्याची प्राप्ति होतांच मरण ओढवतें, ज्यास ही प्रेमप्राप्ति होतें त्याचाच नाश होतो.

परंतु मरण हें कधीं कधी मोहक बनतें हें खोटें नाही. 'आपुलें मरण पाहिलें म्या डोळा । जो जाहला सोहळा अनुपम्य' असें तुकारामबोवा म्हणतात; 'मरणांत खरोखर जग जगतें ' असें तांबे म्हणतात. स्वतःचें मरण स्वतःच्या अहंतेचें मरण पाहणें हा सोहळा होणारच. त्यानेच विश्वात्म्याशी एकात्मता साधेल. मरणांत म्हणजे यज्ञात जग जगणारच. व्यक्तीच्या उच्चतर मूल्यासाठी त्यागांतच समाजाची उन्नति होणार. असें मरण जीवन सुंदर करतें आणि स्वतः सुंदर बनतें परंतु प्रेमासाठी केलेल्या तपस्येंतून त्यागातून मरण–सर्वनाश ! प्रेमाचा परिणाम म्हणजे मरण ! किती भयावह हें सत्य ! वास्तविक जीवनांतील एका प्रेमाच्या क्षणासाठी मरणाचें आलिंगन ही कल्पना किती विचित्र आहे. प्रेमातून सर्वनाश निघतो काय ?

पृथ्वीवरचा वृक्ष आणि आकाशांतील चपला ! गडकारी मानवी प्रेमाबद्दल 'इष्का' बद्दल बोलत आहेत. तेव्हां वृक्ष आणि आकाशांतील चपला हीं स्त्री आणि पुरुष यांच्या प्रेमाचीं प्रतिकें मानलीं पाहिजेत. पुरुष आणि स्त्री आणि पुरुष आणि प्रकृति यांच्या अनादिसिद्ध चाललेल्या गोफाच्या अनुभूतीने याचा शेवट होतो काय ? एका प्रेमाच्या क्षणासाठी वृक्षाला मरण पत्करावें लागलें. एवढें महाग हें प्रेम कां पडावें बरें ! आयुष्यांत एक क्षणभर तरी प्रेमाचा अनुभव प्राप्त व्हावा या नैसर्गिक बुभुक्षेचें ह्या कवितेंत भावुक उन्नयन (Subliveation) केलेलें आढळत नाही काय ? स्त्री आणि पुरुष यांचें परस्परांतील प्रेम केवढें नैसर्गिक आणि कल्याणकारी ! स्त्री पुरुषांचें मीलन अशक्य कां व्हावें ? स्त्रीसौंदर्य ही दूर आकाशांत लखलखणारी चपला कां वाटावी ? याचें उत्तर व्यक्तिस्वातंत्र्याच्या मूल्यांना तिलांजलि देऊन रूढ कौटुंबिक जीवनांत तळमळणाऱ्या गडकऱ्यांच्या खालच्या मध्यमवर्ग जीवनांत सांपडेल. वर्तमान भारतीय समाजांत दुबळ्या प्रेमाचें भवितव्य ' मरण ' हेंच आहे.

स्थितिशील आणि स्त्रीपुरुषांना नीतीच्या आणि मर्त्तेच्या कडक बंधनांत वागविणाऱ्या भारतीय कुटुंबांत गडकऱ्यासारख्या प्रतिभाशाली दरिद्री पण रूढी-

वादी कलावंताला कोठून स्त्रीप्रेमाचा लाभ होणार ? खटपटी लटपटी करून वरच्या वर्गांत जाण्याची धडपड करणारे ते संधिसाधू तरुण नव्हते. ती कृत्रिम मूल्यें होतीं. ज्या समाजांत ते वाढले तो समाज मागासलेला, रूढी आणि दारिद्र्य यांनी गांजलेला, तेव्हा गडकऱ्यांच्या अतृप्तीतून स्त्रीप्रेमविषयक भव्य कल्पना निर्माण व्हावी हें साहाजिकच होतें. एकाक्षणाच्या प्रेमासाठी तळमळून त्यांनी हें स्वप्न तयार केलें आणि आपोआपच त्यांनी स्त्रीची दूर आकाशांत चमकणाऱ्या चपलेशीं तुलना करून वास्तव जीवनांतील स्त्रीपुरुषांतील अंतरास अजाणतां प्रतीकात्मक पद्धतीने प्रकट केलें. त्या वृक्षाची (म्हणजे स्वतःची) त्या प्रेमक्षणाशी मरणासह का होईना गांठ घालून दिली व स्वर्गीची चपला (म्हणजे सामाजिक विषम बंधनामुळे अतिशय दूर आणि अप्राप्य वाटणारा सुंदर स्त्री सहवास व प्रेम) त्याला भेटविली. म्हणजेच गडकऱ्यांच्या स्वतःच्या खोल सामाजिक अतृप्तीचें हें गीत म्हणजे इच्छापूर्ति किंवा क्षतिपूर्ति आहे, असें वाटणें अनाठाई होणार नाहीं. वरून प्रेमाचें अतिरंजित महत्व सवंग हळवेपणाने व्यक्त करणारें हें गीत गडकऱ्यांच्या अतृप्तिभीषण वर्गजीवनाचेंच प्रतीक नाही काय ? गडकऱ्यांनी स्त्रीप्रेमाची कल्पना, त्या अनुभवापासून दूर राहून केलेली दिसते. म्हणून ही कविता कल्पनारम्य जरी असली तरी अतृप्तिसारखी भकास आहे, परिपूर्ति सारखी रसार्द्र नव्हे. ज्या समाजांत स्त्री आणि पुरुष यांना फुलांच्या सुगंधा प्रमाणे एकमेकांत सहज मिसळतां येतें, एकमेकांचा स्नेह सहज प्राप्त होण्याची संधि असते, त्या समाजांत वृक्ष आणि वीज या सारख्या महान् अंतर दाखविणाऱ्या प्रतीकांची स्त्री व पुरुष यांच्या प्रेमासाठी योजना केली जाणें केवळ अशक्य आहे व त्याचें पर्यवसान मरणांत होणें सर्वथैव असंभव आहे. म्हणूनच, हें गीत परतंत्र, रूढीग्रस्त मध्यम वर्गाच्या कुंठित भावुक युवकांच्या अतृप्तीचे केलेलें उन्नयन व स्वप्नरंजन आहे. स्वप्नरंजनात्मक काव्यांत अनुभवसिद्ध तत्वज्ञानाचा किंवा अस्सल सखोल भावनांचा शोध करणें व्यर्थ असते म्हणून "प्रेम आणि मरण" या कवितेंतील कल्पना बरी वाटली तरी ती महान होणें शक्य नाही. 'प्रेम आणि मरण ' हें बंधनांत जखडलेल्या कवीचें लाचार स्वप्न आहे.

गडकऱ्यांच्या काव्यांत व्यक्तिमुक्तीच्या कल्पनेचा त्याग आहे म्हणूनच पुढील कालांतील मराठी काव्याच्या स्वप्नरंजन युगाचा आरंभ त्यांत सांपडतो. परंतु त्यांच्या ठिकाणी असलेल्या कल्पनाचमत्कृतीमुळें त्याचें स्थान मराठी कवितेंत अढळ राहील यांत वाद नाही.*

 *नागपूर नभोवाणीच्या सौजन्याने.

चक्रधरांचे ग्रंथकर्तृत्व

★

वि. भि. कोलते

'चक्रधरांचा एकहि ग्रंथ नाही'

महानुभाव पंथाचे संस्थापक श्री. चक्रधरस्वामी यांचा आज जो लौकिक सर्वत्र पसरला आहे तो एका विशिष्ट संप्रदायाचे प्रवर्तक आणि तत्त्वज्ञानाचे प्रतिपादक म्हणून. ग्रंथकार, लेखक किंवा साहित्यिक या नात्याने त्यांची फारशी प्रसिद्धी नाही. इतकेच नाही तर त्यांच्याविषयी लिहिणाऱ्या बहुतेक लेखकांनी चक्रधरांनी ग्रंथरचना केली नाही असाच आपला अभिप्राय व्यक्त केला आहे. कै. वि. ल. भावे यांच्या 'महानुभाव–महाराष्ट्र–ग्रंथावली, कवि-काव्य-सूची' मधे चक्रधरांच्या नांवावर एकहि ग्रंथ नाही. त्यांच्याच 'महाराष्ट्र सारस्वता'त (भा. १ पा. ८३) 'श्रीचक्रधरांनी प्रत्यक्ष रचलेला असा एकहि ग्रंथ नाही' असे नमूद केलेले आहे. डॉ. य. खु. देशपांडे यांच्या 'महानुभावीय मराठी वाङ्मय' या पुस्तकांतहि चक्रधरांच्या नावावर एकहि ग्रंथ नाही. तथापि 'श्रीमच्चक्रधरांची चौपदी' म्हणून 'श्रीमच्चक्रधर यांनी ......गायिलेली' एक 'चौपदी' (पा. ११, १२) त्यांनी उद्धृत केलेली आढळते. 'प्रत्यक्ष चक्रधर स्वामींची कांही ग्रंथरचना उपलब्ध नाही. नाही म्हणावयाला त्यांची एक चौपदी (गाणे) प्रकाशांत आली आहे' असे कै. बा. अ. भिडे यांनीहि म्हटले आहे. (मराठी भाषेचा व वाङ्मयाचा इतिहास पा. १२१). कै. पांगारकरांनी 'गोविंद प्रभु, चक्रधर किंवा नागदेवाचार्य हे पंथाचे संस्थापक असून त्यापैकी एकानेहि ग्रंथ लिहिलेला नाही' असेच म्हटले आहे. (मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड १ पा. ४१५). कै. नी. ब. भावाळकर आणि श्री. ह. ना. नेने यांनीहि 'चक्रधरांनी स्वतः असा कोणताच ग्रंथ लिहिला नाही' (श्रीचक्रधरसिद्धांतसूत्रे प्रस्तावना) असे म्हटलेले आहे. महानुभावीय प्राचीन लेखकांनीहि ग्रंथकार किंवा लेखक म्हणून चक्रधर स्वामींचा उल्लेख केलेला आढळत नाही. सामान्यतः 'वृद्धान्वया' मधे महानुभाव ग्रंथकारांची व त्यांच्या कर्तृत्वाची नोंद आढळते; पण तेथेहि श्रीक्रधरस्वामी अभावानेच चमकतात. तेव्हां श्रीचक्रधर स्वामी हे 'प्रत्यक्ष' किंवा 'स्वतंत्र' अथवा 'स्वतः' ग्रंथकार नव्हत असा या सर्व संशोधकांच्या म्हणण्याचा आशय आहे असे म्हणण्यास हरकत नाही.

हें विधान एकांगी आहे

त्यांचे म्हणणे अगदीच चुकीचे आहे असे नाही; तथापि ते एकांगी वाटते. माझ्या मते श्रीचक्रधरांना ग्रंथकार म्हणून म्हणायला काहीहि हरकत नाही; इतकेच नव्हे तर त्या पदवीवर त्यांचा पूर्णपणे हक्क आहे. चक्रधर हे ग्रंथकार होते; इतकेच नाही तर मराठीतील आद्यग्रंथकार होते असे मला म्हणायचे आहे. वरील संशोधकांना चक्रधरांच्या या वाङ्मयीन कर्तृत्वाची मुळीच कल्पना नाही असे मात्र नाही. त्यांना त्याची कल्पना आहे. श्री. भवाळकर-नेने यांनी तर आपल्या पुस्तकाला 'श्रीचक्रधर

सिद्धांतसूत्रे ' असे नांव दिले आहे. दृष्टांतपाठालाहि त्यांनी 'श्रीसर्वज्ञ चक्रधर निरूपित ' ' दृष्टांतपाठ ' असे म्हटलेले आहे. या दोन्ही पुस्तकातील मजकुराचे कर्तृत्व चक्रधरांचे आहे हे त्यांना मान्य असल्याचे या नांवावरून आणि त्यांच्या प्रस्तावनेतील विवेचनावरून स्पष्टपणे दिसते; आणि तरीहि 'चक्रधरांनी स्वतः असा कोणताच ग्रंथ लिहिला नाही ' असे त्यांनी म्हटले आहे ते का, याचा विचार केला पाहिजे. ' ग्रंथ ' हाच शब्द बहुतेकांनी योजलेला असल्यामुळे त्याच्याच अनुरोधाने हा विचार करणे सोयीचे व उपयुक्त होईल.

ग्रंथ म्हणजे काय ?

चक्रधराने स्वतः ग्रंथरचना केली नाही हे परमार्थाने खरे आहे काय ? ' ग्रंथ ' म्हणजे तरी काय ? केवळ व्युत्पत्तिदृष्ट्या पाहिले तर 'ग्रथ्यते इति ग्रंथः ' जो बांधलेला आहे, एकत्रित केलेला आहे, व्यवस्थितपणे रचलेला आहे तो ग्रंथ, आणि असे करणारा जो तो ' ग्रंथकार. ' या दृष्टीने तर आपले स्वतःचे किंवा इतरांचे विचार एका विशिष्ट क्रमाने किंवा व्यवस्थेने ज्यांत एकत्रित मांडलेले किंवा लिहून ठेवलेले आहेत तो ग्रंथ आणि ते मांडणाराला किंवा लिहून ठेवणाराला ग्रंथकार म्हणावे लागेल. व्यवहारात ग्रंथलेखनाच्या बाबतीत काय काय घडून येते ? काही लेखक एखाद्या विषयावरील आपले विचार स्वतःच लिहून ठेवतात. उदाः दासोपंतांनी भगवद्गीतेवर 'गीतार्णव' नावाची टीका रचली आणि ती त्यांनी स्वतः लिहून ठेवली; किंवा लो. टिळकांनी ' गीतारहस्य ' नावाचा ग्रंथ रचला व स्वतःच लिहिला. यात स्वतःचे सुसंबद्ध विचार खुद्द लेखकाने स्वतःच लिहून काढलेले आहेत. तेव्हां त्यांच्या लेखनाला ' ग्रंथ ' आणि त्यांना ' ग्रंथकार ' ही संज्ञा यथार्थतेने लागू पडते. दुसरा प्रकार असा की एखादी व्यक्ति विषयाची रचना मनात करून त्याचे ' निरूपण ' करते आणि ते निरूपण दुसरा कोणी तरी लागलाच ' अक्षरशः लिहून काढतो. व्यासाने भारत सांगावे व गणपतीने ते अक्षरशः लिहून घ्यावे हा प्रकार असाच होय. ज्ञानेश्वर महाराजांनी भगवद्गीतेवर व्याख्या स्वतः केली आणि ती सच्चिदानंदबाबाने लिहून काढली. येथे शब्दशः लेखन करणारा दुसराच कुणीतरी आहे. तो अक्षरशः ' लेखक ' असला तरी लौकिकात भारताचा लेखक गणेश आणि ज्ञानेश्वरीचा लेखक सच्चिदानंदबाबा असे आपण म्हणत नाही. या ग्रंथांचे लेखक अनुक्रमे व्यास व ज्ञानेश्वर महाराजच होत. आता आपण अशी कल्पना करू की एखाद्या विचारवंताने केलेले तोंडी निरूपण, त्याच वेळी अक्षरशः लिहून न घेतां कांही दिवसानंतर पण त्या विचारवंताच्या हयातीतच स्मरणाने लिहून काढले गेले तर ? अशा रीतीने तयार झालेल्या त्या ग्रंथांचे कर्तृत्व कुणाला द्यायचे ? मुख्य विचार व विवेचन त्या विचारवंताचे; पण ते त्यावेळी नव्हे तर कालांतराने आणि अक्षरशः नाही तर स्मरणातून लिहून काढणारा निराळा. पुस्तकाचे कर्तृत्व कुणाकडे द्याल ? या प्रश्नाचे उत्तर देणे सोपे व्हावे म्हणून असे एक उदाहरण आपणासमोर ठेवतो विनोबांनी १९३२ मध्ये धुळे जेलमध्ये गीतेवर जी प्रवचने केली ती तेथेच साने गुरुजींनी लिपीबद्ध केली......... पुढे काँग्रेस साप्ताहिकात ' संक्षेपाने ' ती प्रसिद्ध झाली. बारा वर्षानंतर ती पुस्तक रूपाने प्रकाशित करण्यात आली. गीता-प्रवचनांचे कर्ते म्हणून आज विनोबा प्रसिद्ध आहेत, साने गुरुजी नव्हत. प्रसिद्ध झालेल्या ग्रंथावर नावहि विनोबांचेच आहे. विनोबांनी ही प्रवचने पाहून तपासून दिलेली नाहीत हे लक्षांत ठेवावे. यावरून दिसून येईल की मूळ विचारवंताला

किंवा प्रवचनकारालाच ग्रंथ-कर्तृत्वाचे खरे श्रेय दिले पाहिजे. साने गुरुजींनी ती अक्षरशः लिपिबद्ध केली असे गृहीत धरले तर ही विचारसरणी अधिक प्रमाणभूत होईल.

असाच प्रकार बॅ. सावरकर यांच्या 'कमला' या खंडकाव्याचा आहे. हे काव्य त्यांनी अंदमानच्या तुरुंगात लिहिले. मनात श्लोकांची रचना करावी व ती विटकराच्या तुकड्यांनी अगर टोकदार दगडाने भिंतीवर लिहावी असा आरंभीचा क्रम होता. पुढे त्यांनीच ते काव्य स्वतः पाठ करून टाकले. ज्या खोलीतील भिंतींवर त्यांनी ते काव्य लिहून ठेवले होते ती त्यांना पुढे बदलावी लागली. तिच्यात प्रयाग येथील स्वराज्य पत्राचे संपादक रा. रामहरि यांना ठेवण्यांत आले. या सद्‌गृहस्थांची भाषा हिंदी. परंतु विनायकरावांनी त्यांना तुरुंगात मराठी भाषा शिकविली. तेवढ्यावर श्री. रामहरि यांनी भिंतींवर लिहिलेले 'कमला' काव्य पाठ करून टाकले. अंदमानातून श्री. रामहरि हे लौकर सुटले. ते कलकत्त्यास येताच विनायकरावांचे धाकटे बंधु डॉ. सावकर यास भेटले. 'कमला' काव्यातील शेकडो ओळी त्यांनी डॉ. सावरकर यास पाठ म्हणून दाखवल्या. त्यावरून त्या समग्र 'कमला' काव्याची एक हस्तलिखित प्रत डॉ. सावरकर यांनी सिद्ध केली. पुढे १९२१ मध्ये विनायकरावांनी घाईघाईने लिहून दिलेल्या प्रस्तावनेसहित त्यांनी ती 'विजनवासी' या टोपणनावाने प्रसिद्ध केली. (क्रमला ३ री आवृत्ती. काव्याचा परिचय). यावरून दिसून येईल की केवळ 'रामहरि' यांच्या स्मरणातून बाहेर आलेल्या, अर्थात त्यांनी 'निवेदन' केलेल्या आणि डॉ. सावरकरांनी लिहून काढलेल्या स्वरूपात कमला काव्य प्रसिद्ध झाले. याचे बरेचसे श्रेय श्री. रामहरि यांना असले तरी मूळ काव्याचे रचयिते बॅ. सावरकर यांच्याच नावाने ते आरंभापासून ओळखले जाते. राजकीय कारणासाठी 'विजनवासी' हे टोपणनाव वापरलेले असले तरी रचना कुणाची याबद्दल महाराष्ट्रीय वाचक वर्गात त्यावेळीहि यत्किंचित सुद्धा संदेह नव्हता. ते एक उघडे गुपित होते.

हे 'ग्रंथां' चे नमुने पहा

वरील ग्रंथ मूळ कर्त्यांनी निवेदन करून इतरांनी लिहून घेतलेले असले तरी त्यांचे विषय एकसूत्रात्मक आहेत, त्यात योजनाबद्धता आहे. क्वचित् असे घडते की एखादा विचारवंत विविध विषयावरील आपली स्फुट प्रकरणे (स्वतः किंवा लेखकाकडून) लिहून काढतो. अशी अनेक प्रकरणे झाली म्हणजे मग त्यांची शक्य तितकी पद्धतशीर मांडणी तो करतो. उदा: 'ग्रंथराज' म्हणून गौरविलेला दासबोध पहा. या 'ग्रंथराजा' ला स्वतंत्र असा एकच विषय नाही. अनेक विषयावरील प्रकरणांचे ते संकलन आहे; आणि ते खुद्द रामदासांनी म्हणजे ग्रंथकर्त्याने केलेले आहे. त्यातहि कांही भाग त्यांनी 'स्वतः' लिहिला असेल किंवा इतराकडून लिहून घेतला असेल. दासबोधाची अधिकृत संहिता कल्याण स्वामींच्या हातची आहे; त्यावरून ज्ञानेश्वरांच्या सच्चिदानंदबावा प्रमाणे रामदासांनी कल्याणस्वामींचा उपयोग करून घेतला असावा असे दिसते. ते कसेहि असले तरी एकसूत्रात्मक विषय नसूनहि स्फुट प्रकरणांच्या संकलनालासुद्धा खुद्द रामदासांनी आणि इतरांनीहि 'ग्रंथ'—नव्हे 'ग्रंथराज' म्हटलेले आहे. तुकाराम महाराजांच्या गाथ्याचीहि अवस्था हीच दिसते. प्रसंगोपात्त त्यांनी म्हटलेले अभंग क्वचित् त्यांनी व संताजी जगनाडे यांनी लिहून

ठेवले आहेत. त्यांच्या या गाथ्याला विषयाच्या दृष्टीने एकसूत्रता नाही तरी आपण त्याला ग्रंथ म्हणतो व तुकारामांना ग्रंथकारांच्या मालिकेत मानाचे स्थान देतोच ना ! हा ग्रंथाचा चौथा प्रकार झाला. ग्रंथाचा पाचवा प्रकार याहूनहि निराळा आहे. वरील उदाहरणात मूळ ग्रंथकार आणि त्याचा अक्षर-लेखक हे दोन्ही समकालीन आहेत; परस्परांच्या सान्निध्यात ते असतात.

भगवद्गीता कोणी लिहिली ?

पण भगवद्गीतेच्या बाबतीत काय आढळते ? स्थूलार्थाने लौकिकात भगवद्गीता हा ग्रंथ श्रीकृष्णाच्या नावावर मोडतो. 'भगवत्' या शब्दावरूनहि हे दिसून येईल. गीता कुणाची ?—तर श्रीकृष्णाची, असे आपण म्हणतो. पण वास्तवात तिची निर्मिति कशी झाली ? गीता श्रीकृष्णाने स्वतः लिहिली नाही; किंवा आपल्या लेखकाकडून लिहविली नाही; तर त्याने अर्जुनाला ती सांगितली. 'पार्थाय प्रतिबोधिता भगवता नारायणेन स्वयं' असे तिचे स्वरूप आहे. पण ती लिहिली कुणी ?—'व्यासेन ग्रथिता पुराणमुनिना मध्ये महाभारतम्' —म्ह० आपल्या महाभारत ग्रंथामध्ये पुराणमुनि व्यासांनी ती ग्रथन केली आणि सर्व महाभारत हे व्यासांनी स्वतः सांगून गणेशाकडून लिहवून घेतल्याचे आपण पाहिलेच. म्हणजे एकंदर प्रकार असा की रणांगणावर कृष्णाने अर्जुनास सांगितलेली गीता व्यासांनी गणेशाकडून लिहून घेतली. कृष्णाकडून अर्जुनाला गीता सांगितली जात असतांनाच व्यास ती अक्षरशः टिपून घेत होते असे नाही. गीता म्हणजे कृष्णार्जुनांचा संवाद संजयाने ऐकला आणि धृतराष्ट्राला सांगितला ! हा अगदी अक्षरशः सांगितला असेल पण तो आठवून संजयाने सांगितलेला आहे. आणि त्यालाच पद्यबद्ध स्वरूप देऊन व्यासांनी तो गणेशद्वारा लिहून काढला आहे. तरीहि त्याचे कर्तृत्व श्रीकृष्णाकडेच दिले जाते. श्रीकृष्णाने तो स्वतः लिहिला नाही; लिहवून घेतला नाही. लिहिला गेला तोहि मागाहून आणि पद्यस्वरूपात. तरीसुद्धा मूळ विचार श्रीकृष्णाचे असल्यामुळे गीतेचे कर्तृत्व श्रीकृष्णाकडेच देतात. गीताग्रंथाचा कर्ता 'व्यास' किंवा 'संजय' असे लौकिकात म्हणत नाहीत.

सॉक्रेटिसची ॲपॉलॉजी

पाश्चात्य वाङ्मयातील अशा एका ग्रंथाचे उदाहरण आपणासमोर ठेवणे अवश्य आहे. ग्रीक वाङ्मयात 'ॲपॉलॉजी' नावाचा एक ग्रंथ प्लेटोच्या नावावर आढळतो. वस्तुतः ही 'ॲपॉलॉजी' म्हणजे सॉक्रेटीसने आपल्यावरील आरोपांचे निराकरण करण्यासाठी अथेन्स मधील सेनेटसमोर केलेले भाषण होय. या भाषणाच्या वेळी प्लेटो तेथे हजर होता. सॉक्रेटीसच्या मृत्यूनंतर प्लेटोने ते भाषण लिहून काढले. या भाषणाच्या पुस्तकालाच 'ॲपॉलॉजी' असे नाव आहे. या ग्रंथाचा वास्तव कर्ता कोण ? काहींचे म्हणणे असे आहे की प्लेटोने सॉक्रेटीसचे भाषण अक्षरशः लिहून घेतले नव्हते, त्याने ते स्मरणाने लिहून काढले; तेव्हां त्यातील शब्द न् शब्द सॉक्रेटिसाचा असेलच असे नाही. भाषा, विषयाची मांडणी वगैरे प्लेटोचीच असावी. म्हणून ॲपॉलॉजीचे कर्तृत्व प्लेटोचेच. तथापि इतर काहींचे म्हणणे असे की— 'Apology may reasonably be taken as a reproduction by Plato of what Socrates actually said' (ग्रोटे); "his version in substance has preserved the actual speech"

(टेलर) हे दुसरे मत गृहीत धरले तर ॲपॉलॉजीचे कर्तृत्व प्लेटोकडे न देता सॉक्रेटी-सकडे देणे न्याय्य होईल असे मला वाटते. ग्रीक वाङ्मयाच्या इतिहासात 'गिलबर्ट मरे' ने साक्रेटीसला स्थान दिले आहे त्याचे कारण याशिवाय दुसरे कोणते असणार ?

असे प्रश्न पूर्वी आपल्याकडेहि उपस्थित झालेले होते; नाही असे नाही. 'यस्य वाक्यं स ऋषिः' असा या बाबतीत वेदांचा निर्णय आहे. वैदिक मंत्रातील वाक्यें मुळात ज्याने उच्चारली असतील तोच ऋषि त्या मंत्राचा कवि अथवा द्रष्टा समजला जातो. परंपरेने त्याचे पठण किंवा संरक्षण करणाराकडे अथवा लिपिकाराकडे ते श्रेय जाऊ शकत नाही. जैन वाङ्मयातील 'षट्खंडागम' नामक ग्रंथावरील 'धवला' नामक टीकेत या विषयाची थोडीफार प्रत्यक्ष चर्चा आलेली आहे. महावीरांच्या मुखीची वचने श्रवणपरंपरेने धरसेनाचार्यापर्यंत येऊन त्यांनी त्यातील कांही भाग भूतबलि व पुष्पदंत यांना शिकविला व या दोघांनी तो सूत्रस्वरूपात रचला. महा-वीरांच्या वचनांचा हा थोडासा भाग भूतबलि व पुष्पदंत यांच्या द्वारे आलेला असल्यामुळे 'त दो एवं खंड–सिद्धंतं पडुच्च भूदबलि–पुप्फयंताइरिया वि कत्तारे उच्चंति '— या खंड सिद्धांताच्या अपेक्षेने भूतबलि आणि पुष्पदंत आचार्य यांना देखील या 'श्रुत' ऐकलेल्या ज्ञानाचे कर्ते म्हणून म्हणण्यात येते असे धवला टीकाकाराने आधी म्हटले आणि लागलीच 'तदो मूल-तंत-कत्ता वड्ढमाण भडारओ' म्हणजे मूळ ग्रंथाचा कर्ता वर्धमान भट्टारक (= महावीर) होय असे स्पष्ट सांगितले आहे. इतकेच नाही तर 'ग्रंथकर्तृत्वाच्या प्रश्नाचा विचार करण्याचे कारण काय ?' असा प्रश्न स्वतःच उपस्थित करून त्याने त्याला उत्तर दिले आहे "शास्त्रस्य प्रामाण्य प्रदर्शनार्थम् 'वक्तृप्रामाण्याद् वचन प्रामाण्यम्' इति न्यायात्" (=शास्त्राचे प्रामाण्य दाखविण्यासाठी. कारण वक्त्याच्या प्रामाण्यावरच वचनांचे प्रामाण्य अवलंबून असते) असे उत्तर दिले आहे. (षट्खंडागम. भा. १ पा. ६०–७२; संपादकः डॉ. हिरालाल जैन). यात एखाद्या वचनाला अधिकृतता येते ती वक्त्याच्या प्रामाण्यानुळे, अर्थात् मूळ वक्ता जो असेल तोच महत्त्वाचा; आणि म्हणून तोच 'मूळग्रंथकर्ता' होय हे स्पष्टपणे सूचित केलेले आहे.

ग्रंथकार कोणाला म्हणावे ?

तेव्हां एखाद्या विषयावरील सुसंगत विवेचन असो किंवा विविध विषयांचे एकत्रित संकलन असो,—ते स्वतः लेखकाने लिहून काढलेले असो किंवा इतराकडून लिहून घेतलेले असो; अथवा आपले हे विचार कुणी लिहून काढावे अशी कल्पना देखील नसतांना एखाद्याने उच्चारलेली वाक्ये त्याच्या अपरोक्ष इतरांनी केवळ संस्मरणाने लिहून काढलेली असोत त्यांना आपण ग्रंथ ही संज्ञा देतो आणि ते विचार व्यक्त करणारी वाक्ये ज्यांनी उच्चारली असतील त्यांनाच आपण ग्रंथकार म्हणतो, संकलनकाराला किंवा अक्षर—लेखकाला ग्रंथकार ही संज्ञा यथार्थतेने आपण लावीत नाही.

संकलनकार हा ग्रंथकार नव्हे

क्वचित् काही ग्रंथ केवळ संकलनकाराच्या नावावरहि मोडले जातात, नाही असे नाही. पण ते केव्हां ? तर त्या मूळ गद्य–पद्य कृतींचे वास्तव कर्ते हे अनेक किंवा अज्ञात असतात तेव्हां. 'नवनीत' 'भक्तिमार्ग प्रदीप' वगैरे ग्रंथात अनेक कवींचे कर्तृत्व अंतर्भूत झालेले आहे हे ठाऊक असूनहि 'गोडबोल्यांचे नवनीत'

'पांगारकरांचा भक्तिमार्ग प्रदीप' असे आपण म्हणतो. साने गुरुजींनी व पां. श्री. गोरे यांनी अनेक स्त्रियांकडून लोकगीते-ओव्या गोळा करून छापल्या. या ओव्या नक्की कुणाच्या हे कुणालाच सांगता येत नाही. म्हणून संग्रहकाराच्याच नावाने स्थूल मानाने त्या पुस्तकांचा उल्लेख होतो. साने गुरुजींचे स्त्रीजीवन, किंवा गोऱ्यांची वऱ्हाडी लोकगीते असे आपण म्हणतो. पण या सर्व ठिकाणी गोडबोले, पांगारकर साने गुरुजी, गोरे वगैरे लेखक हे 'संग्रहकार' आहेत याची जाणीव आपल्याला असते. या संग्रहाची योजना, निवड मांडणी वगैरे करण्यास संग्रहकारांचे स्वतंत्र बुद्धि-कौशल्य व्यक्त होते हे खरे; पण म्हणून त्या पुस्तकाचे, म्हणजे त्यांतील मजकुराचे कर्तृत्व आपण त्यांना देत नाही. पण समजा एखाद्या कवीचे ग्रंथकर्तृत्व अनेक पोथ्यांतून विखुरलेले असल्यामुळे त्या सर्व पोथ्यातून त्या कवीची सर्व रचना वेचून काढून एखाद्या संपादकाने प्रसिद्ध केली तर त्या ग्रंथाचे कर्तृत्व आपण कोणाकडे देऊ ? जुन्या संतकवींविषयी असे अनेकदा होते. उदाः देवनाथांची कविता ही अशीच निरनिराळ्या संग्रहांत हस्तलिखित व मुद्रित स्वरूपांत होती. काही कविता तर केवळ शिष्यांच्या तोंडी होती. ती सर्व संकलित करून कै. अच्युत सीताराम साठे यांनी छापली. त्यांनी ग्रंथाला 'देवनाथाची कविता' हेच नांव दिले आणि तेच योग्य आहे. याहून निराळा प्रकार असा की एखाद्या सत्पुरुषाच्या हयातीत किंवा मृत्युनंतर शिष्यवर्गाकडून गोळा केली तर त्या वचनांचे कर्तृत्व त्या सत्पुरुषाकडेच निर्विवादपणे दिले जाते. आख्यायिका आठवणी वगैरे गोळा केल्या तर त्यांच्या अनेककर्तृत्वामुळे तो ग्रंथ संपादकाच्या नावावर मोडणे स्वाभाविक आहे. उदा. बापट यांनी प्रसिद्ध केलेल्या लो. टिळकांच्या आठवणी. पण या आठवणींतून एखाद्या विशिष्ट विषयावरचे लो. टिळकांचे म्हणणे त्यांच्या तोंडून बाहेर पडलेल्या शब्दाप्रमाणे—एखाद्याने प्रसिद्ध केले तर त्या ग्रंथाचे कर्तृत्व कुणाकडे देणे इष्ट ठरेल ? अर्थात लो. टिळकांकडे !—बापटांनी गोळा केलेल्या आठवणींतून—त्या विवक्षित विषयावरील लोकमान्यांचे व्यक्त झालेले विचार अक्षरशः निवडून संकलित करणाराकडे नाही.

चक्रधरांची ग्रंथरचना

प्रस्तुत विषयाचे हे अत्यंत स्थूल दिग्दर्शन केले आहे. त्यावरून एखाद्या लेखनाचे 'ग्रंथकर्तृत्व' कुणाकडे जाते याची कल्पना येईल. तदनुरोधाने आपणास श्रीचक्रधरस्वामींच्या ग्रंथकर्तृत्वाचा आता विचार करावयाचा आहे. आरंभी उल्लेखिल्याप्रमाणे चक्रधरांनी 'प्रत्यक्ष' अथवा 'स्वतः' एकहि ग्रंथ लिहिलेला नाही हे म्हणणे एका दृष्टीने खरे आहे. कारण लौकिक दृष्टीने आपणाला एखादा 'ग्रंथ' लिहायचा आहे असे त्यांच्या मनाने कधीहि घेतले नाही. ग्रंथरचनेची कल्पनाहि त्यांच्या मनाला शिवलेली आढळत नाही. तेव्हां योजनापूर्वक एखाद्या विषयावर त्यांनी 'स्वतः' 'प्रत्यक्ष' लेखन केलेले नाही हे खरेच आहे. ज्ञानदेवांच्या समोर गीतेवर व्याख्यान रूपाने ग्रंथरचना करण्याची इच्छा आणि योजना होती. आणि तदनुसार [म्हणऊनि मी प्रवर्तों लाहे । ग्रंथीं इये ' (अ. १–७९)]. ग्रंथरचनेला प्रवृत्त होऊन त्यांनी ती पूर्णहि केली. अशी ग्रंथरचना चक्रधरांनी खरोखरच केली नाही. जगातील अन्य विचारप्रवर्तक भगवान बुद्ध, महावीर, सॉक्रेटीस वगैरेंना

तरी अशी 'ग्रंथ' रचना कुठे केलेली आहे. पण तरीहि त्यांच्या नावावर लेखनकर्तृत्व आढळतेच की नाही? चक्रधरांच्या ग्रंथकर्तृत्वाचीहि स्थिति तशीच आहे. जे ग्रंथ त्यांच्या नावावर प्रासिद्ध असायला पाहिजेत असे मला वाटते त्यांच्या निर्मितीचा इतिहास प्रथम या ठिकाणी सांगितला पाहिजे. म्हणजे पुढील विवेचन लक्षात येऊ शकेल.

लीळाचरित्राची रचना

गोविंदप्रभुपासून शक्ति—स्वीकार केल्यानंतर चक्रधरांनी अनेक वर्षे तपश्चर्येत घालविली आणि तदनंतर त्यांनी महाराष्ट्रात अखंड भ्रमण सुरू केले. या भ्रमणात ते आपल्या विशिष्ट तत्त्वज्ञानाचा व आचारधर्माचा उपदेश जनतेला करीत असत. त्यांच्या आयुष्यातील एकांक काळाच्या शेवटी शेवटी त्यांना अनुयायी मिळू लागले. तेथून तो त्यांच्या प्रयाणकाळापर्यंत साधारणपणे आठ वर्षांचा अवधि आहे. या काळातच त्यांनी आपला उपदेश आपल्याकडे आलेल्या जिज्ञासूंना प्रसंगोपात्त सांगितला. त्यांच्या प्रयाणानंतर नागदेवादि त्यांचे शिष्य रितपुर येथे गोविंदप्रभू जवळ सेवेसाठी आले. तेथे असतांना नागदेवाचार्य निरंतर कशाचे तरी स्मरण करीत असलेले पाहून एकदा म्हाइभटाने विचारले की 'तुम्ही निरंतर कशाचे मनन करीत असता?' नागदेवाचार्य म्हणाले 'सर्वज्ञे मज हीवरळीयेहूनि ऋद्धिपूरा पाठविलें तै माते सर्वज्ञे भणितलेः वानरेया येथौनि निरोपीले वीचार शास्त्रः अर्थ ज्ञानः त्याचे श्रवण मनन नीदीध्यासन करावा : तेही एक स्मरणचि की गाः ।१। एथीची चरीत्रे आठवीजेतिः आईकीजेतिः उच्चारीजेति तेही एक स्मरणचि की गाः ।१।' आणि म्हणून नागदेव त्यांच्या सर्व लीळा आठवीत असत. त्यांच्या समोर घडलेल्या लीळा तर त्यांना माहीतच होत्या. त्यांच्या अनुसरणापूर्वी बाइसांच्या समोर घडलेल्या लीळा त्यांनी बाइसांना विचारल्या होत्या. अळजपुराहून निघाल्यापासून तो बाइसांची भेट होईपर्यंतच्या लीळा खुद्द श्रीचक्रधरस्वामींनी 'प्रसंगे भक्ताप्रती सांग्रीतलीया' होत्या त्याहि नागदेवाचार्यांनी ऐकल्या होत्या. चक्रधरांनी प्रसंगोपात्त आपल्या भक्तांना द्वारावतीकार चक्रपाणी; श्री. दत्तात्रेय प्रभु आणि श्रीप्रभु म्हणजे गोविंदप्रभु यांच्या लीळा सांगितल्या होत्या. त्याहि नागदेवांनी माहीत करून घेतल्या होत्या. या लीळांचे मनन नागदेवाचार्य करीत असत. या लीळाप्रममाणेच 'सर्वज्ञे जे नीरोपीले परावर नीरूपण' त्याचे हि नागदेवाचार्य निरंतर मनन करीत. हे ऐकून म्हाइभटांनी सूचना केली की संप्रदायातील लोकांच्या उपयोगासाठी या सर्व लीळा 'तुम्ही सांगा आन लिहीन' नागदेवांना ही सूचना पसंत पडली. तदनंतर त्यांनी लेखनकार्य सुरू केलें. 'भट महीभट वाजेश्वरी वीजन करिति एक प्रहर लेखन करिति' 'उरलेनि काळे श्रीप्रभुचे सेवादास्य करितिः ऐसे अवघे भटोवासी लीळा कथन केलेंः ते महीभटी सा मासा लिहिले' आपण स्वतः व बाइसा अनुसरण्यापूर्वीच्या लीळा स्वामींनी ज्यांना सांगितल्या होत्या त्यांच्या त्यांच्याकडे जाऊन त्या लीळा त्यांना पुन्हा विचारण्याची आज्ञा नागदेवांनी म्हाइभटांना केली. त्याप्रमाणें म्हाइभट त्या त्या भक्ताच्या गावी गेले व लीळांचे त्यांनी संशोधन केले. 'ऐसे भटां अवीद्यमान आन बाइसा अवीद्यमान जीया लीळा तिया महीभटी जेथ जेथ सर्वज्ञे वीजे केले होते तेथ तेथ जावौनी पूसौनी लिहिलीया" म्हाइभटांनी त्या नागदेवाचार्यांना दाखविल्या. नागदेवाचार्यांनी 'हे सर्वज्ञाचे श्रीमुख शब्द होतिः हे नव्हेतिः असे सांगितल्यावर 'जे श्रीमुखीचे नव्हे ते मोडीले'

अशा रीतीने लिहिलेल्या लीळांचे पूर्वार्ध आणि उत्तरार्ध असे दोन विभाग केले. अशा रीतीने लीळाचरित्र हा ग्रंथ तयार झाला. या लीळा-चरित्र ग्रंथाचे कर्तृत्व कोणाकडे द्यावयाचे हा एक स्वतंत्र प्रश्न आपल्या समोर उभा राहतो. पण आज त्याचे विवेचन करीत नाही.

सूत्रपाठ व दृष्टांतपाठ

कालांतराने श्रीगोविंदप्रभूंच्या मृत्यूनंतर नागदेवाचार्य निंबा या गावी येऊन राहिले. तेथे त्याना अनेक शिष्य मिळाले. त्यामध्येच केसोबास नावाचे एक संस्कृत पंडित होते. या केसोबासांनी लीळाचरित्र ग्रंथातून चक्रधरांच्या मुक्तीची विचार-आचारपर सूत्रे वेगळी निवडून काढली आणि नागदेवाचार्यांच्या विचाराने अकरा प्रकरणात त्यांचा व्यवस्थित अनुक्रम लावून 'सूत्रपाठ' तयार केला. चक्रधरांनी प्रसंगोपात्त आपल्या तत्त्वज्ञानाच्या स्पष्टीकरणासाठी निरनिराळे दृष्टांत सांगितलेले होते. ते 'दृष्टांत' हि केसोबासांनी वेगळे काढले. सूत्रपाठाचे हे बारावे प्रकरण समजण्यात येते. प्रत्येक दृष्टांताचे मुख्य सूत्र, त्यावरील दृष्टांत व त्या दृष्टांतातील अर्थ व्यक्त करून दाखविणारे स्वतःचे दार्ष्टांतिक मिळून केसोबासांच्या नावावर असलेला आजचा दृष्टांतपाठ हा ग्रंथ तयार झालेला आहे. आता प्रश्न असा की सूत्रपाठ आणि दृष्टांत या ग्रंथांचे कर्तृत्व कोणाकडे द्यावयाचे ? श्रीचक्रधराकडे की केसोबासाकडे ? बहुतेकांनी ते केसोबासाकडे दिले आहे. माझ्या मते ते चक्रधराकडे दिले पाहिजे.

हे ग्रंथ कोणाचे ?

सूत्रपाठातील सूत्रे व दृष्टांत चक्रधराने सांगितलेले आहेत; ते 'श्रीमुखीचे शब्द' आहेत याबद्दल कुणाचेच दुमत नाही. तेव्हां त्यांचे कर्तृत्व चक्रधराकडेच जावयास पाहिजे हे निर्विवाद आहे. पण असे असूनहि 'केशवराजव्यासांचा' 'लक्षणान्वय सूत्रपाठ' आपण प्रसिद्ध करीत आहोत असे नेनेभवाळकरांनी म्हटले आहे. पुस्तकाचे नांव 'श्रीचक्रधर सिद्धांत सूत्रे (ज्ञानेश्वर पूर्व कालीन मराठी गद्य ग्रंथ)" आणि त्यातील प्रत्येक वाक्य 'चक्रधराचे' असे असूनहि ग्रंथकार म्हणून मान मात्र 'केशवराजव्यासां' ना—हा मला वदतो व्याघात वाटतो. पूर्वीच्या संशोधकांनीहि असेच म्हटलेले आहे. कै. भावे यांनी 'श्रीचक्रधरांनी प्रत्यक्ष रचलेला असा एकहि ग्रंथ नाही. पण त्यांची आचार्य सूत्रे आहेत. ज्यात ही ग्रथित केली आहेत त्या ग्रंथाला सिद्धांतसूत्रपाठ असे म्हणतात' (म. सा. इ. पा. ८२) असे एके ठिकाणी म्हटल्यावर पुढे केसोबास (केशवराजसूरी) यांची माहिती देतांना 'यांच्या सर्व ग्रंथांत' सिद्धांतसूत्र पाठ "हा अतिशय प्रसिद्ध आहे" (म. सा. इ. पा. १०५) असे म्हटले आहे. म्हणजे सूत्रपाठाचे कर्तृत्व त्यांनी चक्रधराकडे न देता केसोबास यांकडेच दिले आहे. श्री. य. खु. देशपांडे यांनीहि 'केशवदास उर्फ केशवराज सूरी यांचा "सिद्धान्त सूत्रपाठ" विशेष प्रसिद्ध आहे (म. म. वा. पा. २६) असेच म्हटले आहे. पांगारकर यांनी सिद्धान्तसूत्रपाठाचे कर्तृत्व केशवराज सूरीकडे तर दिले आहेच पण शिवाय वर-"त्यांत केशवसूरींचे स्वतःचे असें काही नाही तरी मोठ्या मनुष्याच्या 'उक्तींचा संग्रह' करणे हे कामहि कमी चातुर्याचे आहे असे नाही—" (म. वा. इ. पा. ४५५) असे समर्थन केलें आहे. "दृष्टान्त" च्या बाबतींतहि प्रकार हाच आढळतो. श्री. भावे

व डॉ. य. खु. देशपांडे ह्या दोघांना तर हे दृष्टान्त केसोबासानेच दिलेले आहेत असे वाटते. " ह्या सूत्रांवर त्यांचे स्पष्टीकरणार्थ ११४ दृष्टान्त केशवराज सूरींने सांगितले आहेत. ज्यांत हे दृष्टान्त दिले आहेत त्या ग्रंथाला दृष्टान्तिक असें म्हणतात." असें भावे यांचें म्हणणे आहे (म. सा इ. पा. १०५). श्री. य. खु. देशपांडेहि, "यांनी केसोबासांनी प्रथम सूत्रें लिहून त्यानंतर त्यांवर ११४ दृष्टान्त सांगितले आहेत, त्यास दृष्टान्तिक म्हणतात." (म. म. वा. पा. २६) अशीच माहिती देतात. ही माहिती चुकीची आहे; कारण दृष्टान्त केसोबासांनी सांगितलेले नसून चक्रधरांनी निरूपण केले आहेत. पण ते "चक्रधर निरूपीत" आहेत याची जाणीव असूनहि केसोबांनी ते निवडून काढलेले असल्यामुळे नेने भवाळकरांहि ह्या ग्रंथांचे कर्तृत्व केसोबासालाच देतात असे दिसते. याचमुळे केसोबासांना ते "प्राचीन मराठी गद्यरचनेचे प्रथमाचार्य" म्हणतात. तेव्हा मुख्य प्रश्न असा की "सूत्रपाठ, व दृष्टान्त हे ग्रंथ कोणाचे म्हणायचे !" चक्रधरांचे की केसोबासांचे ?

कर्तृत्त्व चक्रधराकडे दिले पाहिजे

त्यांचे कर्तृत्व चक्रधराकडे दिले पाहिजे असे माझे मत मी आधीच सांगितले आहे. सूत्रपाठाच्या निर्मितीत केसोबासांचा हात ती सूत्रें निवडून अन्वयी लावण्यापुरताच होता. तसें पाहिले तर सूत्रपाठातील ११ पैकीं ९ प्रकरणें चक्रधरांनी निरनिराळ्या वेळी स्वतःच पूर्णपणे निरूपण केलेली होती. म्हणजे असें की ह्या प्रत्येक प्रकरणांतील सूत्रे एकत्रित करून त्यांचे केसोबासांनी "एकेक" प्रकरण तयार केले असे नाही. चक्रधरांनी निरूपण करतानाच एकेका वेळी एकेक प्रकरण स्वतःच पूर्ण सांगितले होते. त्यामुळे ती अन्वयी लावण्याचेहि श्रम केसोबासांना पडले नाहीत. फक्त या प्रकरणांचा क्रम काय तो त्यांनी ठरविला आणि तोहि नागदेवाचार्यांच्या विचाराने. दृष्टान्त तर सर्वस्वी चक्रधरांचे आहेत. ते निवडून केसोबासांनी वेगळे लिहिले एवढेच. या निवडून वेगळे लिहिण्याबद्दल व त्यांचा अनुक्रम लावण्याबद्दल केसोबासांचे आपण ऋणी आहोत हे मान्य, पण त्यामुळे त्या ग्रंथाचे कर्तृत्व त्यांच्याकडे कसे जाईल? मूळसूत्रें ज्यांनी उच्चारली आणि दृष्टान्त ज्यांनी निरूपण केले त्यांच्याकडेच त्यांचे कर्तृत्व गेले पाहिजे हें उघड नाही काय ? संजयाने सांगितलेल्या आणि व्यासाने ग्रथित केलेल्या पण भगवान् श्रीकृष्णांनी निरूपिलेल्या भगवद्गीतेचे कर्तृत्व ज्याप्रमाणे श्रीकृष्णाचे त्याप्रमाणें नागदेवाचार्यांनी सांगितलेल्या व म्हाईभटाने लेखक म्हणून लिहून काढलेल्या लीळाचरित्रांतून केसोबासाने निवडलेल्या पण प्रत्यक्ष चक्रधराने निरूपिलेल्या सूत्रांचे व दृष्टान्तांचे कर्तृत्वहि चक्रधराचेच होय. वाङ्मयेतिहासाच्या ग्रंथात ते तसे त्यांच्याच नावावर नमूद व्हायला पाहिजे. सूत्रपाठ आणि दृष्टांत यांच्या प्रमाणेच 'श्रीकृष्ण चरित्र' व 'श्री दत्तात्रेय चरित्र' हे ग्रंथहि चक्रधरांचेच होत. लीळाचरित्राच्या निर्मितीचा इतिहास नीट रीतीने लक्षात आणला तर असे दिसून येईल की चक्रधरांनी प्रसंगोपात्त श्रीकृष्ण, श्रीदत्तात्रेय, श्री चक्रपाणी व श्रीप्रभु यांच्या ज्या ज्या लीळा भक्तांना सांगितल्या होत्या त्यांचेहि नागदेवाचार्य स्मरण व मनन करीत असत. चक्रधरस्वामींच्या लीळाबरोबरच या अवतारांच्या लीळाहि नागदेवांनी सांगितल्या व म्हाइभटाने त्या लिहून घेतल्या. चक्रधरांनीं सांगितलेल्या या लीळापैकी चक्रपाणी व गोविंदप्रभु यांच्या विषयीच्या लीळा. लीळाचरित्रातच' विखुरलेल्या आहेत. पण श्रीकृष्ण व श्री दत्तात्रेय यांच्या

अनुक्रमे ४६ व ४७ लीळा मात्र स्वतंत्रपणे लिहिलेल्या असून त्यांनाच श्रीकृष्ण चरित्र व श्री. दत्तात्रेय चरित्र अशी नावे आहेत. चक्रधरांनी ज्या शब्दात या लीळा भक्तांना सांगितल्या त्याच शब्दांत नागदेवांनी त्या म्हाइभटास सांगितल्या व त्याने त्या लिहून घेतल्या. असे असल्यामुळे या दोन्ही चरित्रग्रंथांचे कर्तृत्व चक्रधरांनाच दिले पाहिजे. याप्रमाणेच लीळाचरित्रातील एकांक भागाचे कर्तृत्वहि चक्रधरांचे ठरते. चक्रधरांच्या आयुष्यातील एकांक भाग म्हणजे गुजराथेतील भरवसचा वृत्तांत व तेथून अळजपूरच्या मार्गाने रिद्धपूरला आल्यापासून तो प्रतिष्ठान येथे बाइसाची भेट होईपर्यंतचा काल. या कालात आलेल्या आयुष्यासंबंधीच्या लीळा खुद्द चक्रधरांनीच भक्तांना सांगितल्या होत्या. त्याच नागदेवांनी म्हाइभटाला सांगितल्या व त्याने त्या लिहिल्या. अर्थात् याहि लीळांचे कर्तृत्व चक्रधरांचेच ठरते. या सर्व ग्रंथांचा मूळ मजकूर चक्रधरांनी निवेदन केलेला आहे आणि म्हणून त्यांचे कर्तृत्व चक्रधरांकडे दिले पाहिजे असे माझे म्हणणे आहे.

आरंभी ग्रंथलेखनाचे जे निरनिराळे प्रकार निवेदन केले त्यावरून सूत्रपाठ, दृष्टांत, श्रीकृष्ण चरित्र, श्रीदत्तात्रेय चरित्र व लीळा चरित्र–एकांक भाग या पुस्तकांचे ग्रंथकर्तृत्व चक्रधरांना का दिले पाहिजे हे लक्षात येईल.

ग्रंथकर्तृत्वाच्या बाबतीत विचार करायला लावणारे आणखी एकदोन प्रकार संभवतात. अनेकदा काही लेखक स्वतः ग्रंथरचना करतात पण ती इतरांच्यासाठी. असे म्हणतात की 'रत्नावली' हे नाटक बाणाने लिहिले पण ते श्रीहर्षाच्या नावावर. याच हर्षाच्या दरबारातील दुसरा एक कवि धावक यानेहि 'नागानंद' नावाचे नाटक आपल्या या आश्रयदात्याचे नाव घालून स्वतः लिहिले. सध्या ही नाटके श्रीहर्षाच्या नावावर मोडतात. अंतर्गत पुरावा तसाच आहे. पण वरील आख्यायिका खऱ्या असतील तर ही दोन्ही नाटके श्रीहर्षाच्या नावे न ओळखली जाता बाण व धावक यांच्या नांवांनी ओळखली गेली पाहिजेत. महानुभाव वाङ्मयात अशा प्रकाराचे एक सुंदर उदाहरण आहे. 'वच्छहरण' या नावाचे काव्य दामोदर पंडिताचे म्हणून समजले जाते. मूळ काव्यात 'म्हणे मुनि केशिराजु' असे अनेक उल्लेख आहेत (ओ. ६, ६२, ११३, ३७५; ५०२). अगदी शेवटच्या ओवीत पंडित दामोदराचे नाव आहे. वृद्धाचारातील आख्यायिकेवरून (४) मुद्दा असे कळते की हे काव्य पंडित दामोदराने लिहिले. पण केवळ सौजन्यामुळे त्याने ते केसोबासाच्या नावाने लिहिले. अर्थात एका कवीने ते आपल्या मित्राच्या नावावर लिहिले आहे. तेव्हा या काव्याचा खरा कर्ता कोण ? केसोबास की दामोदर पंडित ? दामोदर पंडित हा कर्ता म्हणावा तर मूळ काव्यात सर्वत्र केसोबासाचे नाव आहे. पण बाह्य पुराव्या वरून (व काव्याच्या शेवटच्या ओवीवरून) ते दामोदर पंडिताचे म्हणावे लागते. मूळ कर्ता दामोदर पंडित असून त्याने ते केसोबासांच्या नावाने लिहिले हे इतर प्रमाणावरूनहि सिद्ध होऊ शकते. तेव्हा काव्याचा मूळ कर्ता दामोदर पंडितच होय; आणि तसाच तो महानुभाव वाङ्मयात घातला जातो. असाच काहीसा प्रकार 'धवळया' च्या उत्तरार्धाविषयी झालेला आहे. महदाइसाच्या नावावर

 असलेल्या धवळयाचे दोन भाग आहेत. एक पूर्वार्ध आणि दुसरा उत्तरार्ध. यापैकी

पूर्वार्ध भाग महदाइसेने रचला असे म्हणता येते. पण उत्तरार्ध भाग मात्र लक्ष्मीधर भटाच्या मदतीने म्हाइभटाने लिहिला; आणि तो महदाइसेने गाइला. मूळ रचयिता प्रामुख्याने म्हाइभट असल्यामुळे त्याच्याच नावाने (फार तर म्हाइभट व लक्ष्मीधरभट या दोघांच्याहि नावाने) तो भाग ओळखला गेला पाहिजे. पण या बाबतीत श्री. वा. ना. देशपांडे यांनी असा युक्तिवाद केला आहे की 'पण या दोघांनी या आख्यायिकेप्रमाणे ज्याअर्थी महादाइसेसाठीच उत्तरार्ध केला, त्याअर्थी तो तिच्याच नावाने ओळखला जाणे वाजवी आहे' (आद्य मराठी कवयित्री. प्रस्ता. पा. ११). हा युक्तिवाद मान्य करता येणे शक्य नाही. एखादा ग्रंथ ज्याच्यासाठी लिहिला त्याच्या नावाने ओळखला जाण्यापेक्षा मुळात ज्याने तो लिहिला त्याच्याच नावाने तो ओळखला गेला पाहिजे हीच गोष्ट न्याय्य आहे.

---

* प्रस्तुत लेखातील शेवटचा परिच्छेद पा. ३२९ वर 'चक्रधराची ग्रंथरचना' या मथळ्यापूर्वी पाहिजे. तो तेथे वाचावा.

आर्थिक नियोजन

काही मूलगामी प्रश्न

★

प्रा. भा. ह. मुंजे

भारताच्या मध्यवर्ति सरकारने नेमलेल्या नियोजनसमितीचा प्रथम पंचवार्षिक योजनेचा आराखडा दोन महिन्यांपूर्वी प्रसिद्ध झाला. हा योजनेचा मसुदा (draft) आहे, अंतिम निर्णय नव्हे. या मसुद्यावर निरनिराळ्या दृष्टिकोणांतून चर्चा व्हावी याच उद्देशाने हा मसुदा आगाऊ प्रसिद्ध करण्यांत आला आहे. या चर्चेतील ग्राह्यांश स्वीकारून अंतिम योजनेंत त्याचा अंतर्भाव करण्याचा समितीचा मानस आहे. या योजनेवर अनेक अधिकृत व प्रमाणभूत व्यक्तींकडून मतप्रदर्शन व समालोचन झालें आहे. प्रमाणभूत व्यक्तींत लेखकाचा अंतर्भाव होऊं शकत नाहीं ही जाणीव ठेवून लेखकाने नियोजनाविषयीं आपलीं मतें वाचकवर्गासमोर मांडण्यासाठी पंचवार्षिक योजनाप्रसिद्धीचें निमित्त साधलें आहे. आर्थिकनियोजनाचा आराखडा तयार करण्यापूर्वी कांही मूलगामी प्रश्नांविषयीं निर्णय घेणें जरूर असतें. त्या मूलगामी प्रश्नांचा या लेखांत उहापोह केला आहे. आणि शेवटीं या प्रश्नांसंबंधीं योजनेच्या आराखड्यांत काय भूमिका सांपडते ह्याचें दिग्दर्शन केलें आहे.

आर्थिक नियोजनाचें स्वरूप:

देशांतील विभिन्न उद्योगधंदे, व्यापार, अधिकोष [बँका] इत्यादि आर्थिक व्यवहारासंबंधी एखादें योजनाबद्ध धोरण स्वीकारून त्याची अंमलबजावणी करणें ह्याला आर्थिक नियोजन म्हणतात. नियोजनांत तीन गोष्टींचा समावेश होतो. १ इच्छित साध्य अथवा ध्येय. २ सद्यःपरिस्थिति व उपलब्ध साधनसामुग्री. आणि ३ साध्य प्राप्त करून घेण्याच्या उद्देशाने साधनसामुग्री लक्षांत घेऊन विचारपूर्वक आखलेली योजना. नियोजन हें साधन आहे. साधन नेहमीच साध्याला अनुसरूनच असायला पाहिजे. साध्य समजल्याशिवाय कोणतें साधन वापरावें हें उमजणार नाहीं व कोणतेंहि साधन वापरल्यास इष्ट साध्य प्राप्त होणार नाहीं. याकरिता इच्छित साध्याची म्हणजे प्रत्येक व्यक्तीला किमान किती उपभोग्य वस्तू किती प्रमाणांत मिळाल्या पाहिजेत ह्याची परिपूर्ण व स्पष्ट कल्पना असावयास पाहिजे. साध्य निश्चित झाल्यानंतर सध्यांचें प्रत्येक व्यक्तीचें उत्पन्न काय आहे उत्पादक साधनें कोणतीं व कशा तऱ्हेचीं उपलब्ध आहेत ह्यांचें समग्र ज्ञान करून घेणें अवश्य आहे. कारण ह्याच साधनांच्या सहाय्यानें साध्य मिळवावयाचें आहे. उपलब्ध साधनें निकृष्ट असल्यास त्यांत सुधारणा करून तीं कार्यक्षम करून घ्यावीं लागतात. तसेंच आपण साध्यापासून किती दूर आहोंत हेंहि लक्षांत घेतलें पाहिजे. साध्य व उपलब्ध साधनें ह्यांचें पूर्ण ज्ञान करून घेतल्यानंतर ह्या साधनांच्या साहाय्याने कोणत्या पद्धतीनें वा प्रक्रियेनें साध्य मिळवितां येईल—म्ह० आवश्यक वस्तूंचें पुरेसें

उत्पादन व त्यांची योग्य विभागणी ह्यासंबंधीं परिपूर्ण योजना आखावयाची. परंतु ही योजना आखतांना आर्थिक व्यवहार व त्याचा इतर जीवनाशी संबंध, अर्थशास्त्र व इतर संलग्न शास्त्रें ह्यांचें व्यापक व सखोल ज्ञान आवश्यक आहे.

या शिवाय नियोजन म्हटलें म्हणजे आणखी कांहीं गोष्टी आवश्यक असतात. प्रथम नियोजनाची अंमलबजावणी करणारी सत्ता अवश्य आहे. राष्ट्राच्या आर्थिक योजनाची सत्ता अर्थात् राष्ट्रीय सरकारकडे राहील, सत्तेबरोबर जबाबदारीहि राहील. राज्यसत्तेशिवाय दुसरें कोणीहि या कार्यास लायक व पात्र नसतें. यांतून दुसरी महत्वाची गोष्ट उद्भवते. सध्या हिंदुस्थानांत तरी आगगाड्या, टपाल, इ. धंदे सोडल्यास सर्वच धंदे खासगी व्यक्ति किंवा व्यक्तिसमूह ह्यांच्या ताब्यांत आहेत. व त्यांना आतांपर्यंत बरेंच आर्थिक स्वातंत्र्य होतें, व अजूनहि आहे. परंतु नियोजनाचा अवलंब केल्यानंतर त्या आर्थिक स्वातंत्र्याला पायबंद घालून मर्यादित करावें लागतें. म्हणजे नियोजनाचा परिणाम व्यक्तींच्या आर्थिक स्वातंत्र्यावर नियंत्रण घालण्यांत होतो. आर्थिक स्वातंत्र्याबरोबरच स्पर्धाहि नियंत्रित होते.

आर्थिक योजनेचा उद्देश :

जनतेची आर्थिक स्थिति सुधारून तिची कार्यक्षमता, आरोग्य इ० वाढवून तिचें एकंदर जीवन समृद्ध, सुखी व उन्नत करणें हा आर्थिक नियोजनाचा उद्देश आहे. पूर्ण व्यक्तिस्वातंत्र्याच्या परिस्थितींत प्रत्येक व्यक्ति आपल्या वैयक्तिक फायद्याच्या दृष्टीने व्यवहार चालवीत असते. त्या व्यवहाराचा समाजावर प्रत्यक्षाप्रत्यक्ष, तात्कालिक व दीर्घकालिक परिणाम इष्ट होतो कीं अनिष्ट ह्याचा ती विचार करीत नाही; कित्येकदा विचार करण्यासहि ती अपात्र असते. शिवाय अनियंत्रित स्पर्धेचे व्यक्तिदृष्ट्या व समाजदृष्ट्या अनेक अनिष्ट परिणाम होतात; उत्पादक साधनांची व्यर्थ नासाडी होते व केव्हा दुरुपयोग होतो. कुटुंबांत एक चालक नसल्यास किंवा समाजांत राज्यसत्ता नसल्यास जी अवस्था होते तीच अवस्था अनियंत्रित व्यक्तिस्वातंत्र्याने व योजनेच्या अभावी आर्थिक क्षेत्रांत होते. कारखान्यांत ज्याप्रमाणे सुव्यस्थित व नियमित उत्पादन चालू राहतें, त्याचप्रमाणे नियोजनामुळे समाजरूपी कारखान्यांत उत्पादक साधनांचा व्यर्थ नाश न होतां आर्थिक व्यवहार सुरळीत चालून तेवढ्याच श्रमांत जनतेंची आर्थिक स्थिति सुधारते. आणि ह्याच कारणामुळे आर्थिक नियोजनाची कल्पना थोड्या फार प्रमाणांत तरी सर्व देशांत प्रत्यक्षांत येऊं लागली आहे.

राहणीच्या मानाचा प्रश्न :

वर आर्थिक नियोजनाचें स्वरूप व उद्देश ह्यांची कल्पना फार थोडक्यांत दिलेली आहे. येवढ्याचा जरी वारकाईने विचार केला तरी आर्थिक नियोजनांत केवळ आर्थिक प्रश्नाशिवाय इतरहि महत्वाचे कांही मूलगामी प्रश्न उत्पन्न होतात हें दिसून येईल. त्यांचीं समाधानकारक उत्तरें सांपडल्याशिवाय आर्थिक नियोजन यशस्वी होणार नाही. आर्थिक नियोजनाचें प्रत्यक्ष साध्य प्रत्येक व्यक्तीचें उत्पन्न व राहणीचें मान विशिष्ट किमान मर्यादेपर्यंत वाढवावयाचें हें असतें हें वर सांगितलेंच आहे व ह्यावर कोणी आक्षेप घेऊं शकणार नाहीं. परंतु हें साध्य कसें निश्चित करायचें हा फार महत्वाचा प्रश्न आहे. कोणाला वाटेल अर्थशास्त्रदृष्ट्या हा प्रश्न सहज सुटतो. पण ही गोष्ट वरून दिसते तितकी सोपी नाही.

अर्थशास्त्राचा यासंबंधींचा निष्कर्ष थोडक्यांत असा सांगतां येईल :— व्यक्तींचें उत्पादनसामर्थ्य वा कार्यक्षमता जास्तीत जास्त वाढविण्याच्या दृष्टीनें ज्या वस्तु व सोयी अवश्य असतील त्या सर्व प्राप्त होतील इतक्या प्रमाणांत तरी राहणीचें मान ठेवलें पाहिजे; तसेंच राहणीचें मान जितकें वाढविता येईल तितकें इष्ट आहे, कारण त्यामुळें व्यक्तींच्या उत्पादनसामर्थ्यांत भर पडेल व त्याजबरोबर व्यक्तींचें जीवन सुखी होईल.—यांत उत्पादनसामर्थ्य व सुखी जीवन ह्या दोन दृष्टीनें राहणीचा विचार केला आहे. उत्पादनसामर्थ्य मुख्यतः शारीरिक आरोग्य, शिक्षण व नैतिक सद्गुण ह्यांवर अवलंबून असतें. ह्या सर्व गोष्टींचा निर्णायक विचार केवळ अर्थशास्त्र करूं शकत नाही. आरोग्यशास्त्र, मानसशास्त्र, समाजशास्त्र, नीतिशास्त्र वगैरे शास्त्रांतील तज्ञांचा सल्ला अर्थशास्त्रज्ञांना घेणें अवश्य आहे. केवळ भरपूर व पौष्टिक अन्न म्हटल्यानें हा प्रश्न सुटत नाहीं. उदाहरणार्थ, आहारांत तेल आवश्यक आहे तरी यांत्रिक चक्कीचें तेल किंवा घाण्याचें तेल यापैकीं कोणतें तेल अधिक हितकर याचा निर्णय करावा लागेल. या बाबतींत लोक अज्ञानी असतात. तसेंच हातसडीचा तांदूळ किंवा यंत्रानें साफ केलेला तांदूळ अधिक हितकर ह्याचा निर्णय करून राहणींत कोणत्या वस्तु अंतर्भूत करावयाच्या हें ठरवावें लागेल. चक्कीचें तेल व यंत्रानें साफ केलेला तांदूळ ह्यांत जीवनसत्व कमी असतें असा आरोग्य-शास्त्राचा निर्णय झाला आहे. आतां दोन पर्याय पुढे उभे राहतात. यंत्रोत्पादित निःसत्व वस्तु व त्याच्या जोडीला जीवनसत्वें पुरविणारी औषधें हा एक पर्याय व घरगुती पद्धतीनें उत्पन्न केलेल्या सत्वयुक्त वस्तु हा दुसरा पर्याय. ह्यांतून कशाची निवड करायची ? हें ठरल्यानंतर त्याप्रमाणे उद्योगधंद्यांचें स्वरूप ठरवावें लागेल. हीच गोष्ट राहणीच्या इतर बाबींनाहि लागू आहे. अर्थशास्त्रज्ञ यांत्रिक उत्पादन अधिक स्वस्त म्हणून पसंत करतात. कारण ते इतर महत्वाच्या शास्त्रांत अज्ञानी असतात. त्याचप्रमाणे नैतिक गुण कोणते आवश्यक आहेत, एकंदर राहणीचा त्यांच्यावर काय परिणाम होतो ह्या सर्वांचा विचार करून राहणीच्या मानाचा प्रश्न सोडविला पाहिजे. सारांश, कार्यक्षमतेच्या दृष्टीनें राहणीचा विचार करावयाचा तरी तो केवळ अर्थशास्त्राच्या दृष्टीनें करता येणार नाही; इतर अनेक शास्त्रांचें साहाय्य घेणें जरूर आहे.

उन्नत व सुखी जीवनाचा प्रश्न—

जीवन सुखी करण्याच्या दृष्टीनेंहि राहणीचा विचार करणें अवश्य आहे. मनुष्य हा यंत्राप्रमाणे केवळ उत्पादनाचा साधक नाही तर तो अर्थाचा उपभोक्ताहि आहे. त्याचें जीवन सुखी व उन्नत करण्याकरिताच आर्थिक सुस्थिति व आर्थिक नियोजन यांची जरूरी आहे. आर्थिक सुस्थिति हें नियोजनाचें प्रत्यक्ष साध्य असलें तर उन्नत व सुखी जीवन हें त्याचें अंतिम उद्दिष्ट आहे, ह्याबद्दल मतभेद उत्पन्न होणें शक्य नाही. परंतु आर्थिक सुस्थिति किंवा राहणीचें मान आणि सुखी व उन्नत जीवन ह्यांचा परस्परसंबंध काय व कसा आहे हा प्रश्न अत्यंत बिकट, गुंतागुंतीचा व जीवनाइतकाच व्यापक व खोल आहे. सुखी आणि उन्नत जीवन हे शब्द सर्वांना आवडत असले तरी फारच थोड्यांना त्याचा निश्चित अर्थ कळत असतो. मनुष्याचें जीवन संपूर्ण व अखंड आहे; त्यांत राजकीय, आर्थिक, सामाजिक असे वेगळे तुकडे पडूं शकत नाहीत; अखंड जीवनाचे ते वेगवेगळे पैलू आहेत.

हे सर्व पैलू परस्परसंबद्ध व परस्पर परिणामी आहेत. तेव्हा संपूर्ण व अखंड जीवनाची व त्याच्या विविध अंगांची व त्यांच्या परस्परसंबंधाची जाणीव करून घेतल्याशिवाय आर्थिक नियोजनाने जीवन सुखी व उन्नत कसे होईल हें सांगणें कठिण आहे.

सुख व उन्नति हे शब्द जीवनापेक्षाहि अधिक घोटाळ्यांत टाकणारे आहेत. जीवनाचें निश्चित तत्वज्ञान, ध्येय, जीवनाचे निसर्गसिद्ध नियम ह्यांची स्पष्ट व निश्चित कल्पना असल्याशिवाय जीवन सुखी व उन्नत होतें किंवा काय हें कसें सांगता येणार ? बहुतेक अर्थशास्त्रज्ञ आपल्या क्षेत्रांत विशेषज्ञ (specialists) असतात, त्यांनी संपूर्ण जीवनाचा, तसेंच सुख व उन्नति ह्यांचा सामान्य देखील विचार केलेला नसतो. त्यांची कल्पना अशी असते की अर्थोत्पादन व अर्थसामुग्री वाढविली की सुख आपोआपच मिळेल. सुख हें अंतःकरणाच्या ठेवणीवर, बाह्य-साधनसामुग्रीवर, किंवा ह्या दोहोंवर अवलंबून आहे; दोहोंवर असल्यास त्यांचा परस्परसंबंध, प्रधान–गौण–भाव काय आहे, इत्यादि गोष्टींचा निर्णय तत्वज्ञ व मानसशास्त्रज्ञ ह्यांना लावावा लागेल व तो निर्णय घेऊन अर्थशास्त्रज्ञांना आपलें पुढचें कार्य करावें लागेल. गांधीजींनी आपलें जीवनाचें तत्वज्ञान, ध्येय वगैरे निश्चित ठरविलें व तदनुसार त्यांनी आपली अर्थव्यवस्थेची व आर्थिक नियोजनाची रूपरेषा सांगितली. समाजवाद्यांचा आर्थिक जीवनावर विशेष भर असला तरी अर्थव्यवस्थेची उभारणी करतांना त्यांना देखील जीवनाचें तत्वज्ञान, मनुष्याचें व समाजाचें ध्येय, समाजाच्या उन्नतीचे नियम ह्यांचा शास्त्रीयदृष्ट्या विचार करणें भाग पडले व तसा विचार त्यांनी केलाहि.

व्यक्ति व समाज :

नियोजनांत समाजहिताच्या दृष्टीने व्यक्तीच्या आर्थिक स्वातंत्र्याचें नियंत्रण करावें लागतें. ह्या नियंत्रणाचें स्वरूप भिन्न प्रकारचें असूं शकेल. सर्व धंद्यांचें राष्ट्रीयीकरण करून व्यक्तिस्वातंत्र्य अत्यंत मर्यादित झालें असेल. हें एक टोंक. सरकारनें धंदा उभारण्यास परवानगी देणें व कांहीं वस्तूंचें भावनियंत्रण करणें, हें दुसरें टोंक. ह्या दोन टोकांच्या मर्यादेंत नियंत्रणाचे अनेक पर्याय पडतील. ह्यापैकी कोणता पर्याय स्वीकारावयाचा ह्यासंबंधी कांही तरी सूत्र पाहिजे. व्यक्ति आणि समाज ह्यांचे परस्पर-संबंध काय असावेत, त्यांच्यांतील विरोधाचा परिहार करून व्यक्तिहित व समाजहित ह्यांचा समन्वय कसा साधायचा हा समाजशास्त्राचा फार महत्वाचा प्रश्न आहे. आर्थिक जीवन सामाजिक जीवनाचें एक अंग असल्यामुळे समाजशास्त्रानुसार व्यक्ति व समाज ह्या संबंधीचें निर्णित झालेलें सामान्य धोरण किंवा सूत्र घेऊनच आर्थिक नियोजनांतील हा प्रश्न सोडवावा लागेल.

सारांश :

आर्थिक नियोजनासंबंधी वर अगदी त्रोटक विवेचन केलें आहे. परंतु त्यावरून देखील अर्थनियोजनाचा सर्वांगिण व सखोल विचार करायला लागलो तर त्यांतून अर्थशास्त्राच्या कक्षेंत न येणारे परंतु जीवनासंबंधीचे कांही महत्वाचे मूलगामी प्रश्न उत्पन्न होतात हें सहज ध्यानांत आलें असेल. आर्थिक नियोजन हा केवळ अर्थ-शास्त्रज्ञांचा विषय आहे अशी पुष्कळांची समजूत आहे. परंतु ती सत्यापासून किती दूर आहे हें आतां वाचकांना पटलें असेल. प्रत्यक्ष आर्थिक नियोजनास हात घालण्या-

पूर्वी जीवनाचें तत्वज्ञान व ध्येय, जीवनाच्या उन्नतीसंबंधीं निसर्गसिद्ध नियम इत्यादि विषयी कांही मूलभूत सिद्धान्त शास्त्राधारें निश्चित केले पाहिजेत. तसेंच जीवन अखंड व एकरस असून त्याचीं जीं राजकीय, नैतिक, सामाजिक, आर्थिक इ. अंगें आहेत त्यांचा एकमेकांवर काय परिणाम होतो; व्यक्ति व समाज ह्यांच्या हिताचा समन्वय कसा साधतां येईल इत्यादि गोष्टींसंबंधी जीवनाच्या विविध अंगांचा अभ्यास करणाऱ्या शास्त्रांच्या सहाय्याने कांही सामान्य नियम ठरविले पाहिजेत. येवढी पूर्वतयारी झाल्यानंतर शास्त्रनिर्णित जीवनाच्या कल्पनेशी संवादी व अविरोधी असें समाजाचें आर्थिक नियोजन वा अर्थव्यवस्था अर्थशास्त्रीय-सिद्धान्तांच्या आधारे आंखली पाहिजे. नियोजनाची अंमलबजावणी क्रमशः करणें शक्य असलें तरी त्याचा संपूर्ण आराखडा हा अगोदरच तयार असला पाहिजे. इमारतीचा दृष्टान्त ह्याला उत्तम लागू पडतो. इमारतीचें कार्य आरंभ करण्यापूर्वी आपण वास्तुशास्त्रज्ञाकडून इष्ट सोयी, जमीन व इतर मालमसाला ह्यांचा विचार करून संपूर्ण इमारतीचा नकाशा तयार करवितों व नंतरच शक्त्यनुसार संपूर्ण इमारतीचें किंवा कांही भागाचें काम सुरू करतों. संपूर्ण नियोजनाचा आराखडा तयार न करतां केवळ आंशिक अर्थयोजना हातीं घेतल्या तर इमारतीप्रमाणेच नासधूस, अव्यवस्था, गैरसोयी उत्पन्न होतील. आर्थिक नियोजनांत कोट्यावधि जीवांचे हितसंबंध गुंतले असतात ही जाणीव ठेवून नियोजक सत्तेने आपलें कार्य लोकहितैषी तज्ज्ञांच्या सहाय्याने फार विचारपूर्वक केलें पाहिजे.

पंचवार्षिक योजनेची भूमिका

वर निर्दिष्ट केलेल्या कांही मूलगामी प्रश्नांविषयीं समितीची भूमिका काय आहे ह्याचा थोडा फार उल्लेख प्रतिवृत्ताच्या प्रस्तावनेत व प्रथमभागांत (The Approach to Planning) सांपडतो. सामाजिक, राजकीय व आर्थिक समता व न्याय हें उद्दिष्ट भारताच्या राज्यघटनेला अनुसरून समितीने मान्य केलें आहे. आणि त्याच्या आधारे व्यक्तीचा कामाचा हक्क, योग्य वेतनाचा हक्क आणि आर्थिक सुरक्षितता हे उद्देश पुढे ठेवून योजना आखण्यांत आली आहे. [पान ११.] तरी पण जीवनाची कांही निश्चित कल्पना घेऊन आर्थिक नियोजनाचा प्रयत्न करण्यात आलेला दिसत नाही. अशी निश्चित कल्पना करणें समितीला योग्य, शक्य किंवा आवश्यक वाटलें नसावें. कारण ज्या सामाजिक आणि आर्थिक कल्पनांवर राष्ट्रीय योजनेची उभारणी करायची त्या कल्पना स्थिर न राहता विकास पावतील अशी समितीची धारणा आहे. (पान ५)

राजकीय भूमिका

राज्यसत्तेने समाजाचें आर्थिक नियोजन करावयाचें तें कायद्याच्या व राज्य-घटनेच्या आधारावरच करणें शक्य आहे. भारताची राज्यघटना लोकसत्तावादी आणि सांघिक स्वरूपाची आहे. ही भूमिका लक्षांत घेऊन सामान्य जनतेच्या पचनीं पडेल व तिला मानवेल अशीच योजना आखायला पाहिजे. सर्वसत्ताधीश किंवा हुकुमशाही (totalitarian) पद्धतीपेक्षा लोकशाही पद्धतींत नियोजनाचें स्वरूप भिन्न राहील आणि नियोजनाचे कार्यहि काठिण व अडचणींनी भरलेलें राहील ही गोष्ट निर्विवाद आहे. राज्यघटनेच्या सांघिक स्वरूपामुळे योजनेची अंमलबजावणी

 करण्याचें कार्य मध्यवर्ति सरकार, राज्यसरकारें इ. भिन्न सत्तांमध्ये विभागून दिलें

आहे आणि त्यांच्या समन्वयाची व एकसूत्रीपणाची जबाबदारी मध्यवर्ति सरकारवर सोपविली आहे.' (पान ९–१०)

राष्ट्रीयकरण व खासगी प्रयत्न

नियोजन म्हटलें की व्यक्तिस्वातंत्र्याचें नियमन आलेंच. परंतु यासंबंधी कांही स्पष्ट भूमिका समितीने "नियोजनाचें तंत्र" (पान २३–२६) या शीर्षकाखाली मांडली आहे. सरकारच्या औद्योगिक धोरणासंबंधीच्या एप्रिल १९४८ च्या ठरावानुसार ही भूमिका समितीने स्वीकारली आहे. आर्थिक जीवनाचे सार्वजनिक विभाग आणि खासगी विभाग असे दोन विभाग पाडून सार्वजनिक विभागांत सरकारी मालकी व धंद्यांचें राष्ट्रीयीकरण मान्य केलें आहे, तर खासगी विभागांत खासगी प्रयत्नांचें नियमन व नियंत्रण सरकारने करावयाचें आहे. 'Planning, **under present conditions**, thus means, in practice, an economy guided and directed by the state and operated partly through direct state action and partly through private initiative and effort! या वाक्यांत समितीच्या भूमिकेचें सार सांपडतें. सरकारी ठरावांत या संबंधी असा खुलासा सांपडतो. खासगी मालकीचे जे प्रचलित धंदे असतील त्यांचें राष्ट्रीयकरण कांही काळपर्यंत (for some time to come) सरकारने करूं नये, इतरत्र सरकारी प्रयत्नांचें कार्यक्षेत्र असावें. खासगी धंद्यांचें नियमन करण्याकरिता विकासमंडळांचा उपयोग करण्याची शिफारस समितीने केली आहे.

समितीच्या या भूमिकेंत थोडी त्रुटि आढळून येते. 'सध्याच्या परिस्थितींत' किंवा 'कांहीं काळपर्यंत' (म्ह० पांच दहा वर्षांचा काळ) या शब्दांतूत असा भाव निघतो की समाजाचें दीर्घकालीन आर्थिक नियोजन करावयाचें नसून एक तात्पुरती अर्थ योजना तयार करावयाची आहे. पुढे परिस्थिति बदलली तर नियोजनाच्या भूमिकेंतच आमूलाग्र परिवर्तन होण्याच्या संभव आहे. अशी अनिश्चित व अल्पकालीन भूमिका असल्यामुळे या पंचवार्षिक योजनेपासून दीर्घकालीन आर्थिक नियोजनाची अपेक्षा करणेंच चूक होईल. दुसरी गोष्ट अशी की या योजनेंतील सरकारी क्षेत्रांतील कार्य पूर्णपणें पार पडलें तरी खासगी क्षेत्रातील ठरविलेलीं उत्पादनाचीं उद्दिष्टें (Targets) साधलीं जातील याची शाश्वति काय ? यासंबंधीं सर्व भर खाजगी उद्योगपतींचें सहकार्य आणि सरकारी दिग्दर्शन व नियंत्रण ह्यांवर आहे. योग्य सहकार्य मिळालें नाहींतर काय उपाययोजना करावी हा प्रश्न तसाच सोडलेला आहे. या कारणांस्तव, ही योजना म्हणजे समाजाचें संपूर्ण व दीर्घकालीन आर्थिक नियोजन नसून कांहीं उद्योगधंद्यांवर कांही रक्कम खर्च करण्याची पंचवार्षिक योजना आहे असें म्हटलें तर तें फारसे अयोग्य होईल असें वाटत नाही. आपण संक्रमणकाळांतून जात असून जीवनाच्या तात्विक, राजकीय इ० कल्पना आपल्या देशांत अजून स्थिर झाल्या नाहीत. असें असल्यामुळे असा निर्णय समितीने घेतला असण्याचा संभव आहे.

जीवन प्रणालि

राहणीचें मान येत्यां पांच वर्षांत युद्धपूर्व (१९४०) पातळीवर आणावयाचें हें किमान उद्दिष्ट समितीने समोर ठेवलें आहे व त्याप्रमाणे अन्न, वस्त्र, घर, इत्यादि आवश्यक वस्तूंच्या उत्पादनाचा विचार केला आहे. हा सर्व विचार केवळ आर्थिक

दृष्टिकोणांतूनच केलेला दिसतो. लोकांच्या जीवनप्रणालीच्या स्वरूपाविषयी कांही स्पष्ट निर्देश सांपडत नाही. यांत्रिक प्रगतीतून निर्माण होणारी पाश्चात्य जीवनप्रणालीच समितीने गृहीत धरलेली दिसते. यामुळे ही योजना गांधीप्रणीत अर्थव्यवस्थेशी जुळणारी असेल अशी अपेक्षा करतां येत नाही. आचार्य विनोबाजी भावे ह्यांची टीका बव्हंशी या मतभेदांतून निर्माण झालेली दिसते.

समारोप

समाजाचें आर्थिक नियोजन करतांना म्हणजेच समाजाची दीर्घकालीन नियोजित अर्थव्यवस्था तयार करतांना कांही मूलगामी प्रश्नांविषयी स्पष्ट व निश्चित भूमिका असावी लागते. या दृष्टीने पाहिल्यास पंचवार्षिक योजनेंत अनिश्चितता व अपूर्णता दिसते. अशी निश्चित भूमिका ठरविणें अत्यंत दुष्कर व बिकट कार्य आहे आणि म्हणून त्याला बराच कालावधि लागणेंहि साहाजिक आहे. तरी पण या निश्चित भूमिकेच्या अभावीं, स्थिर, नियोजित अर्थव्यवस्था निर्माण होणें अशक्य आहे येवढेंच दाखविण्याचें या लेखाचें प्रयोजन आहे.

आगल्या सालीचं मकान

★

व्यं. ब. पुराणिक

साऱ्या 'पिराथिमिवर' उकर्ड्याला स्वामित्व सांगतां येईल अशा थोटावर मोजतां येतील इतक्या वस्तू आहेत. त्यांपैकी प्रथम लक्षांत येणारी वस्तु म्हणजे त्याचे महारवाड्यांतले वंशपरंपरागत चालत आलेले मकान—घर! बऱ्याच दिवसांपासून तें जुनाट होऊन पडायला झालें आहे. त्याच्या बापाच्या बापाने कधी काळी बांधले होतें हें फक्त दुरपदा बुढीला माहीत होतें. ती कधीमधी सांगे कीं 'छप्पनच्या काळांत तुझ्या आजाने बांधले होतें.'

दुसरी मालकीची गोष्ट म्हणजे त्याची गांवची काठी! कामदार म्हणून दर तीन वर्षांनी त्याच्याकडे गाव कामदारी मिळायची. काठी आली कीं ठराविक तारखांनी दरमहा बारा रुपये मिळायचे. आणि काठीचें साल संपलें की कुणाच्या तरी खटल्यावर सालदारी पत्करायची. अवंदा काशीरामबुवाच्या घरीं सालदारी पत्करून आपलें मकान एकदा नवें करून टाकूं असें त्याच्या मनांत किती तरी वर्षांपासून येत आहे. पण अवंदा अवंदा करून दहा वर्षे गुजरलीं तरी झोपडी सुधारायचें कांही अजून जमलेलें नाही.

या शिवाय एका चालत्याबोलत्या जिवावरहि त्याचें स्वामित्व आहे. ती म्हणजे त्याची बायको अलूखी! तिचें नांव पोराठोरांपासून ते म्हाताऱ्याकोताऱ्यापर्यंत सर्वांच्या ओळखीचें आहे. मोरणे ऱ्या खडकपेंडावर पाण्याला जातांना गुजी मोठ्याने विचारते 'अलूखी वंऽचालतं काय नदीवर' तेव्हां शेजारीपाजारी ओळखतात की उजाडायची वेळ झाली आहे.

तसा अलूखीने थाटलेला संसार कांही मोठा नाही. बुडें काळीं झालेलीं दोन ॲल्यूमिनयमचीं पातेलीं, एक फुटायला झालेला तवा, लोखंडाच्या दोन दिवनाल्या आणि दोन काशाच्या थाल्या एका कोपऱ्यांत ठेवल्या आहेत. दुसरीकडल्या कोपऱ्यांत जात्याजवळ एक फुटका पेला पालथा ठेवला आहे. मंद धूर निघणाऱ्या चुलीवर एक काळें मडकें ठेवलें आहे. समोरच्या भिंतीवर एक कृष्णाचें चित्र व दुसरे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे चित्र अडकवलेलें आहे. भिंती कशा लख्ख सारवलेल्या. झोपड्याला लागून एक मांडव घातला आहे. त्यावर एक कोहळें मध्येंच लोंबत आहे. घराची खरी शोभा तर तुळसी वृंदावनांच्या भोवताली ठेवलेल्या रिकाम्या अंगणांत आहे. पाऊस काळाचे चार महिने संपले की दसऱ्याच्या दिवसांपासून रोज घट्ट शेणाचा सडा घालायचा; बाहेरच्या भिंती पांढऱ्या—गढीच्या मातीने सारवायच्या आणि दोन लहान कोनाड्यांत दोन पणत्या लावून ठेवायच्या! रस्त्याने जाणायेणाऱ्याला कांही क्षण तरी या 'मकाना' कडे पहातच राहावें असें वाटे! यंदा मात्र हें मकान पाडलें पाहिजे. नाहीतर पावसाळ्यात ते सरळ खाली येणार आहे!

काठी बदलली की आतां आपण मारोत्याच्या घरांत चार महिने भाड्यानं राहूं असा विचार उकर्ड्यानं बायकोला सांगितला. नाही तरी मारोत्या आता मास्तर होऊन आसेगांवला बदलून गेला आहे. देऊं चार आठ आणे भाडें! अलखीला हा विचार सोळा आणे वाटला. मास्तरने दर महा दहा आणे भाड्याने घर दिलें; पण सांगून ठेवलें की रोज दिवा लागावा म्हणून घर दिलें आहे! नीट सांभाळून वापरा. त्या दिवशी संध्याकाळी स्वतःच्या घरांतला सारा संसार दोघा नवराबायकोंनी आणून भरला. पण रात्रीं दोघांनाहि झोप येईना. नवें मकान बांधायची चर्चा अर्ध्या रात्रीपर्यंत चालली होती. हक्काचें घर समोरच्या कवटीच्या झाडाजवळ असून दुसऱ्याच्या घरीं अशा रीतीने झोपण्याची ही पहिली वेळ! उकर्ड्या म्हणाला होता—

" काठीवाला म्हून मी लय बखतां जंगलानं रातचा राह्यलों तर मटकेच डोया लागे. आज काहून झोप येत नाही का जनं—? "

" सवताचं मकान गांवांत मौजूद हाये तर या आपन दुसऱ्याच्या घरांत आसरा घेयाले जसे आपन आजच आलो. त्यानं नसन येत—" अलखी समाधान करींत होती. तसा तो आठवून म्हणाला—

" बरी याद आली अलखे! आपन आपल्या मकानावर बल्ल्या वालूं या वक्ती—"

" हो! पर आनता कोठून बल्ल्या घ्यायले पैसे? "

" अव त फुकटांत भेटतीन " आत्मविश्वासानें तो म्हणाला. " गोविंदा पाटलाच्या घराचा मसाला चार सालापासून पडेल हाय! त्याह्यनं मांगल्या हप्ती सांगतलं का तुले लागन त दोन बल्ल्या अन चार टुण्या बेशक घेऊन जाय. "

" नग व माय.—त्याह्यच्या घरची माती नग आपल्याले. त्या वाड्याचा मसाला तंट्यातला हाये. दत्तक पाटलाचा गोविंदाबुवाशी तर कचेरींत भल्ला झगडा चालला हाये म्हनतात. गोविंदा पाटलानं तुम्हाले बल्ल्या द्यावं अन दत्तक पाटलानं चीपसाह्यबाकडं चोरीची कैफियत द्याव! मंग राहाल कुठी तुम्ही! मकान बांधायच्या अगुदर जमादार नेइन ठान्यावर !—"

" हे पाहाय! हे तुहं हटकनंच तर खराब आहे.—काल खुद् गोविंदा पाटलाले म्या इचारलं त ते म्हनतं का बेशक घेऊन जाय! पन झाकटं पलड्या बिगर नेऊं नग. काय हरकत नाही त्यांच्या हुकमा परमानं करायले—"

" पहाय रे बुवा! माहं काय जातें! पर गोइंदा पाटलाची सवताची चीज वस्त हाये तर ती भर दिवसा न्यायले कोनाची चोरी काहून? "

" बरं बुवा... मी खुद् विचारील आखीन एकडाव......"

तरी अलखीचा सल्ला डावलून त्याने चार टुण्या आणि दोन बल्ल्या झाकटींत आणून भिंतीच्या आडोशाला ठेवल्याच. काठी बदलली त्यामुळे बिगारीचा ससेमिरा मागे नव्हता. घर बदलल्यानंतर दुसऱ्याच दिवशी भिंतीची माती पाडून चांगली तयार केली. गढीची पाचपंचवीस टोपल्या माती, शेण घालून गारा तयार केला होताच. एका हप्त्याभरांत हां हां म्हणतां भिंती उभ्या झाल्या. अलखी दोन जिवांची!

पण माती चुरायला पाणी आणायला तिची बरोबरीने मदत झाली होती. आतां फक्त आढ्याच्या बल्ल्या लावायच्या, चार ठुण्या चार बाजूंनी पक्क्या करायच्या आणि वर तुऱ्हाट्या पऱ्हाट्या पसरून असतील नसतील तेवढी कौलं अंथरलीं की लक्षुमीची सोय झालीच. नाही तर एकदा कां झड सुरुं झाली की सालभर कांही हें जमायचें नाही आणि बाळंतपण सुद्धा भाड्याच्याच घरांत करावें लागणार !

उन्हाळा सुरु झाला होता. पूर्णापट्टीच्या काळ्याभोर शेतांत कपाशीच्या पिकाचे वाळलेले पऱ्हाटीचे भारे उपटून बांधण्याचें काम शेताशेतांनी सुरुं झालें होतें. एक एकर पऱ्हाटी उपसावी आणि भाऱ्यांनी बांधावी तेव्हा कुठें तीन रुपये मिळायचे आणि दोन भारे घरीं आणतां यायचे. दोघांनीही झाकटींत उठून शेतांत उघडें काम घेतलें होतें तिथे जायचे. डोक्यावर सूर्य येईतोंवर भारे बांधायचे आणि घरीं येतांना एकेक भारा बांधून आणायचा. त्या दुपारीं अलुखीनं डोक्यावर भारा घेतला आणि महारवाड्याची वाट धरली. वर सूर्य आग ओकत होता. बापूंच्या आखरा-जवळून महारवाड्याकडे सगर फुटतो, त्या ठिकाणापर्यंत वर येईतो ती घामाघूम झाली होती. पावसाळ्यांत वळचणीवरुन जसे पाण्याचे थेंब टपटप गळतात तसा घाम कपाळावर पुढे आलेल्या केसांच्या लटांमधून टपटप खाली गळत होता. ती मनाशी म्हणत होती—'हा आजचा शेवटला भारा: जमलेल्या पऱ्हाट्यांतले कांही जळणासाठीहि ठेवतां येतील. पाऊस काळाची बेगमी करणें तर जरूर आहे. छप्पर अंथरलें कीं चार दिवसांत आपण घराला पहिल्यासारखी कळा आणूं. घट्ट शेणानं सारे अंगण सारवून काढूं. कोपऱ्यांत नांद आहेच. तिच्यावर एक लहानसा मांडव घालू. अवंदा खारी कोहळ्याचा येल लावूं.' असें मनांत असतांना घराच्या बांधून झालेल्या भिंतींजवळ ती आली; तेव्हा आपलें घर पुरें झाल्यावर कसें दिसायला लागेल हें चित्र तिने मनासमोर आणलें.

पुढच्याच घराच्या अंगणांत गुजचिें तान्हें मूल सावलींत एका रकट्यावर खेळत हात पाय उडवीत पडलें होतें. ते घटकेंत हात पाय उडवी तर घटकेंत एका अंगावर होण्याचा प्रयत्न करी; आणि जवळच मोगरीने कणसें कांडत बसलेल्या त्याच्या आईच्या लाल लुगड्याकडे क्षणभर पाही. त्याला पाहताच अलुखीचा चेहरा एकदम कावरा बावरा झाला. आणि आपणहि थोड्याच काळांत अशाच एका मुलाची आई होणार आहोत या जाणीवेने तिच्या थकलेल्या मुद्रेवर थोडें प्रसन्नतेचें हसूंहि उमटलें.

यापुढे वेळ फुकट घालविणें योग्य नव्हतें म्हणून लागलीच दोघेहि बल्ल्या आडव्या टाकून झाल्यावर त्यांवर बांबू अंथरून पऱ्हाट्या तुऱ्हाट्या पसरावयाच्या कामाला लागलीं. संध्याकाळचे किरण कौलावर पडले तेव्हा कौलें छपरावर चढलीं होतीं. आतां फक्त भिंतीच्या बाजूने बांबूंना काथ्याच्या दोरीने पक्के आवळून छप्पर मजबूत करावयाचें राहिलें होतें. अंधार पडायला लागला तेव्हा फक्त दोनच बांबू आवळावयाचे राहिले. पण उकर्ड्या छपरावरून उडी टाकत म्हणाला :—

"आतां लय झाकट पडली. सकाय सकाऊन करूं—"

त्याने खाली पडलेलें जमिनीवरचें सर्व सामान उचलून सुद्धा ठेवलें; पण अलुखीच्या मनांत होतें कीं आताच आपण अधिक अर्धा घंटा राबलों तर बरें होईल.

भर दिवसाचें ऊन अंगावर घेऊन काळवंडलेला उकड्यांचा चेहरा तिने न्याहाळून पाहिला आणि ती मुकाट्याने भाड्याच्या घराकडे परत गेली.

रात्रींचें जेवण झाल्यावर अलुखी म्हणाली होती, "आपली नांद जशी दुवाल तशी लहानसाक मांडव घालनार आहो मीं अवंदा खारी कोहळ्याच्या वेल लाइल म्हनतों"

"लावनं, कोहळे चार पाच जरका आले तर तितलेच पैसे कामा येतील–"

दोघांनाही झोप केव्हा लागली ते कळलं नाही.

झोपेच्या गुंगींत तिला वाटलें हिरवा हिरवा गार वेल घराळगतच्या मांडवावर फोफावत वर चढला आहे. त्यावर ठिकठिकाणी हिरवे पांढरे कोहळे लोंबत आहेत आणि एक लहानसें मूल त्या मांडवाच्या सावलीत रांगत आहे. बाहेर ढगांनी खच्चून भरलेल्या आकाशांत पावसाचे संदेश घेऊन वारे दौडत येत आहेत आणि ढगांतून विजा थैमान करायला लागल्या आहेत...

......तशांत जोराचे वादळ घोंगावत आहे आणि मांडव गदगदा हालायला लागला आहे. त्याची सगळी फळें ताडताड खाली पडत आहेत आणि वेलाचा सगळा गुंडोळा विस्कळून खाली रांगत असलेल्या तान्ह्या पोराच्या अंगावर कोसळत आहे...!

तिच्या तोंडून एक किंकाळी ऐकूं आली. दोघेहि जागे झाले. अलूखीला दरदरून घाम सुटला होता आणि उकड्यां तिला मोठमोठ्याने हाका मारून जागा करीत होता. "अलूखे जागी झाली काय ? वस्नावतं काय झोपेंत"

"नाही जी !--कोठं—" तिनं शांत होत उत्तर दिलं.

आणि बाहेर कान देऊन दोघांनी ऐकले तर वाऱ्याचा प्रचंड धुमाकूळ सुरू होता. मधूनच लाह्या फुटल्याप्रमाणे घराच्या पत्र्यावर ताड्ताड् आवाजांत कांही थेंब पडत व लागलीच थांबत. पण वाऱ्याचा मात्र सूं सूं आवाज आणि ढगांचे कडाडणें अव्याहत चाललें होतें. झाडांच्या फांद्यातून वहात येणारा वारा पत्र्यावर आदळला की त्यावर ठेवलेले मोठाले दगड धाड् धाड् वाजायचे, असा प्रकार सुरूं झाला होता. दोघांच्याहि डोळ्यावरची झोप केव्हाच उडाली होती. ढण ढण जळणारी चिमणी काजळ ओकत होती. आणि दोघेहि नवराबायको चेहरा ओढून चिंतेत निमग्न झालीं होतीं. थोडावेळ असा गेला आणि अलुखीनं त्याला सावकाश म्हटलं "आपलं मकान या तुफानांत कसं राहील कोन जानं"

नेमकी हीच चिंता त्याच्याहि मनांत ठाण मांडून बसली होती. तो चटकन उठला आणि दरवाज्याकडे धावत गेला पण तो दरवाज्या बाहेर जाण्याच्या आधीच तिनं त्याला अडवून म्हटलं—

"या वक्ती मी नाही तुम्हाले बाहेर जाऊ देनार! घराचं काही झालं तरी बेहत्तर हाये!"

इतक्यांत त्यांच्याहातून कडी उघडली गेली आणि आंतला दिवा विझला. आतां मात्र बायकोचें म्हणणे ऐकणे प्राप्त होतें. मुकाट्यानें तो रकट्यावर पडला! पण उरलेली सारी रात्र वादळाचा आवाज ऐकत आणि डोळ्यापुढें आपल्या घराची

अवस्था आणीत एका कुशविरून दुसऱ्या कुशीवर तळमळत होता. वारंवार असें मनांत यायचें "ग्या कोनाचं कांही बिगडलं नाहीं देवद्येनं माहा मकान आजचा दिवस जागच्या जागेवर दिसूं दे! अन् जर का त्याचे कौलं उडून गेले असतील तर या जन्मांत कांहीं कौलं विकत घेतां येनार नाहीत. मंग अलुखीचं बाळंतपण? मंग त याच घरांत करनं भाग आहे...

...दोन महिन्यापासून माती चुरून भिंत बांधली, ठुण्या अन् वल्ल्या घेण्यासाठी गोविंदा पाटलाची मनधरनी केली, पऱ्हाटयांचे भारे आणले तें सगळं फुकट नाही गेलं म्हनजे बेस!"

सकाळ आली आणि सगळ्या धरतीला घुसळून टाकणारा वारा अगदी पडला! पांखरांची किलबिल सुरू झाली आणि अलुखीने उकंड्याला म्हटलें—"चाला! आपलं मकान तर पाहून येऊं"

मोठ्या आशेने दोघे नवरा बायको घरापाशी गेले. घरावरचे छप्पर तिथे उडून गेले होतें पावसात गडी आदल्याच दिवशीं रोवलेल्या ठुण्या आणि वल्ल्या उपसत होते आणि एका ठिगाऱ्यावर दत्तक पाटील संतापून दात ओठ खात गड्यांना तें उपटून घेण्यासाठी हुकूम देत होते. उकिंडर्याला पाहतांच त्यांनी शिव्याचा वर्षाव केला—

"काबे माय्ऱ्या! तुह्या बापाचा माल होता कांबे! का त्या गोंद्या पाटलाचा होता बे! हलवायाच्या घरावर तुळशीपत्तर! वारे वा! त्व्या मले पुसले असतं तर एक नाही घा ठुण्या दिल्या असत्या पन तुम्हाले तो गोविंदा पाटीलच मालक वाटते! चला उचलारे सारे लाकडं! याद राखून ठेव! जर का त्व्या माह्या सामानाले हात लावला तर जेलांत जाशीन बाबू! मंग म्हनशीन काय झालें—"

उकिडर्या शून्य दृष्टीने घराकडे पाहत होता. बांबू, पराट्या तुऱ्हाट्या आणि कौले यांचा पत्ता नव्हता! जवळचे कवठीचें झाड मागल्या भिंतीवर कोसळून पडलें होतें. जणू काय आदल्या दिवशी केलेले परिश्रम केवळ स्वप्नांतलेच असावेत. पण ते सारे विसरून उकिडर्या भानावर आला.

"नाही पाटील साय्रब, कसूर माफ करा. आम्ही कामदार तुमच्या गढीची माती...!"

"पय्लेच तुही अक्कल कोठं गेली होती!! चालारे सारे-"

गड्यांनी ठुण्या उपसल्या. वल्ल्या खांद्यावर घेतल्या आणि महारवाडा सोडला. आणि पाटील त्यांच्या मागोमाग चालू लागले. उकिंड्या आणि अलुखी! दोघेही बावचळलेल्या नजरेंन पडलेल्या तुऱ्हाट्या, तुटके बांबू व कोसळलेल्या भिंती यांकडे पाहत उभी होतीं. आणि दुरपदा बुढी त्याला म्हणत होती. "चाल उकिल्ड्या! अवंदा नाही तर आगल्या सालीं होईन नवं मकान!"

त वं ग

★

येथें शेतावरी, नाचणी
कशी विलगते पायाभंवती
थरथरणारीं नाजुक पातीं
इतुकें कसलें गूज सांगतीं !

इवलीं इवलीं हीं कारंजीं
उडती ज्यांतुन हिरव्या धारा
हिरवें शिंपण अंगावरतीं
रंग उजळतो त्यांतुन न्यारा

त्या रंगाची हिरवी भाषा
अजाण मजला मुळिं न कळे तर
तरंगतो पारे मनोमनावर
त्या रंगाचा तवंग सुंदर!

—इंदिरा

(१)
पाऊल पडतसे जिथें....

पाऊल पडतसे जिथें तुझें देवते
त्याठायिं उगवतें रक्तकमल तेवतें
तव नजर होतसे स्थिर ज्या भूमीवरी
वैराण होत ती धरती निमिषांतरीं

तूं माया दावुन गळां मनुज लाविसी
खाईंत यमाच्या असंख्य ते लोटिसी
नरयज्ञ मांडिसी, होता अन् आहुती—
तो नराचि होतसे, स्थंडिल तूं स्थापिसी

तूं किमयागारिण भयाण, तूं भैरवी
बघ जरा रोपटें नवें, नवी पालवी

(२)
उडूनि गेलीं परी

तृणपातीं झुललीं, उडली विहगावली
जीं क्षणभर होतीं विसावतीं जाहलीं
लोभला तृणांचा जीव, पांखरांवरी
बिनिविलें राग्रला, उडूनि गेलीं परी

—गो. रा. दोडके

आवाहन

★

एकलेपणाचे गात डोहाळे,
मिटुनी घट्ट आंधळे डोळे,
अनेक वर्षे
बसलेत ते अंधसृष्टीची पहात चित्रें.
गेलीं गंजून तयांची हाडुकें.
त्यांना घुसळत निर्दयतेने
झाडीत गंज भर वेगांत
येच तूं आतां.
त्यांचे अंधनेत्र घे तूं काढून,
कोंजिपणची त्यांची काळी रात्र,
खाटीकखान्यांतील गुरांच्यासारखी
कर्कश दीन जीरे ओरडेल
नको होऊं तूं आतां दयार्द्र.
शस्त्रवैद्यासम हो तूं निर्घृण.
घे तूं काढून त्यांचे अंध नेत्र.
फिरव तेथें आपुल्या बोटांचे आश्विन तारे
नवीं उगवलीं तेथलीं बुबुळें
कृतज्ञभावानें पाणावलेलीं
पाहतील मग,
पहाट लालीच्या शिंपणाने तृप्त,
बाळसेदार
नवीन सृष्टि !
विसरूं नकोस,
"निर्घृणतेंतहि आहे सृजन."
ये,...येच तूं आतां !

—य. द. भावे

ज्वलंत मी तर एक निखारा

★

चांदण्यांत मी नाही नाहत
तळपे भानू डोईवरती
अमृत झालें जिथे हलाहल
कुठली कविता? कसली प्रीती
स्वतः पेटुनी पेटविणारा
ज्वलंत मी तर एक निखारा

मुर्दाडांचें मला वावडें
हृदयीं लाव्हा पहा अनावर
या दुनियेची चीड येऊनी
ओंकाराचा बनलों गहिवर!
    ओल्या डोळ्यांतून पुकारा
    ज्वलंत मी तर एक निखारा

इथें नसे पांडित्य हिशेबी
मायावी शब्दांची कसरत
मात्र क्षोभल्यावरि विद्रोही–
शब्द स्फोट जणुं डायनामाइट
    माणुसकीस्तव देत पहारा
    ज्वलंत मी तर एक निखारा

विस्मृत जीवनमूल्यांच्या त्या
निःश्वासांचा एक पेट मी
नव्या जगाच्या प्राजक्ताचें
इवलें, चिमणें लाल देठ मी
    अंतरांत कल्पांत फुलोरा
    ज्वलंत मी तर एक निखारा

हे अन्याया हासत गाइन
तव छातीवर पाउल रोवुन
आणि जेलच्या दगडी भिंती
त्या गीताची करितिल गुणगुण
    राखेतुनिही लखलखणारा
    ज्वलंत मी तर एक निखारा

—सुरेश श्रीधर भट

अभ्रामधली नम्र आर्द्रता

★

अभ्रामधलीं नम्र आर्द्रता
टिपून घेई पहाट अलगद
पुष्पपरागांतून तेव्हढा—
नेमकाच जणुं मिलिंद घे मध !

    —हळूच वदनावरली दुलई
    अंधाराची सारुन, साद
    रवी घालतो वसुन्धरेला
    चैतन्याचे उधाळित रंग

रसरसलेला निसर्ग नटतो
लेउन मग सुमनांचा साज
किरणांचा झगमगता चढवुन
रत्नखचित माथां शिरताज !

    जमूं लागतें अवकाशाच्या
    विराट पेल्यामध्यें तेज
    चमचमतें अन् दिशेंदिशेंतुन
    एक आगळें ऐसे ओज—

(कीं देवेन्द्राहि जयें दिपावा
कुबेर शर्मावा हृदयांत
शाश्वतासही खोल रुतावी
अशाश्वताची प्रमत्त मात !)

    आणि निराळ्या नवरंगांच्या
    नशेंत नश्वरता थयथयते
    चिरंतनाची टिंगल उर्मट
    उघड उघड टिच्चून उडवते !

असेच जाती क्षण कांही पण
विभवा लागे कळा उतरती
लख्ख लागतें दिसूं आणखी
समीप कीं ये अखेर पुरती !

    विभवाचा पळपुश्या धनी रवि
    सौभाग्याचें लेणें सुंदर
    हाय हरपतें, आणि भासतें
    वसुन्धरा भेसूर कलेवर

पहाट येथे होते वृद्धा
जख्खड संध्या सुरकुतलेली
मोल चुकवुनी नियतीचें कटु
कांहि निराळें पण शिकलेली !

    —म्हणून अभ्रांतील आर्द्रता
    टिपून घेई पहाट अलगद
    पुष्पपरागांतून तेव्हढा—
    नेमकाच जणुं मिलिंद घे मध !

—उ. रा. गिरी

अनुक्रमणिका

धोंड्या न्हावी

★

कधी कधी मी
कोकणांतल्या गावीं गेल्यानंतर
जुन्या स्मृतींच्या गांधिलमाशा–
मजला येउन डसती;
आणिक मजला–
धोंड्या न्हाव्याच्या गमती आठवती.

धोंड्या न्हावी...
दोन कुडव भाताच्या साठी
करी हजामत सगळी अमुच्या घरची;
दादांचा तुळतुळीत चंपी गोटा,
गजाननाची ताळू राखुन शेंडी,
आणिक माझा 'कराप' अस्सल शहरी,
अथवा दाढी (चुकवुन चांदखिळांना).

धोंड्या न्हावी...
महिन्यातून कधितरि
हळूच येतो अमुच्या मागिल दारी;
आणिक नंतर,
खोपटिच्या माघारी जाउन–
करितो अद्भुत काहीं,
जें न कुणीही आम्हा पाहूं देई !

धोंड्या न्हावी...
चहा न घेई चक्रम !
आहार त्याचा भक्कम;
जेवण देण्यापेक्षा परवडतें आम्हाला–
देणें त्याला उचलुन रक्कम !
जेव्हा त्याला मधेंच फुरसत होई
'खंड्या' रेडा–
आणिक 'चांदी' म्हैस खरडुनी जाई;
या कामास्तव त्याला न्हेरी मिळते.
निव्वळ त्याची न्हेरी
—म्हणते आई—म्हणजे एक दुशेरी !

धोंड्या न्हावी...
"म्हणजे निव्वळ फत्तर"
म्हणती अमुचे दादा,
"एका वर्षामध्यें
लागोपाट तयाचे
पोर वारले पटकीने चौघेजण !
अमुचा हा धोंड्यापण
आहे तैसा आहे ! बदल न बिलकुल !
एक असे उरला उचलाया तोंवर
मेला म्हणजे सुटला, म्हणतों मी तर !"

धोंड्या न्हावी...
हजामतिस आल्यावर
पैसे वसुली साठी
विष्णू वाणी त्याला येउन गाठी;
करुनी थोडी थट्टा
सुरू करी तो तोंडाचा मग पट्टा;
"शरम तुका थोडीतरि
चार दिसाचो करुन वायदो, धोंड्या,
पोरांसाठी रुपये नेलस तेरा
आणिक त्येका झाले चौदा महिने !
मुद्दल जळ्ळला म्हणतय;
निदान देशी व्याजाच्यो दिडक्यो तरि !
काका खोत नव्हे मी !
मी हय विष्णू वाणी.
पैसे आणुन दे नी
वेउन जा ही नंतर अपुली धोकटी."

धोंड्या न्हावी...
हात चिव्याचे नाकापुढती जुळवुन,
परत म्हणतसे,
"सावकारानूं !
द्येवा सारे तुम्ही.
पोर वाचलो हो तुमच्या पैशावर
त्ये पैसे मी फेडिन, साक्षी ईश्वर,
झिलाक लिवलां होतां ' पैसे पाठव '.
—–लिवणारो हो तुमचो पांडू मास्तर,
त्येका तुम्ही विचारा—
त्येका कडसुन तुमचे
पैसे नाय इलेतर

'भोरो' रेडो यिकीन येवढी–
नांगरणी झाल्यावर "
इतक्या मध्यें
सदरा काढुन खुंटीवरती ठेवित
आणिक धोंदाखालीं
सरकत आलेलें खोचण वर ओढित,
दाढीवरुनी फिरवित हात मजेनें
काका खोत म्हणतसे,
"धोंड्या, अरे हरामा,
हा रेडा तूं विकणार तरी कितिदा
माझ्या व्याजासाठी
देइन म्हणुनी कालच मजला म्हणशी;
आणिक गध्या!
अगदी माझ्या देखत
तेंच सांगशी या विष्णूवाण्याला!"

धोंड्या न्हावी.........
जातीचा ममताळू;
परंतु देशी हत्यारें ती भेसुर!
अगदी पहिल्या पासुन
माझ्यावरती त्याची खूपच माया.
मुंजी मधला गोटा करताना मम
कुरवाळित डोक्याला [खरजटलेल्या]
घालित होता हळूच हलके फुंकर.
मानेवरचें तासकाम करताना
सुसह्य सारें मजला व्हावें म्हणुनी
होता सांगत जुन्या काळच्या गोष्टी–
गमती नाना!
मुंजे आणिक समंध याशीं–
त्याचा परिचय मोठा!
भीतिकथा त्या ऐकत असतां–
कधींच होई गोटा!

धोंड्या न्हावी.........
म्हणजे विचित्र प्राणी
गांधिवधाच्या नंतर
लगेच दुसऱ्या दिवशीं
दाढी करतां करतां
हलक्या आवाजात–
मला तो गंभीरपणें म्हणतो,
" गांधी म्येलो म्हणतात!
लय लय मनात व्होतां
या बाजुक येतो तर
फुकट करुची त्येची एक हजामत!"
ब्राम्हण होते भवती
परंतु त्याना नव्हती
हसण्या—रडण्याची उरलेली हिंमत.
(हसणें–रडणें मुळात एकच;–
अश्रूंतिल ही गंमत)

धोंड्या न्हावी.........
गेल्यावर्षी मेला आणिक सुटला;
कोसळलें घर; उभी असे पडवी पण!
जनी बिचारी—जी त्याची मागारिण—
त्यातच खाते उकडुन;
"माका न्हेउन जितांच जाळा," म्हणते
भांडी घासत असते;
खाते ;
निजते ;
उठते ;
नकळे भिते कशाला,
कधी न शिवते धोंड्याच्या धोकटीला!
पडवीतिल एकुलत्या खुंटी भवती
पिळवटुनी, पिळवटुनी,
अपुल्या पट्ट्याचा घालुनिया विळखा
धोकटी घेत विसावा;
डोकें टेकुन झिजक्या पाजळण्यावर
हत्यारें ही निजली सारीं–
त्यातच होउन जर्जर.

धोंड्या न्हावी...
"धोंड्या म्हणजे निव्वळ काळा फत्तर"
अजुनी कोणी म्हणती,
"नव्हती त्याला संसारातिल अक्कल!"
धोंड्या गेला, सुटला.
कशास मजला चिंता
माझ्या ही डोक्याला आतां–
पडलें विस्तृत टक्कल!

—विंदा करंदीकर

जीवन म्हणजे आनंदाच्या महिरापी

माझे नेत्र चकाकत्या सोनेरी किरणांवरुन उडून माझ्या पडछायेवर स्थिरावले. तीव्र कुतूहलाने मी त्या पडछायेकडे पाहूं लागलों. पाहतां पाहतां आसमंतात अनेक छाया उपजल्या. आणि माझ्या पडछायेला चौफेर वेढून खिजवूं लागल्या !

उपेक्षेच्या स्वरांत त्या उद्गारल्या :

—तूं देहाची छाया आहेस. म्हणूनच सीमित आणि गतिशून्य आहेस, आम्ही छाया नव्हत. विशाल जीवनाचीं प्रतीकें आहोंत.

क्षणभराने त्या उंच उंच विस्तारल्या आणि पृथ्वी आणि आकाश व्यापून अखेर अंतर्धान पावल्या.

त्यांच्या क्षणांपूर्वीच्या त्या अमित विस्ताराने माझी प्रज्ञा चाळवली गेली. जीवनाच्या यक्षप्रश्नाभोवतीं विचारांचे परमाणु उठवूं लागली.

अपार वत्सलतेने मला कुरवाळीत ती आकृति म्हणाली :

विचिकित्सेचा मोह सांडून प्रज्ञा समर्पित झाली म्हणजे मातीला सुगंध येतो आणि श्रद्धा जीवनाचा विलास सजविते !

कारण जीवन म्हणजे श्रद्धेच्या दिव्य करांनी विणलेल्या आनंदाच्या महिरापी !

आणि सौंदर्य म्हणजे पृथगात्मतेने तळपणारी सर्वेशाची स्मृति.

पण अविचाराने सौंदर्याला जीवनाची भोगप्रवण अगर नीतिरूप प्रतिक्रिया मानूं नका.

जीवन विवस्त्र स्त्रीच्या रुचिर गात्रांचें गुणगान करीत नाही अथवा नग्नता अनिष्ट असल्याचा निर्वाळा देत नाही.

सौंदर्य, तेजाच्या दिव्योदधींतून उठणारी ती ऊर्मी, स्वतःचा देहकोष भेदून जीवनाला कवटाळते, अक्षय आनंदाचीं गुपितें उच्चारते.

गवाक्षांतून उधळलेल्या पुष्पराशीगत येणाऱ्या अनुभूतींची नित्य नवी थरथर ह्या त्या जीवनाचा विलास होय.

तूं धूसर ईप्सितांना त्यांच्या आवडत्या कोलाहलांत नेऊन सोड.

आणि त्या जीवनाची अभिलाषा होऊन रहा. संज्ञा होऊन रहा.

कोटि हृदयांच्या आवेशाने प्रेम उफाळून आले म्हणजे बुद्धीने गोंजारलेलीं आवरणें तत्काळ गळून पडतील.

आणि ती मीलनोत्कंठा, जगदीशाला हाकारणारी संज्ञा, काठोकाठ भरलेल्या अमृत कलशाप्रमाणें भासूं लागेल.

श्रद्धेला अज्ञेयाची, अतएव असत्याची माता म्हणून हिणवशील तर मात्र जीवन बधीर होईल, सौंदर्य मरगळून जाईल.

श्रद्धाहीन आंधळयाला जेथें प्रकाश दिसतो तेथें सुंदरता निद्राधीन झाली असते म्हणूनच निर्जन राजवाड्यांत कलाचित्रांनी खचलेल्या अंतःपुरासारखी ती निष्प्राण नि तेजोहीन दिसते.

श्रद्धा आणि सुंदरता यांच्या एकरूप प्रवाहांनी तेजाळलेल्या प्रतीकरूप विश्वाशीं जें नित्य तन्मय होतें तेंच खरें जीवन होय !

—क्रांतदर्शी बुधे

ग्रंथ समीक्षा

(१) ज्ञानेश्वर चरित्र आणि ज्ञानेश्वरी चर्चा

१. सुमारें दोन वर्षांपूर्वी, सर्व महाराष्ट्रभर निरनिराळ्या शहरांत 'श्रीज्ञानेश्वरीचा' अकरावा हीरकोत्सव मोठ्या उत्साहाने साजरा करण्यांत आला, त्या प्रसंगी त्या पर्वणीच्या निमित्ताने प्रा० वाळिंबे यांनी, '१११ दलाचें हें वाग्पुष्प त्या वागीशाच्या चरणीं अर्पण करावें ' या बुद्धीने प्रस्तुत प्रबंध लिहून प्रकाशित केला. लेखकाचें विशेष भाग्य म्हणजे ज्ञानेश्वरीचे निष्ठावंत विद्वान् अभ्यासक प्राचार्य-दांडेकर यांच्या मार्मिक प्रस्तावनेचा आशीर्वाद होय.

२. मूळ पुस्तकाचा भाग २३८ पानें असून, त्याचे १११ परिच्छेद श्री ज्ञानेश्वर-चरित्राला वाहिलेले असून, उरलेल्या ५५ परिच्छेदांत ज्ञानेश्वरी संबंधीच्या विविध प्रश्नांची चर्चा स्थूलदृष्टीने केली आहे. प्रत्येक परिच्छेद म्हणजेच लहानसें प्रकरण असून, त्याला यथार्थ शीर्षक देण्याचा यशस्वी प्रयत्न लेखकाने केला असल्याने, परिच्छेदांची एक सलग मालिकाच गुंफल्या सारखी झाली आहे. उदाहरणार्थ, आईची साद, चरित्र आणि चमत्कार, बालपणींचि सर्वज्ञता, तीर्थरूप ज्ञानेश्वर की चिरंजीव ज्ञानेश्वर, कोऱ्या पत्राचें उत्तर, कचें मडकें कोणी थापटले, भाष्यकारांतें वाट पुसतु ' इत्यादि मथळे, अन्वर्थक व आकर्षक असून परिच्छेदांत येणारी माहिती सुचविणारे असल्याने वाचकाचें मन तिकडे सहज ओढले जातें. कोणत्याहि प्रश्नाची चर्चा करतांना त्या त्या बाजूची अद्ययावत् थोडक्यांत माहिती देऊन, चिकित्सक व अनाग्रही पद्धतीने विचार करून, आपलें स्वतःचें तद्विषयक मत निश्चितपणें देण्याचा प्रयत्न लेखकाने केला आहे. ही मांडणी बऱ्याच बाबतींत समतोल व निःपक्षपाती झाली आहे असें म्हटलें तरी चालेल. पुस्तकाची भाषा चर्चेला साजेलशी आहे.

३. ज्ञानेश्वर एक की दोन, प्रायश्चित खरें कीं खोटें, ज्ञानेश्वरीच्या अधिकृत प्रती, नामदेव ज्ञानदेव व तीर्थावळी, नाथपंथ, लिंगायत; महानुभाव व वारकरी पंथ पाठचिकित्सा, वामनपंडीत व ज्ञानेश्वर, ज्ञानेश्वरीतील अलंकार, ज्ञानेश्वरीची इतर भाषांत झालेलीं भाषांतरें, चमत्कार व सिद्धि, ज्ञानेश्वरींतील तत्त्वज्ञान व काव्य, अशा विविध प्रश्नांची चर्चा या प्रबंधांत स्थूलमानाने केलेली आढळून येईल. ज्ञानेश्वरीचा विशेष परिचय नसणाऱ्या जिज्ञासु वाचकांना या स्थूल चर्चेचा कितपत उपयोग होईल याबद्दल शंका वाटते. अमका पक्ष चुकला व अमक्याचे म्हणणे योग्य, हें या माहितीवरून वाचकांना ठरविणे शक्य नाहीं. कांही कांही प्रश्नांच्या बाबतींत, विशेषतः आज लोकमताचा कल ज्या बाजूला नाही त्या पक्षाच्या बाबतींत, ती ती बाजू यथार्थपणें मांडलेली दिसत नाही. ज्ञानेश्वरीविषयक कित्येक प्रश्न अजून अनिर्णित आहेत. जसें जसें संशोधन अधिक होईल, तसा तसा त्या प्रश्नांवर अधिक प्रकाश

पडेल. जिज्ञासु वाचकांना या प्रबंधाने एका बाबतींत मात्र उपकृत केलें आहे असें म्हटलें तरी चालेल. ज्ञानेश्वरीसंबंधी विविध प्रश्न कोणते, व त्या त्या प्रश्नाविषयीं कोण कोण विद्वानांनी कोणत्या ठिकाणीं काय म्हटलें आहे यांचें एक नांवनिशीवार टांचण या प्रबंधांत एके ठिकाणीं आढळण्याची उत्तम सोय, वाचकांची झाली आहे. लेखकाच्या स्वतःच्या निश्चित मताचा वाचकांना उपयोग होईल अथवा न होईल, पण निदान पक्षीं ज्ञानेश्वरीविषयक महत्त्वाचे विविध विषय कोणते, त्या विषयीं कोणी कोणी कोठें विवेचन केलें आहे, त्या विवेचनाचें थोडक्यांत स्वरूप काय, या संबंधीची भरपूर माहिती या प्रबंधांत सांपडून, ज्ञानेश्वरी विषयक संशोधन म्हणजे काय याची सामान्य कल्पना जिज्ञासु वाचकांना निःसंशय मिळेल.

४ पूर्वी 'ज्ञानेश्वरीदर्शन' या ग्रंथाचे दोन्ही भाग जेव्हा उपलब्ध होते, त्यावेळीं वाचकांची वरील प्रकारची भूक शांत होण्याची, थोडी तरी सोय होती. निरनिराळ्या प्रश्नांची चर्चा, जरा विस्तृत अशी, त्यांत केली असल्यामुळे चर्चेचे स्वरूप तरी वाचकांना यथातथ्य कळण्याचा मार्ग होता. अलीकडे तो ग्रंथ फारच दुर्मिळ झाल्याने, प्रस्तुत निबंधामुळे त्या त्या प्रश्नांचा अल्पसा परिचय होऊन, त्या त्या विद्वानांचीं तीं तीं मतें कोणत्या ठिकाणीं पाहावयास सापडतील, या संबंधीचा मार्ग खुला झाला आहे.

५ निरनिराळ्या विद्यापीठांत उच्चपदवीसाठी 'मराठी' विषयाचा प्रवेश झाल्यामुळे, इतर भाषा शिकतांना, ज्या ज्या कसोट्या व ज्या ज्या पद्धति लावण्यांत येतात, त्या त्या परीने मराठी ग्रंथाच्या तुलनात्मक व चिकित्सक अभ्यास होऊं लागल्याने, साहजिकच प्रस्तुत प्रकारचे निबंध व ग्रंथ दरवर्षी विद्यार्थ्यांच्या अभ्यासाच्या दृष्टीने तयार होऊन प्रकाशित होत आहेत. अशा प्रकारें ज्ञानेश्वरी ग्रंथासारख्या मराठी भाषेंतील पहिल्या दर्जाच्या ग्रंथा विषयी विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन होऊन, मराठीच्या डोळस व चिकित्सक अभ्यासाचीं साधनें अधिकाधिक उपलब्ध झालीं, तर मराठी भाषेच्या प्रगतीचें पाऊल निःसंशय पुढे पडेल यांत संशय नाही.

६ छपाई घाईघाईने झाल्यानें, प्रस्तुत निबंधांत मुद्रणदोष पानोपानीं आढळून येतात; तथापि परिश्रमपूर्वक माहिती गोळा करून, त्याचें यथार्थ टांचण करून, ते ते चर्चेचे विषय, थोडक्यांत जिज्ञासु वाचकांना परिचित करून दिलें म्हणून लेखकांस धन्यवाद द्यावयास पाहिजेत. वरील प्रतिपाद्य विषयांपैकी आपल्या आवडीचे कांही प्रश्न घेऊन, त्याच्या विविध बाजू यथार्थपणें सविस्तर मांडून, आपलें निरपेक्ष, निर्भीड व निश्चित मत कोणतें तें सकारण दाखवून, प्राध्यापक वाळिंबे, आपल्या एखाद्या ग्रंथाच्या द्वारें ज्ञानेश्वरीवाचकांना उपकृत करतील अशी आशा केल्यास ती संभवनीयच ठरेल.

ह. ना. नेने

[लेखक—प्रा. शं. गो. वाळिंबे, एम् ए., होळकर कॉलेज, इंदूर; किं. रु. ३॥]

(२) सुंदर पत्रें व प्रेम चतुर्थी

हीं पुस्तकें मुंबईच्या साधना प्रकाशनाकडून अभिप्रायार्थ आलीं आहेत. संस्कारक्षम वयाच्या मुलामुलींच्या हातांत देण्यालायक अशीं हीं दोन्ही पुस्तकें असून त्यांच्या वाचनाने मनावर उत्तम संस्कार होतील अशी खात्री वाटते.

साधारणतः १२ ते १८ हें वय वाचन मार्गे संस्कार घडविण्यास उत्तम समजावें. या वयांत मुलांना बालवयांत लागलेली अद्भुततेची आवड ही थोडी कमी होऊन भावनात्मक वाङ्मयाकडे त्यांचा कल झुकतो. तज्ज्ञांच्या मतें या काळांत होणारे संस्कार पुष्कळदा जन्मभर तसेच राहतात. ते सहसा मिटून जात नाहीत. माझ्या मतें कथात्मक वाङ्मयाला देखील वयोमर्यादा आहे. स्थूलमानानें वा. म. जोशी यांच्या कादंबऱ्यांचें वय चाळीस वर्षांचें, माडखोलकरांच्या कादंबऱ्यांचें तीस वर्षांचें, फडक्यांच्या कादंबऱ्यांचें पंचवीस वर्षांचें, खांडेकरांच्या कादंबऱ्यांचें वीस वर्षांचें व साने गुरुजींच्या कादंबऱ्यांचें विसाहून कमी वर्षांचें आहे. 'स्थूलमानाने' हा शब्द मुद्दाम वापरला. आणि मुद्दा वयोमर्यादा निश्चित करण्याचा नसून संस्कार-क्षमतेच्या दृष्टीने त्या त्या लोकप्रिय कथाकारांचें स्थान दिग्दर्शित करण्याचा आहे. विचार परिपक्व मनाला साने गुरुजी आवाहन कदाचित् करूं शकणार नाहीत पण विशीच्या आसपास त्यांना फार महत्वाचें स्थान आहे. या वयाचीं सुमारें दीडशें मुलें (मुली त्यांतच) एकत्र बसून त्यांच्या 'आस्तिक' कादंबरीची रसग्रहणपूर्वक नमुनेदार छाननी करूं शकतात, त्यांत कादंबरींतील अगर चर्चेतील एकाहि अनुचित शब्दाने रंगाचा बेरंग होऊं शकत नाही. प्रत्येक विधानाकडे ते आत्मीयतेने पाहूं शकतात. 'बळी' ही वेगळ्या तऱ्हेची [पण वयोमान वा. म. जोश्यांचें] कादंबरी वाचलेली असलेल्यांनाहि आस्तिक ही अधिक रुचते, जचते व पचतें! ही सांगोवांगी गोष्ट नाही. अभ्यासमंडळांत प्रत्यक्ष पाहिलेली—अनुभव घेतलेली गोष्ट आहे.

कला ही कलेकरिता असेलहि कदाचित्. पण संस्कारक्षम मुलें हीं राष्ट्राच्या आशेचीं उमलणारीं फुलें आहेत. सवंग अशा प्रणयकथा न वाचूनहि युवायुवतींच्या लाडीगोडी निसर्ग त्यांना योग्य वेळीं शिकवीलच. काव्यकथादिकांतून त्याचे पाठ देणें अनावश्यक आहे. पण स्वदेश, स्वभाषा, स्वजन यांच्या बद्दल आपुलकी वाटण्याला त्यांना-आवडीपेक्षा निवडीची अधिक जरूर आहे. आवडेल तें वाचीत सुटलें की आवड हीच निवड बनते, ज्ञान खुंटते व जीवन खुरटतें. पुष्कळदा कलेंतून विशेषतः कथेच्या कलेंतून लेखकाच्या जखमा वाहतांना दिसतात, निदान ओरखडे, गुदगुदल्या किंवा मऊ शब्दांच्या गाद्यागिरद्या पसरलेल्या दिसतात, लेखकाच्या व्यक्तित्वाचा तो आविष्कार असतो! समानधर्मा मिळाल्यास त्याचें चीजहि होते. त्याच्या जखमा पाहून आम्ही आमच्या विसरतों. पण ही भूल पाडणारी करामत विशीपूर्वीच विसावा देऊं लागली तर आम्ही ध्येयवादी कसें बनूं? हरिभाऊ आपटे—वा. म. जोशी या कादंबरीकारांनी किंवा केशवसुत—बी या कवींनी आमच्या जीवनासमोर ठेवलेले निरागस आदर्श आम्ही कसे मिळवूं!

हे उच्च आदर्श प्राप्त करण्याचा मार्ग 'सुंदर पत्रें' आणि 'प्रेमचतुर्थी' खात्रीने दाखवितील. 'प्रिय सुधाताई'ला लिहिलेले प्रत्येक पत्र व त्यांतील प्रत्येक गोष्ट किंबहुना प्रत्येक वाक्य हे साहित्यदृष्ट्या, तसेच मुलांवर सहानुभूति, प्रेम मानवता या उच्च गुणांचा ठसा उमटविण्याच्या दृष्टीनेहि 'उचित' आहे. त्यांतील

सृष्टिवर्णनांतील गोडवा, कुटुंबीय, शेजारी व नवपरिचित या सर्वांविषयी दाखविलेला मायेचा ओलावा, व प्रत्येक कल्पनेच्या मुळाशी असलेला भारतीय संस्कृतीचा (चांगल्या अर्थाने) पाया हा केवळ साने गुरुजींच्या शैलींतच आढळेल; इतरत्र क्वचित्. किंबहुना या पुस्तकाला लावण्याची कसोटी ही कलेची नव्हेच, कला आणि संस्कारक्षमता येथे एकजीव झाल्या आहेत. आमच्या आशेच्या फुलांना देण्यास योग्य असें हें जीवन आहे. त्यांत सुविचार, सद्भावना व सुसंस्कार यांचा सुगंध दरवळत आहे.

सुंदर पत्रांतील या सुगंधाचीच प्रेमचतुर्थी ही एक कथामंजूषा आहे. मराठींत जसे सानेगुरुजी तसे हिंदींत मुनशी प्रेमचंद हे एक प्रेमळ व सहृदय गोष्टीवेल्हाळ आहेत. या पुस्तकाला सानेगुरुजींनी जोडलेल्या दोन शब्दांत "या चारी गोष्टी कलात्मक असूनहि मानवतेचा स्पर्श करणाऱ्या आहेत, असें म्हटलें आहे. लघुकथेचें आयोजन हृदयस्पर्शी पद्धतीने करावें प्रेमचंदांनीच. शिवाय त्यांच्या लेखनांत कुठेहि विद्वत्तेचें प्रदर्शन, अनाठायी पाल्हाळ किंवा कृत्रिम मनोविश्लेषण नाही. साने गुरुजी काय किंवा प्रेमचंद काय प्रस्तुताशीं समरसता व कथनाची सहजता या गुणांनीच कोवळ्या वाचकांच्या मनाची पकड घेतात. उत्तान रसाविर्भाव, विरोधाभासाचे खेळ, अतृप्त वासनांचें प्रदर्शन, विशिष्ट मतप्रचाराचा आवेश, बेजबाबदार मूल्यांचा बाजार व सुखलोलुप स्वप्नाळू मनोवृत्ति या ठरीव करामतींखेरीज मानवी मनाचे मनोहर पडदे हळूवारपणें उकलून दाखवून बालबुद्धि ही उचित मार्गाकडे वळविण्याच्या 'साधने'स उपयुक्त अशी हीं दोन्ही पुस्तकें आपल्या व आपल्या मुलांच्या वाचनांत निर्धास्तपणें समाविष्ट करावी.*

मा. गो. देशमुख

० (३) वारणेच्या खोऱ्यांत

शाहीर अण्णाभाऊ साठे ह्यांची ही पहिली कादंबरी. कादंबरीला एक लहानसें अद्भुत रोमांचकारी कथानक असून त्यास वारणेच्या खोऱ्याची पार्श्वभूमि आहे. शाहीर अण्णाभाऊ साठे यांचा बहुजनसमाजाचे एक लेखक, साम्यवादी कलापथकाचे एक नेते ह्या नात्याने मोठा लौकिक आहे. त्यांच्या कलापथकांतील कार्यक्रमांत त्यांच्या 'अकलेची गोष्ट' आदिकरून कथाचा लोकसमुदायावर विलक्षण परिणाम होतो. संवादांतील खटके निरक्षरांपासून साक्षरांपर्यंत सर्वांना आपआपल्या मगदुराप्रमाणे उत्तेजित करतात. ह्या कादंबरींतल्या संवादांतसुद्धा हा खटकेबाजपणा आहे. अर्थात प्रत्यक्ष समोर घडत असलेल्या प्रसंगांतून प्रेक्षकांवर दृश्य आणि श्राव्य ह्या दोहोंचा प्रभाव पडत असल्यामुळें प्रसंगाची परिणामकारकता निःसंशय वाढते. कादंबरीच्या वाचकाला स्वतःच्या 'मानसचित्रांवरच' अवलंबून रहावे लागत असल्यामुळें कादंबरीकाराला वाचकाच्या मदतीस येण्यासाठी प्रयत्नांची शिकस्त करावी लागते.

*१. (भाग पहिला) साने गुरुजी (नोवें. १९५० पृ. ११०कि. १॥ रु.)
२. (प्रेमचंदांच्या चार गोष्टी) अनुवादक यदुनाथ थत्ते मे १९५० (पृ. ७१ कि. १० आणे)

शाहीर अण्णाभाऊंचा हा कादंबरीलेखनाचा प्रथम प्रयोग असल्यामुळें आपण त्यांच्या उपक्रमाला सुयश चिंतिले पाहिजे. त्यांची भाषा देश्य शब्दरचनेंत विशेष रमत असली तरी ती पात्रांचे स्वभाव अल्पभाषेंत व्यक्त करूं शकते. ह्या कादंबरी-तील प्रत्येक व्यक्तीला स्वतःची भाषा आहे. हिंदुराव व त्यांचे क्रांतिकारी सवंगडी नागोजी व त्यांचे गुंड गडी, हंबीर, कृष्णाजी, मंगला इत्यादि सर्व मंडळी स्वतःच्या वैशिष्ट्यपूर्ण शैलीने बोलून आपआपले व्यक्तिविशेष प्रकट करीत असतात. कथानकांत वारणेच्या खोऱ्यांचा मात्र तसा फार थोडा वांटा आहे. आणि कथानक '४२' च्या क्रांतिकारी 'पत्री' वातावरणांतील असून देखील शेवटी क्रांतीला विशेष स्थान न मिळता त्यांत प्रेमविषयक व्यक्तिगत हेव्यादाव्यांचेंच प्रतिबिंब अधिक प्रमाणांत आढळतें. आणि त्यामुळें साम्यवादी आर्थिक 'कनक प्रश्नापेक्षां' कांताप्रश्न अधिक मोलाचा होऊन बसतो अतिरंजित 'Romantic' वातावरणांतून मराठी कादंबरी बाहेर पडत आहे असे म्हणतात. पण जुन्या परंपरेची देण अशी सहजासहजी सुटत नाही, हेंच खरें. पण अण्णाभाऊंसारख्या सव्यसाची लेखकाने तरी त्या परंपरेचा नाद सोडला पाहिजे. आणि 'अकलेच्या गोष्टी' सारख्या कथा आम्हांला ऐकविल्या पाहिजेत.*

मा. नी. गलगलीकर

---

* लेखक—अण्णा भाऊ साठे. प्रकाशक—लोकसाहित्य
८७ शिवाजी पार्क मुंबई २८

टिपणें

नाटकांवरील कर उठवा

भारतांतील निरनिराळ्या प्रदेशांत जो करमणूक कर सध्या अमलांत आहे, त्यांतून नाटकें आणि नाट्यप्रयोग हीं वगळलीं जावींत, अशा प्रकारचा विवेक निरनिराळ्या प्रदेशांतील मंत्र्यांच्या मनांत उदय पावूं लागला आहे, हें खरोखरीच रंगभूमीचें सुदैव होय. ता. १७ सप्टेंबर १९५१ रोजीं मुंबई विधानसभेत विचारलेल्या एका प्रश्नाला उत्तर देताना मुंबईचे गृहमंत्री ना. मुरारजी देसाई यांनी करमणुकीच्या करासंबंधीं जी आकडेवार माहिती सांगितली ती, या दृष्टीनें, फार बोधप्रद आहे. त्यांनी अशी स्वच्छ कबुली दिली की, "गेल्या पंधरा वर्षांत बोलपटामुळे रंगभूमि खालावली आहे, व ही परिस्थिति लक्षांत घेऊन नाट्य कलेला उत्तेजन देण्यासाठी नाट्यप्रयोग करमणुकीच्या करांतून मुक्त करण्यासंबंधीं सरकारचा विचार चालू आहे. या बाबतींत सरकारकडे अद्याप कांहीं सूचना आलेल्या नाहीत. तथापि जर कोणी सूचना केल्या, तर सरकार त्या अवश्य ध्यानात घेईल. १९५० च्या मार्चमध्यें संपलेल्या गेल्या तीन वर्षांच्या काळांत बोलपटांपासून सरकारला करमणुकीच्या कराचे उत्पन्न ३॥ कोट रुपये झाले, तर नाट्य प्रयोगापासून फार तर ८ लाख रुपये उत्पन्न झाले असेल ! " ना. मुरारजी देसाई यांच्या या उत्तरांत जी एक खोच आहे, ती साहित्यसंस्था आणि नाट्यसंस्था या दोहोंच्याहि चालकांनी लक्षांत घ्यावयाला हवी. ही खोच अशी की, करमणुकीच्या करांतून नाट्यकलेला मुक्त करण्यासंबंधीं सरकारकडे कोणींच कांही सूचना अद्याप पाठविलेल्या नाहींत ! नाट्यमहोत्सवाचे उरूस सालोसाल भरविणाऱ्या साहित्य संस्थांना आणि नाट्यसंस्थांना देसाई यांनी हें एक प्रकारें शेलापागोटेंच दिले आहे म्हणावयाचें !

मद्रास सरकारचा स्तुत्य उपक्रम

करमणुकीच्या करांतून नाट्यकलेला मुक्त करावे कीं नाहीं याचा नुसता विचारच ना. मुरारजी देसाई हे सध्या करीत बसलेले आहेत. पण मद्रास सरकारचे अर्थमंत्री ना. गोपाल रेड्डी यांनी ता. ६ ऑक्टोबर १९५१ रोजीं सरकारांत नोंदलेल्या आणि सरकारला मान्य असलेल्या 'सभां' नी जर नृत्य-संगीताचे कार्यक्रम केले, तर त्यांना करमणुकीच्या कराची माफी देण्यांत यावी, अशी घोषणा केली आहे ना. रेड्डी यांनी 'सभा' हा शब्द 'संस्था' या अर्थानें योजिलेला असून, सार्वजनिक हिताचे कार्य करणाऱ्या सर्व संस्थांचा बोध त्या शब्दाने होतो, असा खुलासाहि या या घोषणेबरोबर करण्यांत आलेला आहे. मद्रास सरकारने जी ही सवलत 'सभां-' कडून होणाऱ्या नृत्य संगीताच्या कार्यक्रमांना दिली आहे तींत लवकरच नाट्य प्रयोगांचाही समावेश होईल, असे त्यांच्या घोषणेच्या स्वरूपावरून वाटते. खरोखरी अडचण ही आहे कीं स्वतः सरकार हे कितीहि सुजाण किंवा उदार व्हावयाला तयार असलें, तरी आपण मात्र आपल्या गरजा सरकारापुढें पद्धतशीर रीतीनें मांडावयाला अद्याप शिकलेलों नाहीं. ना. देसाई आणि ना. रेड्डी या दोन बड्या प्रदेशांच्या मंत्र्यांनी करमणुकीच्या कराबाबत या ज्या घोषणा केल्या आहेत त्या लक्षांत घेऊन

महाराष्ट्रांतील साहित्यसंस्था आणि नाट्यसंस्था यांनी करमणुकीच्या करांतून नाट्यकला व त्याबरोबरच आपल्या मदतीसाठीं होणारे सर्व प्रकारचे करमणुकीचे कार्यक्रम मुक्त होण्यासाठी कसोशीचे प्रयत्न केले पाहिजेत.

आदर्श सहृदयता

सौराष्ट्राचे मुख्यमंत्री ना. धेबर यांनी विख्यात गुजराती कादंबरीकार श्री. पन्नालाल पटेल यांना सरकारी खर्चाने औषधोपचार करण्याची जी व्यवस्था केली आहे, तिच्याबद्दल त्यांना केवळ धन्यवाद देऊनच भागणार नाही. तर त्या बरोबरच इतर प्रदेशांच्या सरकारांनी त्यांच्या सहृदयतेचा हा आदर्श डोळ्यांपुढे सतत ठेवावा, असेंहि सांगणें अवश्य वाटतें. श्री. पन्नालाल पटेल हे गुजरातचे 'लाडीले' तरुण कादंबरीकार आहेत. व खेडूत जीवनावरील आपल्या हृदयंगम कादंबऱ्यांनी त्यांनी गुजरातमध्ये विशेष प्रकारची लोकप्रियता संपादन केली आहे. चाळिशीच्या उंबरठ्यावर असलेल्या अशा या तरुण प्रभावशाली कादंबरीकारावर क्षयरोगाची झडप पडली. श्री. पटेल हे लोकप्रिय असले, तरी संपन्न अर्थातच नाहीत. म्हणून सौराष्ट्राचे मुख्य मंत्री ना. धेबर यांनी, त्यांना सरकारी खर्चानें उत्कृष्ट हवाशीर आरोग्यधामात ठेवून, त्यांच्या परिचर्येची सर्व जबाबदारी पत्करली आहे. खरोखरी साहित्यिकाच्या लेखनगुणांचे राष्ट्रीय महत्व आणि उपयुक्तता लक्षांत घेऊन आमच्या सरकारने त्याच्या आरोग्याची आणि योगक्षेमाची काळजी वाहिल्याचे हें बहुधा पहिलेंच उदाहरण असावें! मध्यप्रदेशाचे राज्यपाल ना. मंगलदास पक्वासा यांनी ता. ११ आक्टोबर १९५१ रोजी नागपूरच्या राज्यभवनांत नागपूर नभोवाणीच्या कविसंमेलनासाठी आलेल्या हिंदी आणि मराठी कवींचा सत्कार करून रसिकता आणि सौहार्द यांचें जें मनोज्ञ उदाहरण घालून दिले आहे तेंहि या दृष्टीनें उल्लेखनीय वाटतें. त्याचे औचित्य आणि मर्म स्वतंत्र भारतांतील राज्यपाल आणि मंत्री हे लक्षांत घेतील, अशी आशा आहे. भारतीय लोकशाहीच्या या उषःकालांत लोकभाषा आपल्या लेखन–लालित्याने समृद्ध आणि मंडित करणाऱ्या साहित्यिकांची बूज जर झाली नाही, तर लोकवाङ्मयाचा विकास होणार कसा?

'भारती'

राष्ट्रभाषाप्रचार समितीच्या प्रमाणपत्र वितरणाचा समारंभ ता. ७ आक्टोबर १९५१ रोजीं राज्यपाल ना. मंगलदास पक्वासा यांच्या हस्तें नागपूर येथे झाला. त्या प्रसंगी ना. राज्यपाल यांनी हिंदीभाषेसंबंधीं जी एक सूचना केली, ती अत्यंत स्वीकारार्ह आहे. त्यांनी अशी सूचना केली कीं, राष्ट्रभाषा हिंदी हिला यापुढें 'हिंदी' या नांवाने न संबोधितां 'भारती' हें नवीन व्यापक राष्ट्रीय नांव देण्यांत यावें. 'भारती' या शब्दाचा संस्कृत भाषेंतील अर्थ "ब्राम्ही तु भारती भाषा गीर्वाग्वाणी सरस्वती" या अमर वचनानुसार, 'भाषा' असा होतो. अखिल भारताची भाषा ती "भारती" अशा अर्थाने हें नवें नांव हिंदीसाठी रूढ होण्यात निःसंशय औचित्य आहे; व त्यामुळें तिचें देशव्यापित्वहि उत्कृष्ट रीतीने सूचित होईल. हिंदी साहित्य संमेलन आणि राष्ट्रभाषा प्रचार समिती या दोन्ही संस्थांनी राज्यपालांच्या या सूचनेचा विचार अगत्यानें करावयास हवा.

१९५१
ऑक्टोबर

एक नवा बहुमोल ग्रंथ

हैद्राबाद राज्यांतील उस्मानिया विद्यापीठाचे मराठीचे प्राध्यापक चिंतामण नळिकंठ जोशी यांचा "श्रीधरः चरित्र आणि काव्यविवेचन" हा माहितीने तुडुंब भरलेला सुमारें ८०० पानांचा ग्रंथ त्यांचे सुवि समानशील चिरंजीव श्री. मेघश्याम चिंतामण जोशी आणि श्री. विनायक चिंतामण जोशी या उभयतांनी, त्यांच्या मृत्यूनंतर, मोठ्या साक्षेपाने प्रसिद्ध केला आहे. साक्षपाने म्हणण्याचे कारण असे कीं, कै. काकासाहेब जोशी यांना हा ग्रंथ लिहीत असतानाच कॅन्सरचा असाध्य रोग होऊन, ते तो पूर्ण न करताच इहलोक सोडून गेले असतां त्यांचे चिरंजीव श्री. विनायकराव जोशी यांनी तो संशोधन पूर्वक परिश्रमाने सर्वांगपूर्ण केला. पित्याचा अपूर्ण ग्रंथ बेमालूम पूर्णतेला नेण्याचे संस्कृत साहित्यांतील प्रसिद्ध उदाहरण कादंबरीकार बाणभट्टाचा पुत्र भूषणभट्ट याचें आणि मराठी साहित्यांतील प्रसिद्ध उदाहरण कै. कृष्णशास्त्री चिपळूकर यांचे पुत्र कै. विष्णु शास्त्री चिपळूणकर यांचे आहे. या घटनेबद्दल जो आनंद म. म. प्रा. द. वा. पोतदार यांनी या ग्रंथाला लिहिलेल्या विस्तृत आणि कांही बाबतींत मूलगामी पुरस्कारांत व्यक्त केला आहे तो अनेकांना यथार्थ वाटेल. श्रीधर हा वामन आणि मोरोपंत या दोघांपेक्षाहि एकापरीने महाराष्ट्रांत सर्वत्र लोकप्रिय असलेला कवि व त्याचें कोणतेना कोणते आख्यान रोज वाचलें जात नाही, असें भाविक बाळबोध घर महाराष्ट्रात क्वचितच आढळेल. अशा आबाल सुबोध राष्ट्रीय कविश्रेष्ठाच्या चरित्राचा आणि वाङ्मयाचा सर्वांगीण परिचय या उत्कृष्ट ग्रंथाच्या वाचनाने अखिल मराठी जनतेला होईल. कै. ह. भ. पांगारकर यांच्या मोरोपंत, ज्ञानेश्वर आणि एकनाथ या कवींच्या चरित्रग्रंथांप्रमाणे प्रा. काकासाहेब जोशी यांचा हा ग्रंथ रसाळ नाहीं ही गोष्ट खरी, पण त्यांतील हरएक विधान आणि विवेचन तारतम्याने तोलून केलेले असल्यामुळें त्याला प्रामाण्य अधिक प्राप्त झालें आहे, असे म्हटल्यास अतिशयोक्ती होणार नाहीं. प्रा. पोतदार यांनी आपल्या पुरस्कारांत ज्या सूचना चरित्र-साहित्याच्या संशोधनासंबंधी केल्या आहेत, त्याहि अत्यंत विचारार्ह आहेत

ग. त्र्यं. माडखोलकर

संघवार्ता

साधारण सभा

विदर्भसाहित्य संघाची साधारण सभा ता. २८ एप्रिल १९५१ रोजी दुपारी २ वाजतां आकोला येथे नॉर्मस्कूलच्या दिवाणखान्यांत श्री. ग. त्र्यं. माडखोलकर यांच्या अध्यक्षतेखाली भरली. प्रथम चांदा येथे भरलेल्या साधारण सभेचें प्रतिवृत्त मंजूर झाले. त्या नंतर नागपूर येथें नॅशनल कॉलेजच्या दिवाणखाण्यांत २६ नोव्हेंबर १९५० रोजीं भरलेल्या सभेचें प्रतिवृत्त नागपूरचे चिटणीसाकडून वाचून दाखविण्यांत आलें. त्यावर प्रा. बनहट्टी, श्री. नारायणराव तांत्री, श्री. त्र्यं. गो. देशमुख वगैरे सभासदांनी अनेक आक्षेप घेतल्यावर त्या सभेचें प्रतिवृत्त अधिक व्यवस्थित लिहिण्यांत यावें व त्यांत संमत झालेल्या ठरावांचा मसुदा अक्षरशः नमूद करण्यांत यावा असें ठरलें. साधारण सभेसमोर मांडले जायचे हिशेब, विदर्भसाहित्य मंदिराच्या निकडीच्या कामामुळे तयार करण्याला पुरेसा वेळ मिळाला नाही ह्याबद्दल चिटणीसांकडून दिलगिरी प्रदर्शित करण्यांत आली. संघाच्या सभांचीं प्रतिवृत्तें, हिशेब वगैरे अधिक टापटिपीने ठेवण्याची आवश्यकता व इष्टता अनेक सभसदांनी प्रतिपादन केली. तशी ती यापुढे ठेवण्यांत येईल या विषयी अध्यक्षांनी आश्वासन दिलें.

सभेसमोर दुरुस्तीचें महत्वाचें काम होतें. घटना दुरुस्तीचा, घटना दुरुस्ती समितीने तयार केलेला खर्डा युगवाणी (जानेवारी १९५१) च्या अंकांत छापलेला होताच. त्याची कलमवार चर्चा करण्याऐवजी त्यांतील मूलभूत तत्त्वें सभेसमोर संमतीसाठीं मांडणें अधिक सोईचें होईल असें सांगून तसें करण्याला सभेची संमति प्रा. कुसुमावती देशपांडे यांनी मागितली. ती मिळाल्यावर त्यांनीच घटना दुरुस्तींतील मूलभूत तत्त्वांची कलमें सभेसमोर मांडलीं. हीं कलमें प्रामुख्याने मतदानाचा अधिकार आणि निवडणुकी किती वर्षांनी व्हाव्या अशीं दोन होतीं. या दोन्ही कलमावर खडाजंगीची चर्चा झाली. संघाचा पूर्ण दोन वर्षे सभासद असलेल्यालाच निवडणुकींत मत देण्याचा अधिकार असावा ही मूल सूचना होती. श्री. फडके, श्री. बनहट्टी, श्री. के. दे. देशपांडे यांनीं आपापल्या प्रतिसूचना मांडल्या. शेवटी या बाबतींत तडजोडीच्या भावनेने पुढील ठराव करण्यांत आला.

"निवडणुकींत मत देण्याचा अधिकार दरवर्षी एप्रिल अखेर पर्यंत जे बिनबाकीदार सभासद नोंदलेले असतील त्यांना प्राप्त होईल. परंतु निवडणुकींत उमेदवार म्हणून उभे राहण्याचा अधिकार ज्याला सभासद होऊन संघाच्या नियमाप्रमाणें एक वर्ष होऊन गेलें आहे अशा सभासदांनाच प्राप्त होईल. (या कलमाची अंमल बजावणी करतांना मतदानाचा हक्क प्राप्त होण्याची चालू वर्षा साठीच मुदत जून अखेर समजली जाईल). सूचक श्री. पु. य. देशपांडे. अनुमोदक श्री. श्री. ना. बनहट्टी. ठराव बहुमताने संमत झाला. विरुद्ध मतें फक्त दोन होती.

संघाच्या कार्यकारी मंडळाच्या निवडणुकी दर तीन वर्षांनी व्हाव्या ही घटना-दुरुस्ती समितीची सूचना चर्चेसाठी आली. तडजोड करणाऱ्या सभासदांनी निवडणूक दोन वर्षांनी व्हावी असें सुचविलें. तिला श्री. आ. रा. देशपांडे यांनीं विरोध केला. डॉ. कोलते यांनीहि घटना दुरुस्तीची बाजू पुढे मांडली. अखेरीस कार्यकारी मंडळाच्या निवडणुकी दर दोन वर्षांनी व्हाव्या असें बहुमताने ठरलें. (विरुद्ध मतें दोन).

साधारण सभेने मान्य केलेल्या या ठरावांच्या अनुषंगाने वि. सा. संघाच्या घटनेचें पुनर्लेखन करण्यांत यावें असें ठरलें. त्यासाठी प्रा. कुसुमावती देशपांडे (आमंत्रक), प्रा. बनहट्टी, श्री. आ. रा. देशपांडे व श्री. ढवळे ह्यांची उपसमिती नेमण्यात येऊन तिला अधिक सभासद स्वीकृत करण्याचा अधिकार देण्यांत आला. त्यानंतर सन १९४९ चें हिशेबासंबंधाने पुढील ठराव विनाविरोध संमत करण्यांत आला.

"कै. दिवाणजी यांच्या आकस्मिक निधनाने निर्माण झालेल्या परिस्थितीमुळे सन १९४९ चे हिशेब पूर्ण करण्यास बराच अवधि लागला व तें काम गेल्यांच महिन्यांत पूर्ण झालें. यामुळे ऑडिटेड हिशेब या सभेपुढे ठेवतां येत नाहीत. याबद्दल कार्यकारी मंडळ दिलगीर आहे. हिशेब तयार होतांच पुढील साधारण सभेसमोर ते ठेवण्यांत येतील."

यानंतर सभेचें काम संपलें.

कार्यकारी मंडळाचें कामकाज

वि. सा. संघाच्या कार्यकारी मंडळाची सभा रविवार ता. १६ सप्टेंबर १९५१ रोजी संघाध्यक्ष सौ. प्रो. कुसुमावती देशपांडे यांच्या अध्यक्षतेखाली संघाच्या कार्यालयांत दुपारी ३॥ वाजतां भरली. सभेला का. का. मंडळाच्या सदस्यांशिवाय प्रा. श्री. ना. बनहट्टी, प्रा. डॉ. मा. गो. देशमुख, श्री. आ. रा. देशपांडे, सौ. विमलाबाई देशपांडे व श्री. नानासाहेब जोग ही मंडळी निमंत्रणाने हजर होती.

सभेंत झालेलें कामकाज :

(१) ता. १७ जून १९५१ रोजी भरलेल्या कार्यकारी मंडळाच्या सभेच्या प्रतिवृत्ताला मान्यता.

(२) जबलपूर येथे स्थापन झालेल्या मराठी साहित्य संघाच्या संलग्नीकरणाला मान्यता.

(३) मध्यप्रदेश संशोधन मंडळाचे मुख्य कार्यवाह श्री. दे. गो. लांडगे यांनी वि. सा. संघ आणि म. सं. मंडळ यांच्यांत कोणत्याप्रकारे सहकार्य होऊ शकेल यासंबंधी जी विचारणा केली होती तिला मुख्य कार्यवाहांनी पाठविलेलें उत्तर वाचण्यांत आलें, व सं[illegible]च्या दोन प्रतिनिधींना सहकार्यासंबंधी विचार करण्यासाठी वि. सा. संघाच्या कार्यालया[illegible]मंत्रण देण्यांत यावें असें ठरलें.

(४) का. का. मंडळाच्या सभेपुढे जे विषय विचारार्थ ठेवावयाचे असतात त्यांच्या संबंधीचें थोडक्यांत सूचक टिपण कार्यक्रम पत्रिकेबरोबर शक्यतोंवर सदस्यांकडे पाठविण्यांत यावें. का. का. मंडळाच्या सदस्यांना सभेच्या वेळेपूर्वी दोन तास कार्यालयांत सभेपुढे चर्चेसाठी येणार असलेल्या विषयासंबंधीचे जरूर ते कागद पत्र दाखविण्यांत यावें.

(५) राजभाषा विधेयकासंबंधीचे श्री. ए. श्री. पटवर्धन यांचें प्रतिवृत्त सभेस सादर करण्यांत आलें.

(६) वि. सा. संघाच्या कार्यालयाचे सन १९५० चे संपूर्ण हिशेब व सन
 १९५१ सालचे जुलै अखेर पर्यंतचे हिशेब सभेस श्री. सगदेव यांनी सादर केले.

त्याबरोबरच युगवाणीचेहि याच काळातले हिशेब प्रा. वा. कृ. चोरघडे यांनी सादर केले. हे सर्व हिशेब ऑडिटसाठी पाठविण्यांत यावेत असें ठरलें.

(७) मंदिर समितीचे आमंत्रक श्री. नानासाहेब जोग यांनी आपल्या कामाचें प्रतिवृत्त वाचून दाखविलें. त्यानंतर पुढील ठराव सर्वानुमते मंजूर करण्यांत आला—

" वि. सा. संघाच्या का. का. मंडळाने ता. १७ जून १९५१ रोजी मंदिर-समितीच्या कार्यासंबंधी जो ठराव नं. १ मंजूर केला होता तो ठराव आजची ही सभा रद्द करून त्याऐवजी पुढील ठराव करीत आहे—

" मंदिर समितीच्या कार्यास मंदिर निधिव्यतिरिक्त जी ९५० रु. ची रक्कम वि. सा. संघाच्या सर्व सामान्य निधीतून खर्चासाठी दिली आहे ती रक्कम कार्यालय उभारण्याचे खाती खर्ची घालावी व हा सर्व खर्च ऑडिट करून घ्यावा."

सूचक—न्या. के. दु. मंगळमूर्ती
अनुमोदक—डॉ. य. खु. देशपांडे

(८) वि. सा. संघाच्या घटनेंतील संघाचा कायम निधि आणि इतर आर्थिक व्यवहार या संबंधींच्या कलमांचा विचार करून त्यांत योग्य त्या सुधारणा सुचविण्यासाठी (१) न्या. मू. मंगळमूर्ती (२) श्री. बाळासाहेब ढवळे आणि (३) डॉ. वि. भि. कोलते यांची उपसमिति नेमण्यांत येत येत आहे. संघाध्यक्ष सौ. कुसुमावती देशपांडे आणि सरचिटणीस श्री. माडखोलकर हे दोघेहि या समितीचे सदस्य राहतील व श्री. माडखोलकर हे तिचे आमंत्रक म्हणून काम करतील.

(९) नवीन वर्षासाठी पुढील परीक्षा समिति नेमण्यांत आली—

(१) प्रा. डॉ. वि. भि. कोलते—संचालक. (२) सौ. उषाबाई कोलते—कार्यवाह. (३) प्रा. डॉ. शं. दा. पेंडसे. (४) प्रा. श्री. ना. बनहट्टी (५) प्रा. डॉ. मा. गो. देशमुख (६) प्रा. दा. ल. अडोणी (७) प्रा. पां. कृ. सावळापूरकर (८) प्रा. भी. गो. देशपांडे (९) श्री. दि. ह. सहस्रबुद्धे.

(१०) नव्या वर्षासाठी पुढील प्रकाशन समिति नेमण्यांत आली—

(१) श्री. ह. ना. नेने (आमंत्रक) (२) डॉ. वि. भि. कोलते (३) डॉ. मा. गो. देशमुख (४) प्रा. दा. ल. अडोणी (५) प्रा. वा. कृ. चोरघडे आणि (६) श्रीमती सरलाबाई प्रधान.

(११) नवीन वर्षासाठी पुढील परिभाषा समिति नेमण्यांत आली—

(१) प्रा. डॉ. मा. गो. देशमुख—आमंत्रक (२) प्रा. ग. त्र्यं. देशपांडे (३) प्रा. श्री. ना. बनहट्टी (४) प्रा. वि. ना. करबेलकर (५) प्रा. भ. श्री. पंडित (६) प्रा. वि. भि. कोलते आणि (७) प्रा. वा. कृ. चोरघडे.

(१२) नवीन वर्षासाठी पुढील साहित्य संस्था सहकार्य समिति नेमण्यांत आली—

(१) सौ. कुसुमावती देशपांडे—आमंत्रक (२) प्रा. डॉ. मा. गो. देशमुख (३) प्रा. वि. ना. करबेलकर (४) प्रा. श्री. मा. कुळकर्णी (५) श्री. दि. ब. पंडित

(६) श्री दि. ह. सहस्त्रबुद्धे (७) सौ. सुशीलाबाई कोठीवान आणि (८) चं. शं. धर्माधिकारी.

(१३) ता. १ जुलै १९५१ रोजी भरलेल्या मंत्रिसमिति आणि निधी-समिति यांच्या संयुक्त सभेने केलेल्या निर्णयांना आणि शिफारशींना मान्यता.

(१४) निवेदन समितीचे प्रतिवृत्त श्री. ह. ना. नेने यांनी सादर केले. तिच्या निर्णयांना मान्यता.

(१५) "निबंध परिमल" या पुस्तकाच्या संपादनाला आणि प्रकाशनाला मान्यता.

(१६) श्री. गुजेवार यांच्या ता ८-८-५१ पासून अंशवेळेचे कारकून म्हणून रुपये पन्नास पगारावर झालेल्या नेमणुकीला मान्यता.

(१७) का. का. मंडळाच्या बैठकींसाठी होणाऱ्या अल्पोपहारादि जरूर त्या खर्चाला नित्याची मान्यता.

एकसूत्रीकरण कसें होऊं शकेल ?

(१) महाराष्ट्र साहित्यपरिषदेकडून महाराष्ट्रातील साहित्यसंस्थांच्या एकसूत्री-करणासंबंधी जें पत्रक आलें होतें, ते विदर्भ साहित्यसंघाच्या कार्यकारी मंडळा-समोर वाचून दाखविल्यानंतर या पत्रकाबाबत पुढील ठराव सर्वानुमते मंजूर करण्यांत आला:—

महाराष्ट्रांतील साहित्यसंस्थांत एकसूत्रीपणा आणणारी महाराष्ट्र साहित्यपरिषद ही केवळ संघायक (Federal) स्वरूपाची संस्था बनावी. या संघायक संस्थेचे घटक येणेप्रमाणें असावेत:— (अ) प्रादेशिक (विविध राज्यांतर्गत सलग मराठी भाषी विभागांत) कार्य करणारे संघ. उदाहरणार्थ; वि. सा. संघ, मराठवाडा साहित्य-परिषद, गोमंतक साहित्य परिषद (आ) स्थानिक (संकल्पित संयुक्त महाराष्ट्राच्या मर्यादेपलीकडील) नगर निहाय संस्था. उदाहरणार्थ—दिल्ली, इंदूर ग्वाल्हेर, बडोदें, जबलपूर इत्यादि शहरांतील मराठी साहित्यसंस्था

अथवा

महाराष्ट्र साहित्यपरिषद ही संस्था संघायक बनवावयाची नसल्यास तिला प्रादेशिक घटक बनवावें [illegible] ल आणि संघायक संस्थेला 'मराठी साहित्य महामंडळ' अशा प्रकारचे नांव द्यावें.

सभासदत्व—संघायक संस्थेचे सभासदत्व घटकनिहाय असावें; व्यक्तिनिहाय नसावे उदाहरणार्थ महाराष्ट्र साहित्यपरिषदेचें सांप्रतचे सभासद हे (अ) वा (आ) या घटकाचे सभासद मानले जातील आणि घटकांनी पाठविलेले प्रतिनिधि हे संघायक संस्थेचें सर्व साधारण सभासद होऊन कार्यकारी मंडळ बनवितील.

सूचक–प्रा. डॉ. वि. भि. कोलते
अनुमोदक–प्रा. डॉ. मा. गो. देशमुख

मुंबई सरकारचे युनिव्हार्सिट्यांना निवेदन

(२) मुंबई सरकारने आपल्या राज्यांतील प्रादेशिक युनिवार्सिट्यांच्या कुलगुरूंना युनिवर्सिटीमधील शिक्षणाच्या माध्यमासंबंधी पाठविलेल्या निदेशांत इंग्रजीऐवजी

हिंदी माध्यम अमलांत आणण्याची सूचना केली आहे आणि यासाठी मुंबई सरकारने भारताच्या संविधानाचा चुकीचा आधार दाखवून जनतेची दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला आहे. आपल्या राष्ट्रीय जीवनाच्या सर्व कार्यक्षेत्रांत इंग्रजीचें स्थान हिंदीला द्यावे, असें मुंबई सरकारने आपल्या निवेदनांत म्हटलें आहे. पण भारताच्या संविधानांत तसें कोठेंहि नमूद केलेलें नाही. भारताच्या संविधानांतील १७ व्या भागांतील उपबंध केवळ सरकारी कामकाजाच्या भाषेसंबंधीं आहेत. विद्यापीठीय शिक्षणक्रमांत प्रादेशिक भाषांऐवजीं हिंदीचा माध्यम या नात्याने पुरस्कार करणें हें संविधानदृष्ट्या तर निराधार आहेच पण शिक्षणशास्त्रदृष्ट्याहि अस्वाभाविक आहे.

सर्व प्रकारचें शिक्षण हें आपआपल्या माध्यमांतूनच द्यावें, हेंच निसर्गसुलभ आहे. सरकारनें नेमलेल्या युनिव्हर्सिटी कमिशननेंहि मातृभाषेच्याच माध्यमाचा निःसंदिग्ध पुरस्कार केला आहे. राष्ट्रपिता म. गांधी, राष्ट्रपति डॉ. राजेंद्रप्रसाद, आचार्य विनोबा यांच्यासारख्या श्रेष्ठ विचारवंतांनी सुद्धा हेंच तत्त्व मान्य केलेलें आहे. ही सर्व मतें डावलून प्रादेशिक विद्यापीठांना प्रादेशिक भाषांऐवजीं हिंदी भाषा हा माध्यम म्हणून स्वीकारण्याची शिफारस करणें हा घोर अन्याय होय. प्रादेशिक विद्यापीठें निर्माण करण्याचा एक मुख्य हेतूच या निवेदनामुळें निष्फळ होत आहे. सबब मुंबई सरकारने आपलें मत अमलांत आणण्याच्या हेतूनें आपल्या वजनाचा अप्रशस्त उपयोग करूं नये व उलट त्या त्या विद्यापीठांना आपआपल्या प्रादेशिक भाषेंतूनच शिक्षण देण्याची शिफारस करावी अशी विदर्भ साहित्यसंघाच्या कार्यकारी मंडळाची आग्रहाची मागणी आहे.

सूचक–प्रा. वा. कृ. चोरघडे
अनुमोदक–प्रा. भी. गो. देशपांडे

राजभाषा विधेयक प्रतिगामी आहे.

(३) मुंबई राज्याचे मुख्य मंत्री मा. बाळ गंगाधर खेर यांनी मुंबई राज्याच्या विधानसभेसमोर मुंबई राज्याची सरकारी भाषा निश्चित करण्यासाठी एक विधेयक सादर केलें आहे व तें लोकमत अजमावण्यासाठी प्रसृत केलें आहे. ह्याशीं घातलेल्या संयुक्त महाराष्ट्रांत आलेल्या मराठी भाषिकांचे हि[illegible]च गुंतलेले असल्यामुळे सध्यांच्या मध्यप्रदेशांतील मराठी भाषिकांची प्रातिनि[illegible] असलेली एकमेव संस्था वि. सा. संघ हिला प्रस्तुत विधेयकासंबंधी आप[illegible] मध्यप्रदेशांतील मराठी भाषिकांचें मत व्यक्त करणें हे अपरिहार्य व आवश्यक कर्तव्य वाटतें.

प्रस्तुत विधेयक मुंबई राज्याचें सध्या अस्तित्वांत असलेलें त्रिभाषात्मक स्वरूप हें यापुढेंहि असेंच कायम राहणारें आहे असें गृहीत धरून तयार केलेलें आहे, हें उघड दिसतें. ही गृहीत गोष्ट भाषावार प्रांतरचना [illegible] तितक्या लवकर [illegible]न आणण्यासंबंधी भारत सरकारने व संसदेने जनतेला आजवर वेळोवेळीं [illegible] अभिवचनांशी मूलतःच विसंगत आहे.

एखादें राज्य व अन्यतर राज्य वा राज्यें यांच्या दरम्यान अथवा एखादें राज्य व संघ यांच्या दरम्यान परस्परनिवेदनाची सरकारी भाषा ही भारताचें संविधान अनुच्छेद ३४६ अनुसार इंग्रजीच्या जागीं हिंदी (वा अन्य प्रादेशिक भाषा)

असावी या धोरणाला विदर्भ साहित्यसंघाचा मुळींच विरोध नाही. पण, आजवर जेथे जेथे इंग्रजी भाषा उपयोगांत येत होती, तेथे तेथे इंग्रजीऐवजी हिंदी भाषा घालण्याच्या धोरणास मात्र विदर्भ साहित्यसंघाचा तीव्र विरोध आहे. आग्रहतः राष्ट्रीय भासणाऱ्या या धोरणांत प्रादेशिक भाषांची गळचेपी होण्याचीं बीजें अंतर्भूत आहेत. म्हणून प्रस्तुत विधेयक आहे त्या स्वरूपांत मान्य करणें हें आत्मघातकीपणाचें होईल. राज्यान्तर्गत सर्व कारभार जनतेच्या भाषेंतूनच चालणें हाच आदर्श-राज्य घटनेचा पाया आहे.

मुंबई सरकारने प्रस्तुत केलेल्या या विधेयकामुळे भाषिक प्रश्न न सुटतां उलट अधिकच गुंतागुंत आणि गोंधळ निर्माण होणार आहे. सबब विदर्भ साहित्यसंघाच्या कार्यकारी मंडळाची मुंबई सरकारला अशी विनंती आहे की त्याने हे विधेयक मागे घ्यावें.

सूचक—डॉ. य. खु. देशपांडे
अनुमोदक—श्री. बाळासाहेब ढवळे

सभेच्या शेवटीं संघाध्यक्ष सौ. कुसुमावती देशपांडे यांनीं सर्व सभासदांच्या उपस्थितीबद्दल व सहकार्याबद्दल आभार मानले. विदर्भ साहित्य संघाचें कार्य क्षेत्र व व्याप अत्यंत झपाट्याने वाढत आहे, संघाच्या प्रमुख कार्यकर्त्यांवर इतरहि अनेक जबाबदाऱ्या व कामांचा भार आहे, या दृष्टीने व संघाच्या कार्याचें सातत्य राखण्या-साठींहि, सर्वांनी नवीन कार्यकर्त्यांची पिढी तयार करण्याच्या प्रश्नाकडे लक्ष द्यावें अशी त्यांनी विनंती केली.

★

परीक्षा समिति

माहे ऑगस्ट १९५१ मध्ये झालेल्या परीक्षांचा अहवाल.

वि. सा. संघातर्फे घेण्यांत आलेल्या ऑगस्टच्या परीक्षांना निरनिराळ्या १३ केंद्रांतून एकूण १७१ वि[illegible]र्थी बसले. त्यांपैकी १०४ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. खाली दिलेल्या केंद्रांच्या नांवाप[illegible] प्रथम केंद्राधिकारी व नंतर त्यांचे सहकारी यांची नांवें दिलीं आहेत. परीक्षा स[illegible] वि. सा. संघातर्फे त्यांची आभारी आहे.

परीक्षा दरवर्षी [illegible] जानेवारीच्या व ऑगस्टच्या पहिल्या आठव-ड्यांत सुरू होतात. अर्ज [illegible]ण्याची शेवटची तारीख अनुक्रमे १५ डिसेंबर व १५ जुलै ही असते. त्या त्या ठि[illegible]च्या उमेदवारांनी तेथील केंद्र व्यवस्थापकांच्या तर्फेच आपले अर्ज पाठविणें सोईचें असतें. कोणत्याही एका परीक्षेसाठी कमींत कमी दहा [illegible] असल्यास त्या ठिकाणीं स्वतंत्र केंद्र देण्यांत येते. सविस्तर माहिती-[illegible] पत्रव्यवहार '[illegible], परीक्षा समिति, वि. सा. संघ, उत्तर अंबाझरी रस्ता, नागपूर नं. १' या पत्त्यावर [illegible]ावा.

वि. सा. 'संघातर्फे होणारी साहित्य पारंगत' परीक्षा हीच फक्त वर्षातून एकदा म्हणजे ऑगस्ट मध्यें होत असते.

केंद्रव्यवस्थापक

(१) अमरावती—श्री. द. शं. फडके; श्री. वडोदकर, श्री. दातार व श्री. काळे.

(२) अकोला— श्री. त्रि. या. जोग, सुपरिंटेंडेंट, मॉडर्न हायस्कूल.

(३) आकोट— श्री. मा. चं. बहादुकर; श्री. मुकर्जी, हेडमास्तर आणि श्री. जी. डी. महात्मे अध्यापक

(४) आर्वी — श्री. ह. ध. सगणे, श्री. के. न. कदम, श्री. हणमंते, श्री. सूर्येकर, तडस, व श्री. उन्होने.

(५) गोंदिया— श्री. ना. ग. डवीर; श्री. म. गो. बाकरे, श्री. ल. ग. डवीर, आणि श्री. प्र. त्र्यं. घुशे.

(६) चांदा — श्री. तु. ना. कोटकर; श्री. ओंकार ढेमे व श्री. ल. सी. डोंगे

(७) दारव्हा— श्री. कृ. आं. पाठक; श्री. कृ. भा. लिमये, श्री. दि. ल. जोगळेकर व श्री. कृ. पां. काणे.

(८) नागपूर— प्रा. पां. कृ. सावळापूरकर, प्रा. दि. वि. वराडपांडे व श्री. गं. रां. देव.

(९) नांदुरा — श्री. एम. के. राजूरकर.

(१०) भंडारा — श्री. ना. ल. पोतदार; श्री. मो. वि. डोंगरे; श्री. म. रा सुतोने, व श्री. गो. बा. मुळे हेडमास्तर—मनोहायस्कूल.

(११) वर्धा — श्री. ब. पं. तांदळे, रामनगर.

(१२) हिंगणघाट—श्री. रा. वि. करपे, मुख्याध्यापक

(१३) यवतमाळ—श्री. शं. य. मेळग; श्री. मानमोडे, हे. मा. न्यू. इं. हा. स्कूल, श्री. येटावदकर, सुपरिंटेंडेंट, नॉर्मलस्कूल, श्री. मेहरीर व श्री. ब्रिरे, हे मा. श्री. शिवाजी विद्यालय

खालील सद्गृहस्थांनी परीक्षक म्हणून काम केलें. त्याबद्दलहि परीक्षा समिति त्यांची वि. सा. संघातर्फे आभारी आहे—

डॉ. य. खु. देशपांडे, डॉ. के. ना. वाटवे, [illegible] पां. दांडेकर, डॉ. वि. भि. कोलते, डॉ. मा. गो. देशमुख; डॉ. म. [illegible] [illegible], प्रा भ. श्री. पंडित, प्रा. द. के. केळकर; प्रि. ह. ना. नेने, प्रा. पां. कृ. [illegible]वळापूरकर; प्रा. पु. गो. निजसुरे; श्री. रा. पु. सगदेव आणि सौ. उषाताई को[illegible]त

प्रा. ना. कृ. दिवाणजी पारितोषिक

साहित्य विनीत या परीक्षेत पहिल्या वर्गात सर्वां[illegible] [illegible]रत गुण मिळ[illegible] [illegible] कु. कुसुम आनंदराव देशपांडे (नागपूर [illegible] [illegible] प्रा. ना. कृ. [illegible]णजी पारितोषिक" देण्यांत आलें आहे.

रा. पु. सगदेव,

साहित्य-संस्था-सहकार्य-समिति

विदर्भ-साहित्य-संघाच्या साहित्यसंस्था-सहकार्यसमितीची सभा सोमवार ता. २४ सप्टेंबर रोजी नागपूर येथे संघकार्यालयांत भरली होती. सभेला डॉ. मा. गो. देशमुख प्रा. श्री. मा. कुळकर्णी, श्री. दि. व. पंडित, श्री. सुरेश डोळके व श्री. चंद्रशेखर धर्माधिकारी हे सभासद उपस्थित होते. साहित्य-संस्था-सहकार्य-समितीच्या उपस्थित सदस्यांच्या संमतीने सौ. कुसुमावती देशपांडे [आमंत्रक] यांनी श्री. सुरेश डोळके व श्री. त्र्यं. द. ऊर्फ आबासाहेब देशमुख (पारवेकर) यांची स्वीकृत सभासद म्हणून नियुक्ति केली.

महाविद्यालयें व दुय्यम शाळा यांच्यांत अस्तित्वांत असलेल्या विविध साहित्यसंस्थांचें सहकार्य घडवून आणून विद्यार्थ्यांच्या साहित्यविषयक अभिरुचीला वळण लावण्याचा प्रयत्न करणें हा या समितीचा हेतु आहे. शाळांतील व महाविद्यालयांतील विद्यार्थी अलिकडे हाताला येतील तीं पुस्तकें वाचतात. त्यामुळे कित्येकदा त्यांच्या साहित्यविषयक अभिरुचीवर इष्ट संस्कार न होता तिला अनिष्टच वळण लागण्याचा संभव असतो. यामुळे उद्याचें साहित्य व साहित्यिक यांबद्दल कुणाच्या मनात साशंकता निर्माण झाली, तर त्याबद्दल आश्चर्य वाटावयास नको.

याकरिता महाविद्यालयांतील साहित्य-संस्थांच्या वतीने विदर्भसाहित्यसंघाच्या सहकार्याने विद्यार्थ्यांना योग्य साहित्याची अभिरुचि लागेल व ती वर्धिष्णु होईल अशा विशिष्ट दर्जाच्या वाङ्मयावर विशिष्ट पद्धतीने चर्चा करण्याचें विदर्भ साहित्य संघाने ठरविलें आहे. याकरिता महाविद्यालयीन व विद्यालयीन वाङ्मयमंडळांच्या सहकार्याने अन्त्याक्षरी स्पर्धा, निबंधस्पर्धा, ग्रंथसमीक्षण व विशेषतः वैयक्तिक वाचनाचीं टिपणें यांवर भर देण्यांत येईल. विद्यार्थ्यांच्या वैयक्तिक विकासावर अधिक लक्ष केंद्रित करण्यांत येईल. याकरिता त्यांनी कोणतीं पुस्तकें वाचावीं याची एक यादी विदर्भसाहित्यसंघ तयार करीत असून प्रत्येक शाळांतील व महाविद्यालयांतील वाङ्मयमंडळांत ती लवकरच पाठविली जाईल. विद्यार्थ्यांनी कोणतीं पुस्तकें वाचावीं याचें दिग्दर्शन वि. सा. संघ करील. ग्रंथवाचनानंतर प्रत्येक विद्यार्थ्यानें आपल्या वाचनाचीं टिपणें ठेवावीं. त्यांच्या शिक्षकांचें त्यांना या कामात सहाय्य मिळेल, अशी वि. सा. संघाला आशा आहे. वैयक्तिक टिपणांची स्पर्धा ठेवण्याचा [illegible] वादि सहकार्य समितीने कार्यकारी मंडळाच्या विचारार्थ पाठविली आहे.

[illegible]तर

सारांश, [illegible] न विद्यार्थ्यांच्या वैयक्तिक बौद्धिक व वाङ्मयीन विकासावर विशेष भर दिला[illegible] अशाच स्वरूपाचे कार्यक्रम शाळा व कॉलेजें यांतील वाङ्मयमंडळांच्या स[illegible]ने करण्याचा वि. सा. संघाचा संकल्प आहे.

साहि[illegible] [illegible]र्य समितीच्या कार्यांत बऱ्याच तरुण साहित्यप्रेमी [illegible] सहार्य[illegible] [illegible]

'[illegible]गवाणा'च्या कार्यांतही श्री. सुरेश डोळके यांचा अंतर्भाव करण्यात आला आहे. एम्. ए. च्या परीक्षेत पहिल्या प्रतीचें यश मिळविणारे श्री. डोळके हे

उदयोन्मुख टीकाकार आणि संशोधकहि आहेत. त्यांचें अधिकाधिक सहकार्य 'युगवाणी'ला लाभेल यांत शंका नाही.

कविसत्कार

ता. १० रोजी सायंकाळी ५॥ वाजता विदर्भ साहित्यसंघाच्या कार्यालयांत नागपूर नभोवाणीवरील विजयादशमीच्या कविसंमेलनानिमित्त बाहेरून आलेल्या हिंदी मराठी कवींचा सत्कार करण्यात आला. वि. सा. संघाबद्दल आस्था बाळगणाऱ्या माननीयांची उपस्थिति डोळ्यांत भरण्यासारखी होती. संघाच्या नव्याजुन्या कार्यकर्त्यांबरोबरच आचार्य दादा धर्माधिकारी, प्रा. पुणतांबेकर, म. म. प्रि. मिराशी, वि. सा. संघाचे उपकर्ते श्रीमंत बाबुराव देशमुख, सौ. इंदुमती शेवडे, सौ. लीलाबाई चौधरी, सौ. शांताबाई माणकेश्वर, डॉ. मा. गो देशमुख, श्री. ए. श्री. पटवर्धन प्रभृति मंडळी हजर होती. श्री. नानासाहेब जोग आणि श्री. रा. पु. सगदेव यांनी समारंभाची व्यवस्था उत्तम ठेवली होती. सुरवातीला वि सा. संघाच्या अध्यक्षिका सौ. कुसुमावती देशपांडे यांनी पाहुण्यांचें स्वागत केल्यावर वि. सा. संघाचे उपाध्यक्ष श्री. पु. य. देशपांडे यांनी वि. सा. संघाची भूमिका विशद करणारें छोटेसें भाषण केलें. त्यानंतर डॉ. कोळ्ते यांनी हिंदी कवि श्री नरेंद्र शर्मा व राजकवि यशवंत, श्री सोपानदेव चौधरी, सौ. मनोरमाबाई नावलेकर, प्रा. भ. श्री. पंडित, प्रा. या. मु. पाठक, श्री. अनिल, व श्री. शरच्चंद्र मुक्तिबोध या मराठी कवींचा व त्यांच्या काव्यवैशिष्ट्यांचा थोडक्यांत परिचय करून दिला. श्री. हरीभाऊ नेने यांनी पुष्पमाला घालून पाहुण्यांचा सत्कार केल्यावर प्रत्येक कवीने आपली एकेक कविता गाऊन दाखविली. श्री. नरेन्द्र शर्मा कवितागायनापूर्वीच्या आपल्या छोट्याशा भाषणांत म्हणाले—"हिंदी राष्ट्रभाषा होणार आहे यांत अभिमान बाळगण्यासारखी कोणती गोष्ट आहे मला कळत नाही. कारण तिच्यापेक्षा समृद्ध अशा कितीतरी भाषा भारतांत आहेत. हिंदीकडे ही जी कामगिरी आली आहे, ती सर्व भाषांच्या सहकार्याने करता येण्यासारखी आहे. महाराष्ट्राविषयीं मला नितान्त आदर आणि जिव्हाळा आहे. महाराष्ट्राला विठ्ठलाने भक्ति दिली, मारुतीने शक्तीच्या उपासनेचा महामंत्र दिला व गणपतीनें मस्तिष्क दिलें. महाराष्ट्राप्रमाणेच मराठीचा पिंडही असाच बनलेला आहे. तिच्याविषयीं आदर आणि जिव्हाळा कुणाला वाटणार नाही?" अशा आशयाच्या हिंदी भाषणानंतर त्यांनी आपली 'युग की संध्या' ही छोटी हृदयंगम कविता गाऊन दाखविली.

त्यानंतर मराठी कवींनीहि समयोचित व आटोपशीर [illegible] भाषणें करून आपली एकेक कविता गाऊन दाखविली. वि. सा. संघाचे कार्यवाह श्री. रा. पु. सगदेव यांनी पाहुण्यांचे व उपस्थितांचे आभार मानल्यावर हा छोटासाच पण भावपूर्ण समारंभ संपला.

हा मुख्य समारंभ आटोपल्यावर रात्रीच्या सुमारास [illegible] श्री. सुमित्रानंदन पंत, श्री. बच्चन आणि श्री. 'सुमन' या प्रख्यात हिंदी कवींनी [illegible] संघाला भेट [illegible] सौ. कुसुमावतीबाई देशपांडे यांनी त्यांचें स्वागत केल्यावर [illegible] नानासाहेब [illegible] यांनी त्यांचा सर्वांशी परिचय करून दिला. श्री. रा. पु. सगदेव [illegible] त्यांना हार घालून वि. सा. संघातर्फे त्यांचा गौरव केला. ग्रँड ट्रंकने सायंकाळी आल्यामुळे आपल्याला वेळेवर येता आले नाही याबद्दल तिघाहि कवींनी खेद व्यक्त केला.

१९५१
ऑक्टोबर

डॉ. दास यांची भेट

नागपूर इम्प्रूव्हमेन्ट ट्रस्टचे अध्यक्ष डॉ. दास यांनी आज सकाळीं १० वा. ट्रस्टचे एक एंजिनिअर श्री. घाणेकर यांचेसह, विदर्भ साहित्य संघाला, विदर्भ साहित्यमंदिराची जागा आणि नकाशे यांची पहाणी करण्यासाठीं, भेट दिली. ट्रस्टच्या एक सदस्य सौ. कमलाबाई देशपांडे याहि या वेळीं विशेष निमंत्रणाने हजर होत्या. डॉ. दास यांना विदर्भ साहित्यमंदिराची जागा दाखवून मंदिरयोजनेसंबंधी संपूर्ण माहिती दिली गेली. त्यांनी संघाच्या कार्यकर्त्यांशी मंदिराची जागा आणि नकाशे यांसंबंधी चर्चा केली; व शक्य तितक्या लवकर मंदिराचा नकाशा मंजूर करण्यांत येईल आणि मंदिरयोजनेला ट्रस्टचें सर्व प्रकारें सहाय्य होईल, असें आश्वासन दिलें.

* * *

गोंदिया येथे विदर्भ सा. संघाची शाखा उघडली.

वि. सा. संघाच्या गोंदिया शाखेचा उद्घाटनसमारंभ आणि प्रमाणपत्रवितरण समारंभ गोंदिया येथें ता. १५-१०-५१ रोजी मोठ्या उत्साहाने साजरा झाला. शाखेचा उद्घाटन समारंभ संघाध्यक्ष सौ. कुसुमावतीबाई देशपांडे व प्रमाणपत्रवितरणसमारंभ डॉ. कोल्ते यांच्या हस्तें पार पडला.

* * *

हिंदी साहित्यिकांचा सत्कार

हिंदी साहित्यांतील अग्रगण्य आणि प्रथितयश श्रीमती महादेवी वर्मा, श्री. कवि दिनकर, श्री. गंगाप्रसाद पांडे व श्री. इलाचंद्रजी जोशी यांचे ता. १८ ऑक्टोबरला विदर्भ साहित्यसंघातर्फे संघाच्या केंद्रीय कार्यालयांत स्वागत करण्यांत आलें. कार्यक्रमाला नव्या जुन्या साहित्यिकांचा व साहित्य प्रेमी रसिकांचा बराच मोठा मेळावा जमला होता. वि. सा. संघाच्या अध्यक्ष सौ. कुसुमावतीबाई देशपांडे यांनी आपल्या छोट्याशा भाषणाने सर्वांचे स्वागत केल्यानंतर श्री. अनंतराव शेवडे यांनी पाहुण्यांचा व त्यांच्या वाङ्मयीन श्रेष्ठत्वाचा स्थूल परिचय करून दिल्यावर संघाचे उपाध्यक्ष श्री पु. य. देशपांडे यांनीं वि. सा. संघाचा व मंदिरयोजनेचा थोडक्यांत परिचय करून दिला. नंतर चिटणीस श्री. रा. पु. सगदेव यांनी पाहुण्यांचा पुष्पमा[illegible] घालून सत्कार केल्यानंतर प्रा. वामनराव चोरघडे यांनी उपस्थित मराठी [illegible]कांचा परिचय करून दिला. नंतर पाहुण्यांनी थोड्या प्रस्तावनेसह आप[illegible]वितेचें गायन करून दाखविलें. शेवटी श्री. सगदेव यांनी आभार मान[illegible]तर अल्पोपहार होऊन हा सत्काराचा गोड समारंभ आटोपला.

* * *

कार्यक्रम समिति

पुढील मंडळींची एक कार्यक्रम समितीही नियुक्त करण्यांत आली आहे. सा. संघा तर्फे [illegible] या कार्यक्रमांत सुत्रता व विविधता यावी या दृष्टीने सागर [illegible] अङ्गीकृत करण्यांत आला आहे.

[illegible]श म. डोळके आमंत्रक (१) श्री रा. पु. सगदेव (२) श्री नानासाहेब चंद्रशेखर धर्माधिकारी (४) चंद्रशेखर माडखोलकर. आणि [illegible] (३) श्री [illegible] द जोग.

विदर्भ साहित्य संघ

ऑगस्ट १९५१-परीक्षांचे निकाल

मराठी प्रवेशः वर्ग ३ काशीराज प्रसादराव.

मराठी प्रारंभः वर्ग २. आ. ग. वाघ, ना. कृ. आवते, ना. ना. बोडखे, भा. जा. शहाडे, वा. न. भुडे, वि. म. भेंडे, कु. वा विसेन, वि. स. वाट, म. ल. जोगळेकर, कु. मीनाक्षी दि. भावे, सु. गो. भांडारी, जमनादास गं. डागा, र. गो. पळसोदकर, हिंगलाल ब. खंडेलवाल. वर्ग ३ सिस्टर एड्रियन, उ. ग. मानकर, कु. ज. कदम, गु. न. घोडखांदे, कि. भो. देहाडराय, ध. ज. टेंभरे, श. शं. डोणगांवकर, कु. कमल के. पांडे, श. शं. वाघळकर, कु. सुधा र. लोहकरे, कु. सरोज प. भावे, सु. वि. गुर्जर. ऑ. का. जुनगडे, पु. शं. देशपांडे, प्र. ब. जोशी, भा ना. काजळे, म. रा. ढवळे,

साहित्यविनीत वर्ग १ (गुणानुक्रमें) कु. कुसुम आनंदराव देशपांडे, मुरलीधर गोपाळ मस्की, मुरलीधर नारायण चोपडे, सौ. लक्ष्मीबाई त्रिं. गोखले, रामा गोविंद वाघे. वर्ग २ रा रा. खु. गावंडे, ज. आ. भांगे, ना. रं. जवळेकर, मा. वि. एडाखे, शा. न. रुईकर, द. मा. आमदरे, नि. गं. देशपांडे, व. शं. मुंजे, पं. द. कटकवार, भा. ग. भृशुंडी, के. सी. गिन्हेपुंजे, कि. मा. आमले, जा. न. गुरमुळे, न. सो. तातोडे, मो. भु. गायधने, रा. बा. घांगडे, वि. ना. चोपडे, उ. प्र. थूल, कु. मंदाकिनी या. रावळे, कु. लीला. तु. कहारे, वि. मु. देशपांडे, वर्ग ३ रा. अ. ना. पिंपळे, क. तु. हिंगणकर, प्र. ना. सरकाळ, प्र. अ. सोनोने, बा. ना. म्हैसने रा. कृ. पालखडे ल. खु. सोनटक्के, ल. पु. गावंडे, वि. का. बनसोडे, वि. ज. पंवार, तु. ना. काळे, बा. ना. बोडखे, रा. ल. मोकलकर, द. र. मानके, वि. रा. बोबडे, हुकमचंद मगनलाल महाणकरी ज. द. मोहिले, प्र. द. मुजुमदार, ना. त्रिं. गहूकर, भी. ना. यादव, रा. गो. गावंडे, शेख कासम शेखलाल, कु. इंदु ग. अलोणी, कृ. शि. कुबडे, गु. वा. फुटाणे, व. सु. कावळे. पां. दा. चौधरी, भ. झि. सहारे, म. जा. शिंदे य. सौ. मुने, वि. ना. भांडे, वि. गो. राऊत, कु. सुनंदा कु. डब्ली, के. ग. रेवस्कर, द. स. बेडेकर, न. पां. कुबडे, प्र. मा. गगोरकर, मा. तु. भुसकर, वा. रा. परारे, वि. ध. मिसार.

साहित्यपरिचित

वर्ग २ (गुणानुक्रमें) कु. चित्रा रा. कागे, कु. मि[illegible] चव्हाण, कु. पद्मा ग. बेटावदकर वर्ग ३ रा. कु. लीला सी. पांढरकामे, स[illegible] धोबनकर.

साहित्यस्नातक वर्ग २: (गुणानुक्रमे) मा. मा. [illegible] ह. गा. यंगावकर, या. ब. हणवंते, सौ. कुसुम व. वाघमारे, कु. सिंधू ल. खो[illegible], वा. ग. देवळे, न. म. निळे. वर्ग ३ रा. कु. लीला. गं. पैकने, कु. सुमन [illegible] नाइक.

साहित्य पारंगत कुणीहि उत्तीर्ण झाले नाहीं.

पारितोषिक

कु. कुसुम आनंदराव देशपांडे, (नागपूर केंद्र) पहिल्या वर्गात सर्वांत अधिक गुण मिळविल्या[illegible] त्यांस पारितोषिक.

वि. भि. [illegible]लते

संचालक, वि. सा. सं. परीक्षा समिती.

अनुक्रमणिका

विदर्भ साहित्य संघ परीक्षा समिति

जानेवारी १९५२–परीक्षा

विदर्भ साहित्य संघाच्या पुढील परीक्षा जानेवारी १९५२ मध्ये शनिवार व रविवार ता. ५ व ६ रोजीं होतील. उमेदवारांनी आपले अर्ज जास्तींत जास्त तारीख १५ डिसेंबर १९५१ पर्यंत वि. सा. संघाच्या केंद्रीय कार्यालयांत पाठवावे. बाहेर गावच्या उमेदवारांनी आपले अर्ज शक्य तोंवर स्थानिक केंद्राधिकाऱ्यांच्या मार्फत पाठविल्यास अधिक सोईचें होईल. पत्रव्यवहार ' सरचिटणीस, विदर्भ साहित्यसंघ, उत्तर अंबाझरी रोड, नागपूर १ ह्या पत्यावर करावा.

वि० सा० सं० परीक्षांची केंद्रें व केंद्राधिकारी पुढीलप्रमाणे—

गावाचे नांव	केंद्राधिकारी	पत्ता
अकोट	श्री. मा. त्र्यं. बहादकर	शिक्षक, शिवाजी हायस्कूल
अकोला	रावसाहेब त्रिं. बा. जोग	रामदास पेठ.
अमरावती	श्री. द. शं. फडके	मुधोळकर पेठ
आमगांव	,, ल. वि. मानकर	शिक्षक आदर्श विद्यालय
आर्वी	,, ह. ध. सगणे	मुख्याधापक मॉडेल हायस्कूल
कारंजा	,, मो. वि. फुरसुले	मुख्याध्यापक कंकुबाई विद्यालय
गोंदिया	,, ना. ग. डबीर	सिव्हिल लाअिन्स
चांदा	,, तु. ना. काटकर	भानापेठ
जबलपूर	प्रा. गो. मा. रानडे	महाराष्ट्र हायस्कूल
दारव्हा	श्री. कृ. आ. पाठक	शिक्षक, अेडेड हायस्कूल
नागपूर	प्रा. पां. कृ. सावळापूरकर	सिटी कॉलेज.
नांदुरा	श्री. म. के. राजूरकर	मुख्याध्यापक नांदुरा हायस्कूल
पुसद	,, द. ना. हुद्दार	मुख्याध्यापक, कोटाटवार ,,
बल्हारपूर	,, न. म. निळे	शिक्षक
भंडारा	,, ना. [illegible]. पोतदार	व्यवहारे यांचा वाडा
मलकापूर	,, वा [illegible], पानट	शिक्षक, मलकापूर हायस्कूल
यवतमाळ	,, शं. [illegible]	अवधूतवाडी
वरुड	,, त्र्यं. [illegible] राकोडे	मुख्याध्यापक, शिवाजी हायस्कूल
[illegible]र्धा	,, ब. [illegible] दळे	रामनगर
[illegible]गाट	,, रा. वि [illegible] करपे	शिक्षक रॉबर्टसन हायस्कूल
[illegible]	,, गो[illegible] पुंडारी	संचालक, सेवा हायस्कूल
सागर	[illegible] अडोणी	सागर विद्यापीठ

उषा कोलते,
ता. १८।१०।५१

अनुक्रमणिका

"युगवाणी" (Yugawani) Regd No. N 945

मध्यप्रदेश शाळाखात्याकडून लायब्ऱ्यांसाठी मंजुरी मिळालेलें

विदर्भ साहित्यसंघाचें मुखपत्र

यु ग वा णी

द्वैमासिक, ऑक्टोबर १९५१

दिवाळी अंक

वार्षिक वर्गणी पांच रुपये :: सभासदांना विनामूल्य :: सभासदत्वाचें वार्षिक शुल्क फक्त तीन रुपये

विदर्भ साहित्य संघाच्या आजच्या गरजा

(१) विदर्भ साहित्य मंदिराच्या इमारतीची सांगता करणें

(२) वि. सा. संघाच्या परीक्षांना व्यापक आणि सर्वोपयोगी स्वरूप देणें.

(३) वि. सा. सं. चें मुखपत्र **युगवाणी** आर्थिक दृष्टीने स्वावलंबी करून उत्तरोत्तर त्याचें स्वरूप सर्वांगीण करणें.

(४) वि सा. सं. च्या वतीने उत्कृष्ट, दुर्मिळ आणि शैक्षणिक ग्रंथांच्या प्रकाशनाचें कार्य जोमाने सुरू करणें.

(५) वि. सा. संघाला मराठी भाषेच्या हिताचें कार्य प्रातिनिधिक स्वरूपाने अधिक धडाडीने करतां येण्यासाठी संघाचे सभासद वाढविणें.

या सर्वांसाठी संघाचे सभासद आणि कार्यकारी मंडळ अविश्रांत मेहनत करीत आहेत. मराठी प्रेमी जनतेने तनमनधनाने मदत करण्यास प्रवृत्त व्हावें म्हणून संघाचें कार्य नेटाने चालविण्याच्या संकल्पांत मराठीच्या नागरिकांनी हातभार लावावा अशी नम्र विनंति आहे.

विदर्भ साहित्य संघाची मराठी साहित्याच्या सेवेसाठी शक्ति वा आणि जास्तीत जास्त संख्येने वि. सा. सभासद

मुद्रक :: प. वि. वेलवलकर, व्यवस्थापक, हरिहरेश्वर प्रेस, महाल, नागपूर.

अनुक्रमणिका